नं. ७३

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक रा. भा. लोकमाते | सन १८८२ |
|---|---|---|
| नाटक | | |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव हंसपाल नाटक | |
| ३५० | २५७ | |

१२

नाटक

# HANSPALIKA.

AN INTERESTING DRAMATIC COMPOSITION

BY

**RAVJI MANOHAR TAKBHATE.**

PRINTED AT VITTHAL SUKHARAM AGNIHOTRI'S PRESS.

Poona, February 1872.

(*Registered under Act* 20 *of* 1847 *and* 25 *of* 1867.)

All Rights Reserved.

PRICE Rs. 1-8.

# हंसपालिका,

मनोरंजक कल्पित नाटक.

हें पुस्तक

रावजी मनोहर ताकभाते

यांणीं

तयार केलें.

तें

पुणें एथें

विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांच्या छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

फेब्रुवारी सन १८७२ इसवी.

सन १८४७ चा आक्ट २० व

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केलें असे.

(सर्व हक्क ग्रंथ कर्त्याने आपलेकडे ठेविले आहेत.)

किम्मत दिड रुपया.

THIS SMALL WORK IS HUMBLY
DEDICATED TO

HIS HIGHNESS RAMCHUNDRA RAO ALIAS

APPASAHEB,

CHIEF OF JAMKHINDI,

AS A TOKEN OF THE MANY EXCELLENT
QUALITIES WHICH HIS HIGHNESS POSSESSES
SUCH AS BENEVOLENCE, TASTE FOR
LEARNING, ZEAL FOR THE PROMOTION
OF FEMALE EDUCATION *&c.*

BY,

**THE AUTHOR.**

आपले लोकप्रिय.

श्रीमंत राजश्री.

रामचंद्रराव उर्फ अण्णासाहेब जंमखिंडीकर यांस,

यांचेठायीं

स्त्री शिक्षणा विषयीं उत्कंठता व विद्येची अभिरुचि
आणि परोपकारादि स्तुत्य कृत्यांस उदार-
ता इत्यादि अनेक सद्गुणांचें वास्त-
व्य जाणून व त्यांचे परवा-
नगी वरून.

कर्त्यानें.

हें ल्हानसें पुस्तक कृतज्ञता पूर्वक परमादरानें

# नजर केलेंअसे.

रा० म० ता०

*The Author herewith expresses his hearty thanks to Messrs. Ramchandra Moreshwar Raje, Govind Gunesh Rahatiker and Vishnu Bhagvant Mande. for the valuable assistance they have rendered to this work.*

K. M. T.

या पुस्तकांस रा॰ रा॰ रामचंद्र मोरेश्वरराजे व गोविंद गणेशराहतेकर आणि विष्णुभगवंतमांडे यांणीं स्तुत्य मदत केल्याबद्दल मी यांचा फार आभारी आहे.

रा॰ म॰ ता॰

# प्रस्तावना.

कोणतेंही पुस्तक वाचण्यां पूर्वी त्याची प्रस्तावना वाचावी हे फार रयुक्तिक आहे. म्हणजे असे केल्यानें पुढें पुस्तकांत काय आहे, व तें कोणत्या विषयांवर आहे, ह्याचा सारांश जलद ध्यानांत येतो. आणि नंतर पुस्तक वाचण्यास योग्य किंवा अयोग्य याचा निश्चय मनास करतां येतो. प्रस्तुत जें तुह्मी पुढें पुस्तक वाचणार आहां. याचें "हंसपालिका नाटक" असें नांव आहे. कारण यांतील मुख्य नायका जी आहे तिचें हंसपक्षांनीं पालन केले आहे. याकरतां हंसपालिका असें नांव पुस्तकांस दिलें. यांत एकेच गोष्टींत लहान लहान चार भाग ठेविलें आहेत. आणि हुबे हूब रंगमंडपीं सभासद मिळून सूत्रधार विदूषकांसह नाटक होत आहे काय! अशा प्रकारें लिहिण्याचा कटाक्ष ठेविला आहे. गोष्ट मनवेधक असून तिच्या अंगभूत संगतीनें, स्त्रियांच्या नादानें पुरुष कोणतीं साहस कर्मे करतात, फितुरी मनुष्य राजमंडळांत असल्यास काय अनर्थ होतो, अशिक्षित मनुष्य मोठ्या हुद्यावर असल्यास त्याचें हातून दारूण परिणाम, श्रीमंताजवळ हजीहजीकरणारेलोक आपला फायदा कसा करून घेतात, स्त्री पुरुषांचे खऱ्या प्रितीपेक्षां जगतांत कोणतीच मोलवान वस्तू नाहीं, सुधारलेल्या राज्यांची आणि स्वेच्छाचार अंधाधुंदी राज्यांची तुळणा, मनुष्य देहास सुख दुःख कसें समान असतें, इत्यादि प्रकाराचें फार चांगलें स्पष्टीकरण करून, हस्य, वीर, करुणा-

रस बरेच साधिलेंत व मुख्यत्वें शृंगार ठेविला आहे.

नाटक रूपानें लिहिलेल्या गोष्टीचा सारांश प्रथमताच वाचकांस प्रथम पानावर कळला जावा. परंतु तसें केल्यानें पुढील वांचण्यांत गोडी, व अंतःकर्णास चटका कमी राहतो. या करतां सारांश लिहिला नाहीं.

रावजी मनोहर ताकभाते.

ता॰ १९. माहे फेब्रुआरी सन १८७२, इसवी.

---

☞ विशेष सुचना.—या पुस्तकांत बरेंच ठिकाणीं माझ्या अविद्वत्तेमुळें चुका राहिल्या असतील, व छापतेवेळीं ही काना मात्रा अनुस्वारादि अपभ्रंश पुष्कळ झाला असेल. ह्मणून विद्वज्जन राजहंस, माझ्या अज्ञानमय जलाचा त्याग करून-किंचित असलेल्या गुणमय दुग्धाचाच स्विकार करतील, असी अशा करतो.

ग्रं॰ क॰

# ग्रंथकर्त्याचा उद्देश.

सकल आनंदाचें व शांतीचें मूळ विद्या, हें उघड आहे परंतु ह्यांतही दोन भेद आहेत, एक आनंद विद्या व दुसरें उदरविद्या. जन्मवर काबाड कष्ट करून शुध्द उदरा करता व लौकिका करतां संपादन करणे, ती उदर विद्या ह्मणण्यास हरकत कोणती? चित्त उदास झालेंतर, आनंदाच्या लहरां तीपासून उत्पन्न होतील काय? नाहीं. प्रत्येकांनीं ती उदर पूर्तीच साध्य करून बाकी वेळ, जो आपणास दुर्लभ मनुष्य जन्म प्राप्त झाला आहे, याच्या खऱ्या सुखांच्याच कडे दवडावा, हें रास्त आहे. सर्वच अयुष्य उदर विद्येचें मागें घालऊनये. तर कांहीं तरी आनंद विद्येचा विचार करावा. कारण, जातो आहे क्षण हा पदरात, पुढील क्षण कसा येतो कोणजाणे! हा धाक मागें आहे. तर अशा काळाच्या दाढेंत असतां दाढ गिटें पर्यंत स्वस्थ बसावे काय? मानुषीक ज्ञानाचा कांहीं तरी उपयोग! कां सर्व आयुष्य उदर निवृत्ती कडेच. "नादे चित्ता शांती ऐशी विद्या कशाला" हें वाक्य खोटें काहो? नाहीं. तर चित्त जेणें करून शांत होईल, या दुर्लभ मनुष्य देहास सुखाचा एक तरी क्षण जाईल, आपण दुनियेंतून नाहींसे झाले तरी मागें कित्येकांस आपण करून ठेविलेल्या आनंद विद्येपासून समाधान होईल, व जेणें करून अखंड किर्ती राहील, अशा कामांत आपला वेळ उदर विद्ये पेक्षां ज्यास्त घालवावा, हें सुज्ञास योग्य, आणि प्राय: हाच विचार दृढ धरून मागें झालेले जे जग

विख्यात विद्वान, कालिदास, भवभूती, वामन पंडीत, मयूरपंत इत्यादिकांनीं आपलें चातुर्य भांडार खर्चून आह्मां करतां आनंद विद्या करून ठेविली. पहा, खरोखर मन उदास झालें असतां, त्यांतील एखाद्या विद्वानाचा ग्रंथ किंवा कवित्व अगर त्यांच्या स्वचातुर्याचें एखादें नाटक, मग बोधपर ह्मणा किंवा शृंगार ह्मणा, परंतु तें पाहिलें असतां हल्लीं आपल्या मनास आनंद होतो. आणि लागलिच अशी कल्पना येते कीं, त्यांनीं जें इतकें श्रम करून ही आनंद विद्या तयार केली, त्यांत त्यांनां कांहीं फायदा होता काय ? नाहीं. तर खरोखरच तें उदर विवेकडे लक्ष ठेवित नव्हतें, असें सिद्ध होतें. त्यांचें मनांतून मागें किर्ती राहून आनंद विद्येंत सर्वांनीं रमावें ह्याच हेतु खरा. ह्मटलें असतां त्यांनां पोट नव्हतें काय ? होतें. व तत् प्रित्यर्थ त्यांची विद्या व वेळही खर्च होत होती. परंतु खरें लक्ष आनंद वीद्येकडेसच ठेवीत होते. असो. ह्याच कारणानें त्यांच्या किर्तीचे डंके अद्याप झडत आहेत. व आपलें एखादे वेळीं चित्त उदास झालें तर आपण त्यांनांच शरण जातो. ह्मणजे त्यांच्याच ग्रंथांतील एखादा सुंदर विषय वाचून किंवा ऐकून आपण समाधान पावतो.

वरील विचार मनांत आणून आलिकडेही बरेंच विद्वज्जनांनीं या कांमाकडे लक्ष पोंचविलें आहे. ह्मणजे आपापल्या बुद्धीनुसार कोणी भाषांतरें, कोणी स्वकपोल कल्पित कादंबऱ्या, कोणी नाटकें अशी बरीच गद्य पद्यात्मक पुस्तकें तयार केलीं आहेत. प्रत्यकांचा हेतु ग्रंथ करण्या बद्दल वेगळा वेगळा असतो. त्यांत स्त्रियांना वाचण्यास तर सोपें असावें आणि मनोरंजन तर उत्तम व्हावें अशीं कल्पित पुस्तकें, कादंबऱ्या किंवा नाटकें फारशीं प्रसिद्ध दिसत नाहींत. पुराणांवरून किंवा भाषांतरावरून गद्य पद्य अशीं बरींच झालींत, परंतु क-

क्षित असून वाचण्यास सोपीं व मनवेधक अशीं फारच कमी असतील. पुस्तकांच्या मधून कविता असल्यानें तीं सहीत वाचणारें, व त्या सर्सांच सर्व अर्थ ध्यानांत आणणारें, असें वाचणार, स्त्रियां वगैरे नुतन उमेदिचें मंडळींत कमीच निघतील. आणि त्यामुळें पुस्तकांच्या मधून कविता असल्या ह्मणजे त्यांच्या वाचण्यांतील रसाचा विपर्यास होतो. असें पुष्कळ आढळतें. नुतन उमेदिचे वाचणारास प्रथम मनरंजन होऊन वाचण्याचा चटका लागला, ह्मणजे मग आमच्या देश बांधवांनीं केलिलीं गद्य पद्यात्मक पुस्तकें उपयोगीं खरीं.

वर लिहिलेल्या नुतन उमेद्वारास [स्त्रिया वगैरे.] किंवा वाचकांस, एक अल्पमतीनें येईल तसें पुस्तक करून सादर करावें, असा फार दिवस हेतु घोळत होता. परंतु उपयोग काय? या कामास किती नडी! पुस्तक लिहिणें किंवा छापून प्रसिद्ध करणें याचें सुख बहुतेक माझ्या देश बांधव पुस्तक कर्त्यानां माहित असेलच! तेव्हां ह्या प्रसंगीं त्या बद्दल स्पष्टीकरण करण्याचें कारण दिसत नाहीं. असो, सहस्त्रावधी नडी येऊन पुढें हजर झाल्या. परंतु ईश्वर कृपेकरून माझ्या गुज व अकित्रीम स्नेहांच्या मदतीनें त्यांतून पार पडून तुह्मां वाचकांच्या दृष्टी समोर उभारा दिलों. कृपादृष्टी करणें हें तुम्हाकडे आहे.

ग्रं० क०

# हंसपालिका.

**मनोरंजक कल्पित नाटक.**

## प्रवेश १

**स्थळ रंग मंडप.**

### पात्रें

| | |
|---|---|
| सूत्रधार........................... | नाटक कर्ता. |
| विदुषक........................... | साह्यकरणारा. |
| गणपती........................... | सांबाचापुत्र. |
| सरस्वती........................... | ब्रह्मकुमारी. |

**रंगमंडप.**

प्रारंभीं रंगमंडपाचे ठायीं सुत्रधाराचे अगमन होऊन मंगलाचरणास आरंभ होतो (कांहीं नाम स्मरण झाल्यानंतर) नाचत नाचत मोठ्या डौलानें विदूषक प्राप्त होतो.

वि०—इकडे तिकडे फिरून आपणाशींच आहाहा काय थाट हा! काय वृक्षागणित माणसें लठकालित ही बा! मौजच बनली आहे बा. (मोठ्यानें हसून) जिकडे जावें तिकडे आवडतें तेंच कपाळी येतें बिछाईत काय सुंदर आंथरली आहे अस्माधिक येथें येणार तो अगोदर इतका थाट! आणि मग आल्यावर :—(अर्धेच बोलून) पण एक कसें चुकला मीं ताकीद केली होती कीं, हंड्या, गलास सर्व विझवून मी येण्याच्या पूर्वी दिवाणखाना मात्र पेटवून ठेव. तसेंच मधल्या गच्चीवर पलंग अधांत्री

आडवा बांधून त्याच्या खालच्या बाजूस गादी टाकून नको वर सत्रंजी पसर. पण तो रामडू विसरला वाटतें करावें काय? आतां मला मोठा राग येऊन गेला होता; पण तो यावेळेस जवळ नाहीं. नाहींतर मी आपल्या पाठीला तेल लावून त्याचे पाठीवर खरपूस फटके मारले असते. असो आतां विदूषक महाराज, अंमळ शांत व्हा दांतही आपले-च आणि ओठही आपलेच करावें काय (अमळ इकडे तिकडे फिरून) आतां येथेंच निजावें ह्मणून निजू लागतो तों इतक्यांत:——

सु०——अहो? संभावित (सुत्रधार हका मारतो पाहून)

वि०——मागें तोंड करतो.

सु०——(त्याचें पुढें जाऊन) अहो तुह्मी कोण? येथें येऊन ही वेडीं विद्रीं भाषणें काय करतां? स्थीर होऊन या गरिबाशीं दोन शब्द बोला, आपलें वृत्त ऐकण्यास आह्मी फार उत्सुक आहोंत.

वि०——(सूत्रधार विचारतो पाहून) भिंतीकडेस तोंड करून काय सुंदर चित्रें आहेत हीं? वस्स. आपली तर ताहानको. भूक हरली, यकूने चित्रें काढणारा उत्तम मूर्ख होता, ह्यांत संशय नाहीं.

सु०——(आणीक त्याचें पुढें जाऊन) अहो थोर गृहस्थ! आह्मी फार वेळ आपणास विचारतो ऐकूं येत नाहीं काय?

वि०——(रागानें आंगावर येऊन) काय आहे हो? तुह्मी कोण? काय बडबड चालविली आहे? सरकार आतां निजण्याच्या बेतांत आहेत आणि तुह्मी ही रोषनाईला हंड्या लवून कशाचा चकचकाट केला आहे; आणि ही मंडळी कां इतकी जमली आहे. कांहीं लढाईचा बेत

करून आमचे राज्य घेणार कीं काय? बरें असो. कांहो? ती तुह्मी आह्माला लग्नपत्रिका धाडली होती, तुमच्या विवीच्या लग्नाबद्दल, मग त्याचें कसें काय? बेत राहिला असला तर आह्मी आपलें माघारी जातों. बोला बोला लवकर. बरें तें असो. आहो? आणीक एक आह्मास नुक्तें स्मरण होऊन विसरलों. त्याचें कसें काय? (तोंडांत बोट घालून) हो! हें मघाच पासून तुम्ही (मागें बोट करून) तुंणतुंण, झणझण, फड फड, वाजवितां हें काय? सांगानात? तुह्मी तर मोठें थोर दिसतां काय बुवा मतलबी? अपलें तेवढें झांकझाकून ठेवायच आणि दुसऱ्यास मात्र तुम्ही कोण? तुम्ही कोण तुमचें वृत्त सांगा म्हणयाचं. (मोठ्यानें हसून) आपणाशींच„ हं, किती हसावें? वडील धाडील वसलेत.

सु०—शाबासा बाबा शाबास. आज तुझी विद्वत्ता चातुर्य तसेच समय सुचकतां पाहून हे सभासद फार आनंद पावले अस्तुं आतां वेळ फार झाला, अद्याप पुढें चरित्र फार होणें आहे, आतां माझें नांव व मी करणार काय? आणि हें संपूर्ण सभासद कां मिळालेत. हा सर्व प्रकार थोडक्यांत सांगतों, श्रवण कर. मांझें नांव सुत्रधार, आणि (पुढें बोलणार तों) वि०—हां हां आतां ठीक झालें, पण कांहों नेहमीं आखंड धार असतीना? कां मधी कधीं बंद पडत असती ह्मणजे आपला श्रावाण मासांतला खर्च वाचला. तुम्हालाच मुर्तीमंत नेऊन महादेवावर आडवें टांगिलें, म्हणजे हवी तितकी धारचधार.

सु०—वाहावा. तुम्ही तर अरण्यपंडितच अहां, पण अशी ज्या त्या गोष्टीवर टिका जर कराल, तर आम्हाला सर्व सरंजाम घेऊन मुकाट्यानें घरीं गेलें पाहिजे. तर

कृपा करून, मी काय रस भरित चरित्र करणार हें पाहून जर आपण ही थोडी बहूत मदत कराल, तर या सर्व सभासदांचें मनरंजन होऊन माझे ही श्रमांचें सारथक्य होईल, पण हें सर्व आपले हातीं आहे.

वि०—हो हो? मदत करण्याचें काम माझें. पूर्वीं एकदां रामभटजीच्या वासराची गाय चुकली तेव्हां तीन दिवस दिवसांची रात्र करून हिंडलों, पण गाय मिळवून आणली. झालें, मग दोघांची दृष्टी भेट झाल्या बरोबर वासरूं जेव्हां पान्हवलें, तेव्हां मग गाय तर पिऊन दमली तरी पान्हा राहिना. शेवटीं मग, मीं तोंड लावुन दूध प्यालों-न् ऐकतां काय?

सु०—अरे, तें मी विचारीत नाहीं; आणि तसली मदत मला नको. अह्मां सर्वांत, सर्व रसांची अनुकुलतां असून एक हस्यरसाची मात्र कमतरतां आहे, तेव्हां जेथें जेथें आमच्याकडून कांहीं न्युन पडेल, तेथें तेथें तूं आपल्या हस्यरसांनीं पूर्णतां करीत जावी. आतां पहा तुला येथें काय चमत्कार दाखवितों. प्रथम विघ्न निवारणार्थ गणपतीचें स्तवन करून त्यांस प्रत्यक्ष येथें आणवितों.. घे दर्शन. सु० (आंत जातों) पडदा पडतो.

(पडद्याचे आंत).

सु०—(दिर्घस्वरानें) हे गज्यानना, हे गौरीसुता, हे वक्रतुंड, हे गणनायका, हे शुर्पकर्णा, हे भक्तप्रिया, हे विद्याधरा, या अल्पमती पामराचें वांच्छित पुरविण्यास एकवार ह्या रंगभूमिप्रित प्राप्त होऊन तुझ्या पादपंकज दासास पूर्ण आशिर्वाद द्यावा. हे प्रभो, आपण कसे आहात; दयेचें केवळ सागर, मुर्तीमंत ज्ञानमय तसेंच दिनाचे नाथ, सकळ देवांत श्रेष्ट असा जो तूं आदिईश्वर; तुजप्रत न-

मस्कार असो; असें स्तवन होत आहे तों एकदम सहस्त्र सूर्यांचें तेज असा दिव्य प्रकाश होऊन चहूंकडेस केशर कस्तुरिचा परीमळ भरून राहिला. तशीच नानाप्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं. इतक्यांत.

**सु०**—(बाहेर येऊन) अरे विदूषका, पहा आतां काय थाट आहे तो; गजानन महाराजाची स्वारी येत आहे.

(पडदावर होतो).

**सु०**—(गजाननाची स्वारी आली पाहून) यावें, यावें परमेश्वरा यावें. या सिंहासनावर बसावें (गणपती बसतात).

**सु०**—वंदन करतो महाराज.

**गणपती०**—हे सुत्रधारा, वच्छा, तुजप्रत कल्याण असो. बालका, कैलासपर्वताचे ठायीं आदिईश्वर जो गिरजारमण भोळा शंकर, त्याचे आग्रभागीं महा अनंदांत तल्लीन होतच्छाता, मी गायन करीत होतो ; इतक्यांत तुझी दिन वाणी श्रवण करून मनोवेगानें या ठिकाणी प्राप्त झालो. वच्छा माझ्या अगमनाची इच्छा किमर्थ केलीस.

**सु०**—हे शिद्धीविनायक या रंगमंडपाचे ठायीं कांहीं अद्भूत चरित्र नाटक रूपानें दाखविण्याचें या पामरान मनांत आणलें आहे. परंतु बुद्धीदाते आपण आहात, आपलें आज्ञे शिवाय वृक्षपत्र हालणें कठीण, मग हें महत कार्य कोठून होणार?

**गण०**—हे सुत्रधारा, तूं जो विचार केला आहेस, तो सिद्धीस जाऊन या सभासदांचें पूर्ण मनोरंजन करशील हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे.

**सु०**—महाराज, आपल्या आशिर्वादें करून कार्य सिद्धिस जाईल. ही तर शंकाच नको. परंतु (हात जोडून) आणीक एक महा संकट आहे.

गणपती——वच्छा, कोणतें संकट आहे तें निवेदन कर.

सुत्र०——हे विघ्नांतका, माझी संपूर्ण नाटकपात्रें अज्ञान व लहान बालकें आहेत ; तेव्हां सभासदापुढें मिष्ट भाषणें करून मनरंजन करण्यास कसें समर्थ होतील? हें मोठें संकट आहे, महाराज.

गण०——वच्छा, सांगतो हें श्रवण कर. ब्रम्हकुमारी, जी सरस्वती, तिचें तूं स्तवन कर, म्हणजें तुझें सर्व हेतु पूर्ण होतील. आतां मी स्वस्थानाप्रत गमन अरतो.

सुत्र०——कृपा करून क्षणभर स्थीर असावें महाराज, सरस्वती मातोश्रीचें स्तवन करून त्यांस आतांच येथें आणवितो, असें ह्मणून पडद्याच्या आंत जातो.

(पडद्याचें आंत.)

सुत्र०——(दीर्घ स्वरानें) हें सरस्वती मातोश्री, हें आदिमाये, हे जगतजननी, हें भक्तवरदायनी, हें भक्तप्रिये, हें त्रिपूरसुंदरी, हें हंसवाहिनी, हें वागेश्वरी, या दीन वच्छावर कृपा दृष्टी प्रेमपान्हा सोडून, दासाचें हृदगत पूर्ण करावें; आणि एकवार या रंगमंडपीं प्राप्त होऊन बालकास पूर्ण अशिर्वाद द्यावा. ही प्रार्थना आहे.

सु०——(बाहेर येऊन) अरे विदुशका मातोश्रीची स्वारी येत आहे, नीट मर्यादेनें उभा रहा.

वि०——हो येऊंद्या त्यांना. मी आपले पाय डोकींवर घेऊन मुडद्या सारखा उभाच आहे.

सु०——(रागावून) हीकां थट्टेची वेळ, कारे? इतक्यांत (सरस्वती मातोश्री आल्या पाहून) यावें, यावें, मातोश्री यावें. हें गजानन बसलें आहेत ह्याचें सन्निधानीं बसावें.

सरस्वती——मयुरावर बसून तालसुरावर नाचत, नाचत, रंगमंडपीं प्राप्त होतात.

सु०—वंदन करतों, मातोश्री.

स०—बालका तुजप्रत कल्याण असो.—वच्छा, सत्यलोकांचे ठायीं स्कंदीं विणा घेऊन; अदी, अंत ना मध्य असा जो शडगुणऐश्वर्य संपन्न भगवान, त्याचे गुणानुवाद गायन करीत असतां, गीत संगीत नृत्यांत निमग्न होतें, इतक्यांत तुझा करूणा शद्ब कर्णीं आला, ह्मणून मयोरारुढ होऊन या रंगभूमीचे ठायीं प्राप्त झालें. बालका, माझ्या आगमनाची इच्छा किमर्थ केलीस?

सु०—मातोश्री सांगतो श्रवण करावें. यत्किंचित् पामरानें कांहीं कल्पित चरित्र नाटक रूपानी या सभासदांस दाखविण्याचे मनांत आणिलें आहे. परंतु माझीं पात्रें अज्ञान मुखदुर्बळ तेव्हां मधूर भाषण करून सभासदांचें मनरंजन करण्यास असमर्थ आहेत. असें जाणून आपली प्रार्थना केली. हें अंबिके, आपले कृपेकरून मुकें ही ब्रहस्पतीवत् होतात, तसेंच जन्मांध ही रत्नपारखी होतील, पंगू पर्वत शिखरें चढतील शतमुर्ख वेदांत ज्ञानी होतील; ही आपली सत्ता. तेव्हां मज गरीबाचे यत्किंचित् हेतू पूर्ण होणार नाहींत काय?

सर०—वच्छा, सुत्रधारा, तुझी अज्ञान बालकें बृहस्पतीवत् भाषणें करून या सर्व सभासदांचें मनरंजन करतील हा माझा पूर्ण अशिर्वाद आहे. आतां मी स्वस्थानाप्रत गमन करते.

सु०—यावें मातोश्री यावें, वंदन करतो.

सर०—कल्याण असो (सरस्वती जाऊं लागतें) इतक्यात·

वि०—आहो! आहो! आईसाहेब? कां! मागल्या पायीं पळ काढला?

सर०—अरे पळूं कशास? भक्तकार्याकरितां आले होते,

त्यांचें वांछित पूर्ण केलें; आतां स्वस्थळाप्रत जाण्यास काय प्रत्यवाय?

वि०—या ठिकाणीं तुमचा कोण भक्त होता, आणि वांछित् कोणाचें पूर्ण केलें?

सर०—अरे, या ठिकाणीं मत्भक्त परायण जो सुत्रधार त्या करितां माझें अगमन झालें, आणि त्यासच वर प्रदान दिलें,

वि०—(सुत्रधारास हाक मारून) काहो सुत्रधार तुह्मी तरी मोठें आपमतलबी दिसतां? पूर्वी आम्हाला म्हणाला-त कीं, या ठिकाणीं तुह्मी आणि मी मिळून एक सुंदर चरित्र करूं, आणि जो लाभ होईल तो समसमान वाटून घेऊं. आणि आतां आपल्याच पोळीवर तूप ओढलें कीं नाहीं? सरस्वती बाबानें जें कांहीं दिलें तें एकट्यानें च गट्टम केलेना? शाबास, असें असेल तर आह्मी आपलें चालतें होतों. " चला आटपाहो मंडळी. जा घरीं, चला. हे आह्मी चाललो," विझवा हांड्या, (विदुषक जातो पाहुन)

सु०—अरे हें काय? अशी घटकोघटकीं तुझी तबियेत जाऊं लागली, तर मग पुढें चरित्र होणें आनंदच दिसतो! हीच कां ती मदत करणार? सरस्वती मातोश्रीनें जें वरप्रदान दिलें, तें मला एकट्यालाच नव्हे. तर, त्यांचे आशिर्वादानें सर्वांचें कल्याण होणार आहे. आणि तुला दर्शन झालें, हा केवढा लाभ झाला समजत नाहीं का? तुला आणीक कांहीं प्रथक् मागणें असल्यास मागून घे.

वि०—हो! असें वाटेवर या. मी आतां मागून घेतों. (सरस्वतीचे पुढें जाऊन) वंदन करतों मातोश्री.

स०—कल्याण असो. तूं कोण आणि काय इच्छा आहे?

वि०—मी आपला (गांगरून) छेबा तसे काहीं नाहीं, मी आपला आहे.

स०—अरे, तुझी काय इच्छा आहे? ती बोल सत्वर. मला सत्यलोकीं जाण्यास विलंब झाला.

वि०—माझी इच्छा होय, आताशीं माझ्या मनांत (थोड घोटाळून) पायांनीं चालावें असें आलें आहे, कारण हात फार दमले आमचे.

स०—ठीक आहे, तुझे सर्व हेतु पूर्ण होतील. असें ह्मणून (सरस्वती अदृश्य होते.) (सरस्वती गेल्यानंतर.)

गजा०—हे सुत्रधारा, पहा सरस्वतीचें नृत्य, गीत ऐकून मम मानसाचें ठायीं फार आल्हाद झाला. वच्छा, आतां मी कैलासभुवनाचें ठायीं गमन करतों.

सु०—यावें, गजानना यावें, (गणपती आदृश्य होतात.)

पडदा पडतो.

वि०— (पडद्याचे बाहेर येऊन) आहो, सुत्रधार इकडे या, असें जवळ या पाहूं.

सु०—जवळ येऊन, हा आलो पहा, काय ह्मणतोस?

वि०—आहो आतां आले होतें, हें कोण? तुह्मी तरी बंगाली विद्या शिकला असें वाटतें. एकून कळसुत्रीपणा असा तुह्मी करावा. काय ? चित्रें नाचली इतका वेळ मला तर झोप सुद्धां येईना, बरें तें असो. आणीक कांहीं असलीं चित्रें तुमच्या पेटारींत आहेत काय? असलीं तर येऊद्यां बाहेर.

सु०—अरे वेड्या, हीं कां चित्रें नाचलीं ? अरे पूर्वीं आले

तें विन्घहरतें शंकराचे पुत्र त्याना गजानन ह्मणतात, आणि मागून आली ती ब्रह्मकुमारी. अरें त्या दोघानीं पूर्ण आशिर्वाद दिला, आतां आपणास विघ्नाचे भय ह्मणून बिलकूल नाहीं; आणि त्यांच्या कृपेनें आपले सर्व हेतू पूर्ण होतील. असो, आता रात्र फार झाली, मीं खेळास आरंभ करतों. आतां येथें (विदुषकाचे पाठीवर हात ठेऊन सांगतो.) प्रथम भुवनसुंदरी व तिच्या सख्या त्यांचें मन वेधक भाषण होईल, आणि नंतर ते विलास बागेंत जातील. हा सर्व प्रकार हुबेहूब करून दाखवितो, लक्ष दे.

वि०—वः मोठी मौजच होणार तर मग? सुत्रधार, जलदी करा तर, एकदां विलास बागेंत जाण्याचें माझेंही मनात आले आहे.

पडदा पडतो.

## प्रवेश २

### स्थळ श्रृंगारपुरींतील, राणिचा रंगमहाल.

### पात्रें

भुवनसुंदरी ................ भुवनपाल राजाची स्त्री
सुमित्रा ..................... तिची आवडती दासी.
चंद्रभागा ..................... उपाध्याची स्त्री.
भुवनपाल ..................... श्रृंगारपुरीचा राजा.
भालचंद्रभट ................. राजाचे उपाध्ये.
विदुषक ..................... सर्वांचें मनरंजन करणारा.

**रंगमहाल.**

**चंद्रभागा.**—सुमित्रें, आज कशी काय तबित आहे ? ठिक आहेना ? आज सकाळपासून बाईसाहेबांची भेटच नाहीं, म्हणून समाचारास आलें होतें.

**सुमित्रा०**—(नाकावर बोट ठेऊन). हं हाळू बोला. सवारी आतांच वाईच लवंडली आहे.

**चंद्र०**—कां बरें, आज कांहीं अधिक उणें झालें कीं काय ? जरा इकडे ये दाराबाहेर.

**सुमि०**—(हातानें खुण करून) नको. (दारा जवळ येऊन) बाईसाहेब जाग्या झाल्यातर मंग उगीच राग भरत्याली.

**चंद्र०**—कागे काय झालें ? पण मी कांहीं (हळूच बेतानें) हिकडचें तिकडें अगदीं बोलावयाची नाहीं. तूं आपली गरीब बापडी, बोलून उगीच तुझ्या पोटावर कां पाय आणीन ?

**सुमि०**—अहो काय झालंया, म्हनून, काय विचारतां ?

कांहीं नवीन कां झालया ? जें है तें पहिलच है, आन तें बोसंमद्यास ठाव है. आज सकाळी सरकारची सवारि आलिया त्यांच्या आंदीच बगा, आपली सैनापतीची बाईल, रखमाबाइ नव्ह कां ? ती हित आली, आन जरा बाईसाब आंन त्या जरा कांहि एक मेकिला म्हनाल्या. मंग बाई, रखमाबाई बी उठून गेली, आन तवाधरून जी बाई साहेबांची तबीयेत बिघडली. ट. आ. आमासनी, असें झालया कीं देवा ? हें काय संकट आन् काय दुःख हें. बाईसाहेब पलंगावर गडबड्या लोळत, आन् खाईनात पिईनात, काय नाहीं, डागिनें बी झोंकून दिलें. लई धांदल झाली बगा, तो नवा शालू नाहीं कां आनला ? तो नवा. त्याचा रंग बिंगबी लयी नामी दिसतो या तो.

**चं०**—हं(मनांत समजून) तो हिरवागार, दुगोली. परवांच "माणकोजीनें पैठणाहून पाठविला तो" मग त्याचें कसें काय झालें ?

**सुभि०**—झालं काय , त्या धांधलींत त्योबि जरा चिरकलान काय ? मंग तित सरकार आल (हळूंच) त्यांचा तरी आक्शी जीव परान बाईसाहेबावर. मंग बाईसाहेबासनी बगा त्यानीं मांडिवर घेतल. अन मग काय ते सुख सोहळ ? इतक्यांत (बाईसाहेबाची हांक आलीसे वाटून जीं जीअं, आलें हो बाईसाहेब (धांदलीनें आंत जाते.)

**सुभि०**—(धांवत जवळ येऊन) काय सरकार ?

**भुवन०**—आग मेल घटकाभर कां जवळ बसूंनये ? उठ पळ बाहेर उठ पळ बाहेर. हें काय बाई ? तो मेला

शिवऱ्या आला असेल बाहेर, म्हणून पाहरा सोडून गेली अस्सील?

सुमि०—नाहीं बाईसाब, एकदां माणसापून घडलं म्हनून, यिळभर सारं तेच कां मनांत धरत्यात. आपन बाईसाब त्या दिवशीं रागं भरल्यात, त्या दिसापून मंग त्या मेल्याचें तोंड नाहीं पाहिलं.

वि०—(कान देऊन ऐकून हळूच) कांगे? सांगूं कां आतां? त्या दिवशीं तबेल्यांत त्याला चणें कोण देत होतं? मी मागितलें तर मला देत नाहीं म्हणाली नाहीं?

सुमि—(हातानें खुण करून) सांगू नको, मंग तुला बी देईन.

वि०—बरें तर मग, पण भाजून देशीलना?

सुमि०—हो.

भुव०—अग, इतक्यांत मला डोळा लागला न लागला तर लागलीच बाहेर गेलीसना?

सुमि०—बाईसाब, त्या चंद्रभागाबाई आल्यात तितं बाहेर उभ्याहेत. त्यांनीं जरा दाराजवळ बाहिलें म्हनुन गेले.

भुव०—कोण, चंद्रभागाबाई कां आल्यात, मग त्यांना बाहेर कां उभें केलें? आंत बोलाव.

सुमि०—होय बाईसाब बोलावतें. (लगबगीनें बाहेर येऊन) चंद्रभागाबाई बाईसाब जाग्या झाल्यांत अन तुम्हासनी बोलवित्यात.

चंद्र०—(आंत येऊन) कां आज फारशी झोप?

भुव०—(चंद्रभागाबाई आली पाहून) या हो तुह्मी या, येथें बसा.

चंद्र०—होय सरकार, तुम्ही कशाला उटतां पलंगावरून. मी तुम्हाजवळच बसतें. (पलंगावर बसून) कां आज असें दिलगीर कां? चेहरा अगदीं सुकून फिक्कट दि-

सतो आहे? तुमच्या मनांत तरी काय आहे? असें मनांतलें मनांत झुरझुरून अगदीं अस्तीचर्म मात्र राहिलें. असें केल्यानें, परिणाम कांहीं ठीक दिसत नाहीं. कसें सुमत्रे? जी गोष्ट आपल्या स्वाधीनची नाहीं, त्याकरितां वाईट वाटून उपयोग काय? मर्जी देवाची. आतां आमच्या वरूनच अनुभव पहानात? आज मुंज झाली असती. पण तें होणार कोठून? "आले देवाजीच्या मना आणि तेथें कोणाचें चालेना?" (कष्टी होऊन) आपण वाहिलेंच नाहीं मग घ्यावें कोठून? तुम्ही नाहीं म्हणून हका मारतां, आणि आम्ही होऊन, नाहीं म्हणून हका मारतों; मिळून फळ एकच. असो, पण तुह्मी आतां असें दुखणें घेणार काय? आणि रोजच्या पेक्षां आज जास्ती वाईट वाटण्याचें कारण तरी काय?

**भुवन०**—नाहीं बाई, दुखणें कशाचें आणि तें तरी मला येत आहे? कोठें? शहरांत तरी चांगले मुलांबाळांचे धनी मरतात. पण देवा? मला करंटीला कां मरण येईना? (स्फुंदून स्फुंदून) जगदंबे, नको हा आतां जीव.

**चंद्र०**—हं, हें काय? असें भलतें भलतें बडबडतां? तुह्माला जीव नकोसा झाला पण आह्माला तुह्मा सारखी धणीन कोठून आणावी. तुह्माला काय कमी आहे? पूर्व जन्मीं हारताळका चांगल्या पुजल्या होत्या, ह्मणून अशा सार्वभौमराजाचे पदरीं पडलात. पहा, पृथ्वीवर मला तर कोणी आपल्या सारखी भाग्यवान स्त्री दृष्टी पडत नाहीं, आपलें ऐश्वर्य पाहून इंद्र ही लज्जीत होईल, पहा संपूर्ण पृथ्वी ज्याचे अरजव करती असा जो "भुवनपाल राजा" तो तुमच्या अगदीं मुठींत; मग काय कमी आहे? कागे सुमित्रे मी खरें ह्मणतें, कीं खोटें?

सुमि०—हें काय ह्मनावं बाई, आहो, महाराजांचा आक्सी जीव परान ह्यांच्यावर है, उलीसें डोकं दुखूं लागलं कीं, घाबरच होत्यात. मी लटकं बोल्त नाहीं. (वर बोट करून) सूर्य नारायन डोईवर है, असा जोडा काई संमद्या पिरथीमींत गवसायाचा नाहीं.

वि०—(हळूंच आंत येऊन) हो खरें तें, एक आमचा मात्र करकर वाजतो, मग कोणाचा जोडा नाहीं वाजत. (आपणाशींच) निटच आहे तें—वाजवी, फुकटच उपटून आणायाचा मग कां न वाजेल?

चंद्र०—(रागवून) बायका मध्यें तुझें काय काम आहेरे चावटा? चल नीघ येथून, कोण आहे बाहेर, सुमित्रे? पाहाऱ्यावर कोण आहे याला येथपर्यंत कोणीं येऊं दिला?

वि०—पळुन जातो. इतक्यांत—भालदार ललकारतो.

सुमि०—सरकार आलं वाटतं—भालदार पुकारतोया.

चंद्र०—(झटकन उठून) खरेंच काय सुमित्रे? सरकार आलें? तर मी जातें बाई, बाई साहेब मी येतें हों.

भुव०—येताका? याहो, आतां कधीं भेटाल?

चंद्र०—(हात जोडून) आपण लोभ करता ह्मणून मी नेहमीं अगदीं जवळ आहे.

भुव०—नंतर उद्यां भेटा हो माझें कांहीं काम आहे.

चंद्र०—ठीक आहे ह्मणून जातें. इतक्यांत भालदार (निगारखो मेहरबान सलाम—अस्ते चलना महारज,) असा पुकारतो; आणि महाराजांची स्वारी माहालांत येते.

सुमि०—(महाराज आलें पाहून) वंदन करून लांब कोपऱ्यांत उभी रहातें.

महा०—कांगे सुमित्रे? ही अशी कां आज निजलीं आहे? प्रकृती बरोबर नाहीं काय? (रागावून) काय तुह्मी मुर्ख

माणस आहात, प्रकृती इतकी, बिघडली तरी मला कोणीं कळविलें नाहीं. (पलंगावर बसून मनाशींच) आज अशी काय व्यवस्था झाली, हीं ! मुख कोमेजून गेलें आहे, अलंकार विसकटून पडलेत; वस्त्र काय विगलीत झालें ? हें काय ? (घाबरून) सुमित्रे केव्हांपासून हिची तब्बेत बिघडली, आणि कारण तरी काय ?

**सुमि०**—(घाबरून थर थर कापू लागली,) (भीत भीत हात जोडून) सरकार सैनापतीची अस्तुरी रखमाबाई येऊन गेल्यापून हें सर्व झालं है. म्हनजे मंगा आपून गेल्यापून जें है तें हैं.

**महा०**—आग पण मघाशीं इतकी नादुरस्त नव्हती, मीं तेव्हांच काय झालें म्हणून विचारिलें, पण तेव्हां "उगीच जरा मस्तक चढलें आहे" ह्मणून सांगितलें. मग मीं केशर वगैरे तुझ्या हातून मस्तकास चोळवून गेलो कीं, नाहीं ? कारण दिवस जरा थंडिचे असल्यामुळें शैत्यानें प्रकृती कधीं कमी जास्त होत असती ; म्हणून मी आपला त्या भरावर गेलो, नाहीं तर, (मुख कुर्वाळून) मी आपल्या प्राणप्रियेला असा सोडून गेलों असतों काय ? आतां खात्री झाली कीं, हें कांहीं डोकें दुखणें नव्हे ; कांहीं तरी संतापानें प्रकृती बिघडली असावी, असें ह्मणून (भुवनसुंदरीचें मस्तक मांडींवर घेऊं लागतो).

**भुवन०**—(रागानें) मोठ्या झटक्यानें मांडींवरून डोकें खालीं घेते.

**महा०**—अग पण झालें काय ? तुझें डोकें दुखतें कां ? होतें तरी काय ? एकदां सांग. (हनवटी धरून) तुला कोणी बोललें होय ? अशी रागावलीस कां ?

**भुवन०**—(तोऱ्यानें) माझे अंगास हात लाऊ नका, व्हा

पलिकडे, हें काय पण? हा काय लोचटपणा. मला आपलें कांहीं होईना, इकडे त्याची काळजी कशास?

महा०—नाहीं पण असें काय करतेस, तुझी काळजी मी करणार, किंवा माझी तूं करणार, या खेरीज कोणी तिऱ्हाईत कां काळजी करील? सांग बरें? तूं आपल्या मनांत विचार कर कीं, तुला असें कमीजास्ती वाटत असल्यावर, मला चैन पडेल काय? सर्व काय तो पंचप्राण (चुंबन घेण्यास मुख पुढें करून) इकडे. कचेरीत गेलो तरी, लक्ष इकडे, काय मोहनी केली आहे कोण जाणे?

भुवन०—पुरे, पुरे आतां (राजास थोडे पलिकडे ढकलून) "वरून वरून मरून जाईन आणि काळीज बोका खाऊन जाईन". हें कां मला समजत नाहीं काय? सुमित्रे, आतां कशालाग इकडे येणं झालं. मी बोलाउन का पाठविलं होतं, माझं मेलं आतां काय? मला विचारितो कोण? आणि पुसतो कोण? आतां काय ती मुकत्यारीण ती केली आहेनं, ती सांगल तसं वागायच कुठ बसली होती तप करीत! (दुःखाचा सुस्कारा टाकून) जें प्रारब्धीं होतं तें घडून आलं आतां मेलं त्याचं वाईट वाटून तरी काय? कारण "लंगड तें लंगड गांव कोशी चरनं" जन असें म्हणल. काय बाई पूर्वी वाहल नाहीं, मग कोठून मिळणार? आतां मेलं आपलं काहीं तरी खाऊंन एकदां यातून सुटावं ह्मणजे झालं. देव तरी काय? मेलं गावातलं चागलें चागलें लोक मुला बाळाचें धनी तेव्हढे जातात, आणि माझंच मेलं नाव कोणत्या सांदाडिला पडलं आहे कोण जाणे? देवा, नको नको हा जिव, आतां नको. असें ह्मणून रडू लागतें.

भुहा०—(तिला पोटाशि धरून) अग पण हें काय ? (आपल्या शेल्याने तिचे डोळें पुसून आपल्या मनाशींच) हें कांहीं समजत नाहीं. या बोलण्यातला अर्थ काय ? जीवकां नको ? ती कां मुक्त्यारिण झाली ? हें मोहगम बोलणें कोण समजेल ? मी ह्मणजे कधी एक अक्षरानें सुद्धा दुखविलें नाहीं, उलटें ही सांगेल त्याच रितीनें वागतों. असें असून जर हि मजवर दुषण देईल, तर इश्वरइच्छा. (मुखकुर्वाळून) सखे, बोल, बोल आतां. पहा तुझ्या प्रितीबाणानें मी अगदी व्याकूळ झालो आहे. प्राणप्रियें, तुला कोणीं शब्दानें दुखविलं काय ? किंवा खाजगी कारभाऱ्यानें कांहीं जिन्नस देण्यात अळस केला काय ? तूं सांग; ह्मणजे कोणतेंही कार्य दुर्लभ असलें तरी हा भुवनपाल तुजकर्ता वेळेस प्राणही खर्ची घालील, परंतु कार्य सिद्धी करील. पहा चद्रंवदनें, राजकिय प्रापंचिक कामांत दिवसभर कितीही ताप झाला तरी तुझा मुखचद्रं पाहिल्या बरोबर माझा ताप दुर होतो; ही तुझी योग्यता. मी खचीत सांगतों कीं, माझे संपूर्ण सुखाची तूं खाणच आहेस, हें वरकातीं बोलणे नव्हें, खरोखरीच तूं भाग्यशाली आहेस. असो आतां एकदां सर्व राग सोडून मोकळें मनानें मज जवळ बोल. तुझा दुर्घट हेतू असला तरी मी पुर्वीण्यास समर्थ आहे. ये, अशी जवळ ये. (जवळ घेतों.)

भुवन०—मी नाहीं जा, मी कशास जवळ व्हावी? जवळ येणारी आतां आवडती पाहिली आहेनं ? तो येईल जवळ. माझें मेलं काय? "दर्यामें खसखस" (राजा समजावितो तो तो अधिकच उमासा येउन) आतां काय त्याचं "पदरीं पडलं आणि पवित्र झालं" तशी गत.

महा०—तूं नाहींना सांगत, चल आतां मीच आपलें काळें करतों; असें ह्मणून म्यानांतून तरवार काढून आपलें मानेवर ठेवितो. चल आतां संभाळ आपलें राज्य. हा मी जाललों पहा.

भुवन०—(तरवार मानेवर पाहून फार घाबरली) आग हें काय? कोण राग हा, [जलदीनें] आग सुमित्रे धांव, धांव लवकर. असें ह्मणून मोठ्या झटक्यानें राजाचें हातची तरवार हिसकाऊन घेते. (गळ्याला मिठी घालून) आग बाई! परमेश्वरानेंच आज खैर केली. इतक्या निकरास जाईल हें मला काय बाई माहित! अथःपर (आपले हातानें तोडांत मारून घेऊन) चुकलें बाई! काय तरी राग? मी आपलं नित्याप्रमाणें समजलें. पण सुमित्रे, शर्थ झाली. म्हणजे काय तें आखेर मजवर दूषण ठेवायचं. बरं असो( सर्व आपेशाची काय ती मीच)

महा०—०चल सोड आतां, कां माझी तरवार हिसकाऊन घेतली? तुला नाहींनां सांगायचें काय झालें तें? मग उगीच मला कां आडथळा.

भुवन०—(मोठ्या प्रेमानें मिठी घालून) हो, हो, पुरे आतां आवसान, काय तो शूरपणा माझे भोंवतींच यायचा. पण! एक आतां साखरेचा * * * *

(इतक्यात विदूषक हळूच आंत प्रवेश करून.)

वि०—काय बुवा गम्मत? एकून यांचे पेक्षां मी बरा. पर्वा एकदा माझें बायकोवर मी जेव्हां रुसलों कीं नाहीं सुमित्रे, तेव्हां मग काय विचारतेस! ती तर पाया पडून पडून दमलीच; परंतु शेवट मीं तिला साष्टांग नमस्कार घातला; तरी माझा राग कांहीं जाईना. मग त्या रात्रीं खीर केली,

आणि (इतक्यांत सरकार आपल्याला पाहतात असें पाहून) मागल्या पाई पळतो.

महा०—पण नाहीं आतां आह्मालां साखरेचा घ्यावयाचा. मघाची तुचका ? आह्माकडून कितीहि जरी जिव तोडला तरी बायकाना ह्मणून दया नाहीं.

भुव०—पण बाई हे काय ? चुकलेंन आतां, पुनः असं नाहीं करणार.

महा०—बरें तर मग ये जवळ.

भुव०—मी नाहींजा, गरज असेल तर ! (अर्धेच बोलून)

महा०—अजुन मलाचकां गरज ? बरें मग, असें ह्मणून जवळ घेतात.

भुव०—(किंचित हसून) राजाजवळ येतें. (इतक्यांत.)


वि०—झालं हो झालं आतां राग लोभ गेला, काय अवसान तरी आणलें होतें? मीं आपला भाबडा मनुष्य माझे आंगाचा जो थरकाप झाला तो कहीं अजून गेला नाहीं. सुमित्रे जरा माझ्या छातीस हात लाव बरं, काय धड धड करती आहे, जशा तोफा सुटतात. एकून बायकापुढें तरवारिच सुद्धा पाणी झालं मग मनुष्याची काय कथा, का सुमित्रे; खर कां खोटं ?

सु०—अरे, सरकार ऐकत्यात पन तूं मंगापून बडबड करतो हायेस ? पन एकदम वढं निघल मंग.

वि०—पण मी हातीं लागेन तेव्हां नां ? मी काय कमी आहे कां ? बारा पिंपळावरला मुंज्या. (इतक्यांत.)

भुवन०—(मोठ्या रागानें) काय आहेग सुमित्रे ? काय गडबड आहे, चल तूं बाहेर जाऊन दरवाजा लाऊन घे.

सुमि०—होय बाईसाब. (विदुषकास) चल हो बाहेर


भुवनपाल
भुवनसुंदरी
दासी
कचेरी

नाइतर बाइसायबासनी सांगतें. विदूषक पळून जातो. आणि सुमित्रा दार लाऊन घेऊन बाहेर जाते.

**महा०**——कां? आतां कोणी नाहीं येथें. मघां इतकीं प्रकृती कां नादुरस्त झाली होती?

**भुवन०**——असो मेलं, झालं गेलं आतां त्याचें काय आहे!

**महा०**——नाहींपण, मला आगदीं चटका लागून गेला आहे.

**भुवन०**——सांगूच कां आतां. मी आपलं ऐकलं तें सांगतें हो, खरं खोटं तें मला माहित नाहीं.

**महा०**——बरं तूं ऐकलं असशील तेंच सांग.

**भुवन०**——आज सकाळीं मीं आपलं रोजच्या प्रमाणें तुळसिला पाणी घातलं आणि तिच्या पुढें स्वस्तिक काढीत होतें( इतक्यांत रखमाबाई म्हणजे सेनापतीची बायको)

**महा०**——हं समजलों, पुढें बोल.

**भुवन०**——ती आली, मीं तिला विचारलं कीं, रखमाबाई आज सकाळींच कुणीकडे आलात? ती ह्मणाली, उगीच फार दिवस भेटीला झाले ह्मणून आले. मग माझं स्वस्तिक काढणं झालं, आणि आह्मी दोघीहीं देवघरच्या समोर चोपाळा आहेकीं नाही? तिथं बसलों. मग बाई जरा इकडचा तिकडचा गोष्टी झाल्या, आणि पटादिशी तीन मला विचारलं.—"काहो राणीसाहेब? मीं एक आज गोष्ट आयकिली आहे ती खरी काहो? आणि ती जर खरी असेल तर आमचं प्रालब्धच समजलं ह्मणायचं" असं तिचं बोलणं ऐकून मीं बाई मग तिला सांगण्याविषयीं आग्रहच केला. मगतिनें मीं कोणाजवळ बोलूनये ह्मणून मज जवळून शपत घेऊन मला ह्मणालि. "राणीसाहेब! आजअसंऐकिलं आहेकी, आपले सरकार द्वितिय संमंध करणार, हीबातमी गांवात मोठी दाट पसर-

ली, आहे मग खरं खोटं परमेश्वर जाणे." सरकार, असं रखमाबाइच्या तोंडचं ऐकल्यां पासून मलाचैन पडेना. ह्मठलं असतां माझं कांहीं त्यांतकमी होतं असं नाहीं. पण बाइ जिवकोठें राहतो? तेव्हांपासून अंगाची आग होऊन गेली आहे, सरकार तुह्माला माझी शपत आहे खरं काहो हें ?

माहा०—हा वेडे, हेंच कातें कारण ? एकुन तुह्मी बयका हलक्या मनाच्या खऱ्या. कोणत्याही कामाची पुरी चवकशी केल्यावाचून, असा अनर्थ करणें हें बरोबर नाहीं, आसो. आतां खचीतच सांगतो कीं, ह्या पैकी कांहीं खरे नाहीं, पर्वा सोमदत्तराजाच्या लेकीची कोणी तसबीर आणली होती. आणि प्रधान वगैरे मंडळींनीं मला त्या गोष्टी विषयीं पुष्कळच आग्रह केला, परंतु मीं साफ नाहीं ह्मटलें. कारण संतती करतांच एव्हढी आटाआट करायाची. मग आपल्या प्रालब्धी असेल तर, आणि शंकराचे मनांत देणें असेल तर, तुलाच नाहीं कां मुलगा होणार ? काय तुझे दिवस कां गेले ? त्यांचेमनांत आल्यावर पाहिजे तें होइल. पण खरेंच सांग ? (जवळ घेऊन) प्रथम तुला कोणती हौस, मुलगा किंवा मुलगी ?

भुव०—(लाजून व खालीं मान घालून) मला नाहीं तें माहीत. हें काय भलतंच विचारणं.

महा०—पण आता मघाचा एकदां साखरेचा * *

भुव०—नको होता, मग कशास आतां ? (अर्धेच बोलून) ?

महा०—अग, तेव्हांच गेलें. आतां काय त्याचें.

भुव०—हो बरी आठवण झाली, मी फारदिवस विचारिन, विचारिन ह्मणत होतें कीं, मला एकदां विलास बागेंत जाणें आहे, तिथली सुमंगलादेवी फार लोकाना नवसास

पावते म्हणून ऐकिलें, म्हणून एकदा मनांत आले आहें, पण इकडची आज्ञा होईल तेव्हां.

महा०—काय पण आज्ञा, जसे तसेच वागणे होत असतें.

भुव०—या करताच कोणती गोष्ट मी विचारीत नाही, मनांत नसलं, म्हणजे मग कांहीं तरी पुढं वाकडं यायचं, चला, नाहीतर नाहीं इथं कोण जाण्यास खोळांबलं?

महा०—झाले पुनः वेताळ आला का पुर्व स्थळावर? मीं तुला नको जाऊ का ह्मटलं? तूं तरी अगदी जबाब काढू देईनास. उद्यां कर तयारी. मीही सर्वास हुकूम देतो. ह्मणजे तेथें गेल्यावर जरा हवाही बदलेल, आणि मनाची थोडी उदासिहि मोडेल, ते सर्वच ठिक होईल. चल आतां जाऊं मी?

भुव०—जा कोणी ह्मणावं आणि बसा कोणि ह्मणावं, मर्जीस यईल तसं व्हांयचं, बोलावं कोणीं? आतां रात्र थोडीकां झाली? पण रात्री सुद्धा काम असतं मेल, हें काय? रात्रंदिवस कोणाची मजुरी कां पतकरली?

महा०—बरेतर नाहीं जात; तुझ्या मर्जीप्रमाणें का होईना, नाहितर आणिक रुसवा झालातर समजावणें होणें कठीण.

भुव०—कायतरी माझी मर्जी, आणि आपले मनांत नाहि वाटतं? पण उगीच मन पाह्याचं; असें म्हणून, भुवनपाल व भुवनसुदरी निद्रिस्थ होतात.

(पडदा पडतो.)

## प्रवेश ३

### स्थळ भुवनपाल राजाची कचेरी.

### पात्रें

भुवनपाल ................ राजा.
सुविचार ................ राजाचा प्रधान.
शौर्यसागर................ सेनापती.
त्रिविक्रमशास्त्री ........ न्याय करणारे.
शिताराम जोशी........ मुहूर्त वगैरे जोतीष पहाणारे.
भालदार ................ सोन्याची काठी धरणारा.

**कचेरीची जागा.**

**महाराज**—(भुवनपाल राजा सिंहासनीं बसून) कोण आहे येथें भालदार?

**भाल०**—जी सरकार. चरनपर शिस धरतां हूं.

**महा०**—अबे तेरा कल्याण. सुनो भालदार? सुविचार प्रधानजीकूं जलदी ह्यां बुलाव.

**भा०**—आज्ञा खावंद. असें ह्मणून (पडद्यांत जातो) पुन. (बाहेर येऊन) "निगारखो, मेहेरबान, सलाम" प्रधानजीके निगापर, नजर रखो महाराज. इतक्यांत (प्रधानजी येऊन) वंदन करतों महाराज.

**महा०**—कल्याण असो प्रधानजी. प्रधानजी, आज कोणत्या गडबडींत आहांत? मी आज फार वेळ वाट पहातों आहें.

**प्र०**—[हात जोडून] सरकार, आज थोडा धांदलींत होतों तें आपण सांगितल्याप्रमाणें [थोडा घोटाळून] विलास बागेंतील, मधल्या जळ मंदिरांत चहूंकडे, सोनेरी वेल,

व फुलें काढविण्यांत गुंतलों होतों महाराज. एकून आतां "सोनाजी" सारखा चितारी ह्मणून पुनः होणें नाहीं ? काय सांगावें सरकार? आज त्यानें काम केलें आहे, तें अगदीं बीन मोल केलें आहे; ह्मणजें माझा आज सगळा दिवस तेथें मोडला, परंतु त्या बदल आज वाईट वाटलें नाहीं, कारण सरकारचे कामास वर्षोवर्षं जरी रात्रंदिवस बसावें लागलें, तरी हरकत नाहीं, परंतु कोणतेंही काम अप्रती व्हावें, ही इच्छा, आम्ही कितीही श्रमलों तरी, [राजाचे पायाकडे बोट करून] या पायाचें दर्शन झालें ह्मणजे अगदीं आनंद होऊन जातो ; गादीची पुन्याईच तशीं.

महा०–प्रधानजी, सर्व फुलें काढलिकां आज?

प्र०–कांहीं काढलीं माहाराज, बहुतेक निघालि ह्मणायची (इतक्यात विदुषक येऊन).

वि०–[हात जोडून] -सरकार प्रधानजी आज आठ दिवसांत तरी विलास बागेत गेले होते कां, ह्मणून विचारा बरं !

महा०–(विदुषक चाहडी करतो पाहून) अरे पण (ओटानें खुण करून) बोलूनको, गप्प.

वि०–मग तीं सिताफळें बरी एकट्यांनींच स्वाहा केली ? मी उगीच बायकोला डोहळे झाले ह्मणून मागितलीं, पण माझें ऐकतो कोण ? आणि पाहातो कोण ? तेव्हां मग आतां हि युक्ती काढली, कीं, आपण जरा राजा पुढें वढाई झोंकीत असला, ह्मणजे ती वेळ साजरी करावी.

प्र०–[हळूच] अरे, बोलूनको वेड्या तूं आणि मीं का दोन आहोत ? घरीं येऊन तुला हवी इतकी सिताफळें घेऊन जा. तूं कधी आलास, आणि आह्मी कधी

नाहीं ह्मटलें ; अरे सिताफळेंच काय ? जे कांहीं माझे आहे, ते सर्व तुझेच आहे.

वि०—हं, आतां ठिक, पण मी आपणास पक्के वोळखून आहे, हें बोलणें इथेंच कायते, कचेरिची पायरी उतरल्यावर मग वोळख नाहीं. असो, पण यावेळेस जातो आतां.

महा०—काहो प्रधानजी ?

प्र०—[धावत जवळ येऊन] जी सरकार.

महा०—तें दुसरें काम कोठपर्यंत आलें ? ह्मणजे विलास बागेंतील देविच्या देवळांत सहस्त्रधारी कारंजाचें काम चालू केलें होतें तें.

प्र०—होय, तें अगदि आटपत आलें, परंतु थोडी कसर आहे, [हात जोडून] ह्मणजे हुकूम झाला होता ; कीं कारंजाचे वरल्या आंगीं मोठें झाड लावण्याचा जो हलका तोंडात धरून मोर आहे, त्याचें पिसापर्यंत कारंजाचें पाणी उडावें, तें तितके उंच अझून उडत नाहीं, एव्हढिच कायती कसर. इतक्यांत, [त्रिविक्रमशात्री आले पाहून] भालदार पुकारतो.

महा०—प्रधानजी, भालदार कां पुकारला ?

प्र०—त्रिविमकशात्री आलेत, सरकार.

महा०—तर, मग उत्तमच झालें येउद्या आंत [त्रिविक्रमशास्त्री येतात.]

महा०—प्र०—[उत्थापन देऊन] यावें, यावें शास्त्रीबावा.

महा०—वंदन करतो महाराज.

शा०—राजा सांमराज्यंमस्तूं. भुवनपाला कचेरीत आल्याबरोबर, तुझा हा अदर सत्कार पाहून फार संतोष झाला [असे ह्मणून खालि बसतात] इतक्यांत सितारामजोशी येतात.

शा०—यावे, जोशीबोवा यावे [जोशी आल्याबरोबर] नमोनमः नमोनमः यावे, येथें बसावे जोशीबोवा. (जोशी.) नाहीं आपण बसावें. (विवि०) नाहीं आपण बसावें. दोघेहीं बसतात. इतक्यांत (विदुषक कांहीं नवीन सोंग घेऊन येतो.)

वि०—(कचेरिंत येऊन) नमोनमः नमोनमः शास्त्रीबोवा आलेकम सलाम.

त्रिवि०—अहो जोशीबोवा, हा कोण ?

जो०—माझा नव्हेवा कोणी ! मी म्हंटलें आपला विद्यार्थी आहे.

त्रिवि०—अरे तूं कोण ? आणि येथें येण्याचे काय प्रयोजन ? तुला येथील पाचारणकां आहे ?

वि०—आहो तुह्मी तरी शास्त्रीबोवा मोठें भोळें दिसता ! इतक्यांत विसरला, आहो मीं हुसेनभट बिन सोनाप्पाचार्य नव्हेकां ? पर्वा अबदुल्ल आलिचा येथें त्याचें मुलाची मुंज्य होती, तेव्हां तुह्मी आह्मी मिळून याज्ञिक नाहींकां गुंडाळं ! आणि हें जोशीबोवा मुहूर्त धरण्यास तेथें नवते कां ? होते. येकून इतक्यांतच वोळख विसरतानां ? एबात अच्छी नहीं.

त्रिवि०—अरे, कोण आहेरे येथें ! पाहऱ्यावर कोणी नाहीं काय ? (इतक्यांत भालदार येऊन त्या सोंगास घालवून देतो.)

महा०—का जोशीबोवा स्वस्तिक्षेमना ? तुमचे आणि शास्त्रीबावांच्या येण्यानी आज फारच सभेला शोभा आली.

शा०—खरें महाराज. सर्व या गादिचा आधीकार. पहा भुवनपाला, तुझी तोंडावरच स्तुती करावी असें नाहीं तूं या सिंव्हासनीं विराजमान झाल्यापासून एकेकांस सुख झालें ! अरे दोष दुष्काळ देशांतून पळाले, परचक्राची

भीती स्वप्नांत सुध्धा राहिली नाहीं, सर्व प्रजा अनंदांत निमग्न राहती आहे. प्रज्या व पदरचें सर्व कामगार वेळच्या वेळेस आपली कामें वजावित अहित. भुवनपाल असें नांव खरोखरीच तुला साजतें. का जोशीबोवा सत्य कीं मिथ्या?

जोशी०—हें काय विचारावें, असा पुनः व्हावयाचा नाहीं, आणि मागेहीं झाला नाहीं, असा सर्व प्रजेंच्या तें ंतून नेहमीं उदगार ऐकूं येतो. शाबास राजा श. ास. कारण राज्यांती नर्क ह्मणून जे, न्यायशास्त्र नेहमी ।णत असतं, ते अगदीं असत्य. तो न्याय कोणाल' लागूं? तुजसारख्या नितीनें वागणारालाकां? नाहीं ेव्हां तूं धन्य आहेस. कां शास्त्रीबोवा असेचना?

शा०—सत्य आहे. आह्मो धन्य म्हणजे काय केवळ ...इंद्राची जरी उपमा दिली तरी साजेल.

जोशी०—इंद्राची उपमा याला देणें अगदी वरोबर न..., कारण त्या इंद्राचें हातूंन आजपर्यंत सहस्त्रावधी अन्यायाचा गोष्टी घडल्या असतील! आणि त्या पायीं ..ांकित सर्व तनू झाली, हे तर प्रसिद्धच आहे. आणि भुवनपाल अजून शुद्ध धुतल्या मोत्यासारखा निर्मळ आहे, तेव्हां भुवनपालाची योग्यता विशेष.

शा०—आह्मो पर ते नव्हें, त्यातलें कारण असें (आपलें बोलणें जोशीबवानें मोडून काढलें पाहून जरा रागानें) हें काय? इंद्र तो इंद्र आणि भुवनपाल तो भुवनपाळ. इंद्रांनीं शंभर आश्वमेध यज्ञ केलें, आणि भुवनपालाने एक तरी केला काय? हें काय भलतेंच बोलणे. मला असें तोंड देखलें बोलणें बोलता येत नाहीं.

जो०—आह्मो पण पुण्य कर्मेही केलीं, आणि पाप कर्में तशीच

केलीं. ह्मणजे त्यांत झालें काय ? एवंच फळ एकच, आह्माला तोंड देखलें बोलणें बोलून काय करावयाचें आहे ! तुह्मीही गादिचे आश्रित, आणि आह्मीही गादीचे आश्रीत. त्यांत हो काय ! तुह्माला आमचें बोलणें रुचत नसलें, तर आह्मी आपले उठून जातों. म्हणून (रागानें उठून जाउ लागतो.)

शा०—तुह्मी कशाला, मीच बापडा जातो उठून, तुह्मी मिष्ट-भाषणी आहांत तेव्हां राजप्रिय आहांत, आम्ही आपले स्पष्ट वक्ते आहोंत तेंव्हां आमचे बोलणें सर्वांस कडू लागायचें. (दोघेहीं उठून हात पुढें करून एकमेकाशीं).

शा० आणि जो०—नाहीं पण तसें नव्हें, तुह्मी काय बोलला, नाहीं पण (हात पुढें करून) जो० तसें, काय ! हिकां रीत कां ! पण ! शा० नाहीं मी कधी असें बोललों, मीच असें बोलतों असें नाहीं, न्याय शास्त्र पहा ! जो०—पण असें नव्हें, धर्मशास्त्र आजच बुडालेकां ! शा०—आक्षेपण ! तो तुमचा बिषय नव्हे. इतक्यांत (विदुषक येतो).

वि०—हां, हां आतां ठिक झालें (मनांत आपण ही जरा मदत करावी) हं हं आहो शास्त्रीबोवा, आहो जोशीबावा हे काय ? हिकां मारामारी करतां काय ? तुह्मी तर अगदीं ताळच सोडला. शास्त्रीबोवांचे ह्मणणे रास्त आहे. नाहीं पण मला जोशीबावांचे सत्य वाटतें, ते कांहीं असो तुह्मी दोघे आतां छाप कागदावर आर्ज्या करा, आणि त्याचें वकिलपत्र मला द्या ह्मणजे वाद मिटेल, नाहींतर येथें खून पडतील, इतक्यांत (भालदार येऊन विदुषकास कचेरींतून हकून देतो.)

महा०—(हात जोडून) आहो त्रिविक्रमशास्त्री आहो सिताराम

जोशी, हे काय ? बोलतां बोलतां दोघेहीं तेरी मेरीवर आला. हें काय ? मज गरिबास इंद्राची उपमा कशास, आणि चंद्राची कशास ? मी आपला तुह्मा ब्राम्हणाचें पायाचा दास आहे. आणि इंद्र चंद्र तरी काय ? तुम्हा ब्राम्हणाचें कृपेनेच थोरपणा पावलेत. महाराज, उभयतां शांत व्हां, हें काय ? आहो आपण ज्यावर कृपा कराल त्याला इंद्राहींपेक्षां थोर कराल, असें असतां अपसांतच आपला थोरपणा वीसरून कलह करतां यास काय म्हणावें, असें म्हणून (भुवनपाल दोघांचीही समजूत करतो) नंतर दोघेंही राजाचें मध्यस्तीनें शांत होतात.

शा०–(थंडपणानें) नाहीं पण जोशीबावा ? माझ्या मुखावाटें कांहीं गैर गेलेकां ?

जो०–तर मग मी गैर बोललोकां? दोघें हीं नाहीं. बोललो आहो! तुम्ही आह्मीकां परके कां आहोत ; आमच्या माहादेवाची जी सून ती तुमची नात नव्हेकां ?

शा०–आहो ! हो ! पाहिलें असतां तुम्ही आम्ही अगदीं जवळ आहो. तेंच नातें कशाला ! तुमची विहीण आमची आंत नव्हेकां ?

जो०––हों, हे कां एक नातें. हें बरें पण अगदीं जवळ आलें (इतक्यांत हळूच विदूषक येऊन.)

वि०––आहो शास्त्रीबोवा सितारामजोशी इतके लांबचें तरी नातलग. पण मी पाहाना किती जवळचा आहे तो.

त्रि०–तुझे आमचेरें काय नातें ?

त्रि०–हं, बरें विचारलें, जवळचें ह्मणजे किती सांगू ! आगोदर आमचें घरीं आपल्यास तुमचे घरांवरून रस्ता आहे, हें तर खरें, आणि त्यांत तुमचें आमचे परस एक आहे, ह्मणजे मध्यें भिंत नाहीं, शिवाय दर रोज म्हैस वाटाण्यांच्या शेंगा

खाती, तेव्हां मग नातें जवळ नव्हेकां ? पोत्यांत शिरलें कीं, नातें शेजारीच.

त्रि०—वाहवारे वाहवा ! बृहस्पतीच आहेस.

वि०—आह्मी त्याचेंही गुरूं असें म्हणून (नाहींसा होतो.)

शा०—(जरा थीर झाल्यावर) राजा भुवनपाला, बराच वेळ या गोष्टींत गेला. असो, मी कचेरींत आल्या पासून विचारीन विचारीन ह्मणतो आहे, परंतु यां रिकाम्या गोंधळांत हें सर्व विसरलो होतो. परंतु स्मरण झाले :—राजा, तुझा मुखचंद्र दिवसं दिवस अगदीं निस्तेज होत चालला हे काय ? मलाच दिसतो असें नाहीं, जोशीबावा तुह्माला कसें दिसतें ?

जो०—सत्य आहे. शास्त्रीबोवा आपण बोलला हें माझ्याही मनांत घोटाळत होतें. बरें केलें विचारलें.

महा०—शास्त्रीबोवा, मुखचंद्र निस्तेज कशाकरतां होणार आहे ? मला कांहीं कमी आहे कीं, काय ? तुम्हां थोरांच्या आशिर्वादानें निःकंटक पृथ्वीचें राज्य करतो आहे, तेव्हां काय कमी ?

त्रि०—तूं कितीही संपादनी कर, परंतु मोठी जबर कामनिक व्यथा तुला लागली आहे, यांत संशय नाहीं, (इतक्यांत.)

सुवि०—महाराज (हात जोडून) शास्त्रीबोवा, जोशीबोवा, आपलें उभयतांचें आज सरकारास हे प्रश्न पाहून मला फार संतोष झाला, आणि आज हा दिवस सोन्याचा उगवला यांत संशय नाहीं, ही गोष्ट माझेही मनांत फार दिवस सरकारास विचारणें होती, पण, विचारून त्याचा माझे हातून कांहीं खुलासा झाला नसतां, तेव्हां आज हा विषय निघाला हें फार उत्तम झालें. आतां सरकाराचा मुखचंद्र निस्तेज कां ? हें मीं सांगतो :—पहा पूर्व पुण्याइनें,

आज आमचें सरकार केवळ मृत्युलोकींचे इंद्रच आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं, तशीच स्वर्गांत जीं जीं सुखें इंद्रास अनकूळ आहेत, तीं तीं मृत्युलोकीं भुवनपाल महाराजास आहेत, परंतु न्युन म्हणून इतकेंच कीं, जे संपूर्ण प्रपंचांतील मूळसुख, किंवा सकळ आनंदास कारण, आणि प्रापंचीकाचें विश्रांतीचें अगर, असें जें पुत्रमुख ; त्याचा, आमचें महाराजास लोप झाला आहे. तेव्हां वरकड सुखें कशी रुचतील ? या योगानें दिवसं-दिवस महाराज शुष्क होत चाललें, सर्व कामांत उदासीनता प्राप्त झाली आहे. इकडे यांची अशी आवस्था, मग तीकडें आईसाहेबाकडें तर विचारणेच नको, रात्रंदिवस डोळ्याचें पाणी टळत नाहीं, एकेक घासांनीं जेवण कमी होत चाललें. ठिकच आहे हो गोड लागेल कोठून ?

शा०—हो, सत्य आहे प्रधानजी. अहो " गृहरत्नानी बालक:" सर्व सुखाची आखेरी कायती तीच, आणि मग तें जर नाहीं तर व्यर्थ जिणे म्हणायाचें ; कां जोशीबोवा ?

जो०—सत्य आहे (मानहलवून) आहो शास्त्रांत निपुत्रिकाचें मुख पाहुंनये असें सांगितलें, तेव्हां थोडाकां दोष हा ?

प्र०—आहो, आतां तें असो परंतु सांगण्याचें कारण इतकेंच कीं, भुवनपालमहाराज आणि आइसाहेब दोघेहीं झुरणीस लागले, यांत संशय नाहीं. तेव्हां आतां यास उपाय काय ? तुम्ही सूर्यासारखे ब्राम्हण, महाराजांचें हितकर्तें असून या कामास जर उपाय योजीनात तर मग काय उपयोग ?

शा०—ठिक ठिक प्रधानजी, फार चांगला विचार काढला. आतां मला जो विचार योग्य दिसतो आहे तोमी समक्ष बोलतों, मग यावर जोशीबावा सांगतील तसें.

जो०—आहो मी काय, आणि तुम्ही काय ? कोणीकडून कार्य झालें म्हणजे झालें. पण ! (हळूंच) या कार्यांत ब्राम्हणांचें यथास्थित पिकेल असें करा म्हणजे झालें. तुम्हाला सांगितलें पाहिजे असें नाहीं; पण आपली उगीच सुचना केली.

शा०—हो, तें ठिकच आहे. आहो कोणतेही काम केलें तरी त्यांत सर्वांचें कार्य साधवें, त्यांत विशेषें करून आपलें उभयतांचे (हं द्या टाळी).

प्र०—शास्त्रीबोवा ; कां, विचार सांगतां सांगतां मध्येंच थांबलात ?

शा०—प्रधानजी आपलें विलास बागेंतील सुमंगला देवीचें फार जागृत स्थान आहे तेव्हां, त्याठिकाणीं पुत्रकामेष्टी यज्ञ करावा, म्हणजें जगदंबा कृपा करील यांत संशय नाहीं. का जोशीबोवा विचार ठिक आहेना ?

जो०—वा ! विचार काय यथायोग्य. पुत्रकामेष्टी यज्ञानें राजादशरथास सुद्धा फलप्राप्ती झाली, व: एकून शास्त्रीबोवा सारखे (प्रधानाकडेच तोंड करून) आतां पोक्त विचारांचीं माणसें क्वचित्.

महा०—ठिक आहे, शास्त्रीबोवा, विचार काढला तसा जोशीबोवा कडून मुहूर्त वगैरे काढून लागलिच बेताचा निश्चय करून उठा म्हणजे झालें.

प्र०—हो महाराज म्हणतात हें बरोबर आहे, कारण पुन: असा योग येणे दुर्लभ. कोणतें कामाची त्वरा केली म्हणजे बरें.

शा०—हों, तेही ठिकच. "शुभस्य शिघ्रं" याप्रमाणेंच व्हावें, मग जोशीबोवा, आतां विलंब कां ? इतक्यांत (सैनापतीची स्वारी आली पाहून भालदार पुकारतो) नि-

गारखो मेहरबान सलाम सैनापतीकी सवारी आइ है महाराज. (सैनापती आंत येऊन) वंदन करतो सरकार.

महा०—कल्याण असो शौर्यसागरा. बसावें. (सैनापती बसतात.) नंतर :—

शा०—त्र: सैनापती वेळेवर आले, मुहूर्त काढण्यास पांचांचा समाज असावा तें यथाशास्त्र झालें.

सु०—प्र०—हं जोशीबोवा आतां विलंब नकाकरूं दहाघटका आतां वाजतील ?

जो०—हं पंच्यांग काढलें, मला काय उशीर आहे. (पंच्यांग पाहतात) इतक्यांत (विदुषक हलकेच जवळ येऊन).

वि०—जोशीबोवा, तें पंच्यांग मग पहा, परंतु आमचें नांव यादित घालाल कीं, नाहीं ? तुह्मी तरी आतां सरकारास दहा पांच लक्षांचा खर्च आणलांत ! एकून नैमित्यक काढण्या विषयीं, तुमचा कित्ताच घ्यावा. गावांत आणिक जोशी आहेत, पण ; त्यांची येथें डाळ कोठें शिजती! ती लटपटपंची तुह्मालांच बरी साधली आहे ! पण काहो ? तुह्मी अनयासे पंच्यांग काढलें आहे ह्मणून विचारतों :—म्हणजे पर्वा कपिलाषष्ठित जेव्हां सूर्यग्रहण झालें, आणि त्या दिवशीं पोर्णीमा होती ? तेव्हां महोदय त्या दिवशीं कसे आले ? म्हणजे " जोतीष ग्रहण ग्रथांत असें सांगितलें आहे कीं, (मांडीघालून मोठ्या डवलानें) नैनं सूर्यं कथं अर्थं इती वाग्वाणीं कीं ? अथ एव अर्ध्यदानं न कुर्यात. याची टिका सांगतो. ह्मणजे आमावास्येस सूर्य जर डोक्यावर आला, तर अर्ध्यदानं कुर्यात किं न कुर्यात ? अथएव दिवाकरभट्ट वाणीं प्रमाणं, इतक्यांत (जोशीबोवा रागावलें असें पाहून पळून जातो.)

जो०—राजा उद्या गुरुवार अमृत शिद्धीयोग आहे. तेव्हां उद्या सर्व सरंजामासुध्धा विलासबागेत जाण्याची तयारी करावी. म्हणजे पर्वां दशमी, आहे, सुदिन आहे पर्वांच यज्ञास प्रारंभ करावा. कां शास्त्रीबोवा ठिक आहेना ?

शा०—वा ठिक ह्मणजे काय ? तुह्मा सारखे विद्वान माणसें आतां बहुधा क्वचितच. कां भुवनपाला ? उद्याची तयारिना ?

महा०—उत्तम आहे. मी आपल्या बाहेर नाहीं. प्रधानजी ? उद्या सर्व सरंजामाची तयारी करून गावांतील बडे लोकांस सर्वांस बोलावणें करा. विलास बागेत कोणी हुशार मनुष्य पुढें पाठवून सर्व तयारी ठेवा, झाले. ब्राह्मण सांगणें वगैरें त्यांचे काम, व सरंजामाची खटपट आपल्या कडेस नाहीं. हे शास्त्रीबोवा आहेत, आणि जोशीबोवा आहेत. पाहिजे ते करोत. चला तर मग आतां, करा तयारी सर्वजण. सैनापती तुम्ही सडे स्वारीची मात्र तयारी करा, फार लोक घेण्याच्या यातायातींत पडूं नका.

सैना०—होय सरकार. तेव्हढी निशाणी पलटण, आणि दोन हजार खाजगी घोडेस्वार एव्हढें मात्र घेतों.

महा०—ठिक आहे तेव्हढा हिरारतन हती अंबारिसहित घ्या. आणि दुसरें पन्नास घ्या म्हणजे झालें. तसेंच हिरालाल खाजगी घोडा आणि शिवाय दोनशें कोतवाली घोडें घ्या म्हणजे झालें. चला जा तर मग करा तयारि.

सैना०—आज्ञा सरकार इतक्यांत (प्रधानजी मोठ्या लगबगीनें) आहो; कोण आहे येथें ? गणेशपंत ?

गणे०—जी महाराज, काय हुकूम आहे ?

सु०—शास्त्रीबोवास जोशीबोवास विडे, हर, गजरें, वगैरें कांहीं किती सुस्तपणा हा ? (रागाऊन) रोज काय सांगावें. द-

रवारांत वागता किंवा (अर्धेच बोलून) नंतर—गणेशपंत विडे वगैरे हार तुरे, व अत्तर, गुलाब, सर्वांस देतात.

**शा०**—येतो आम्ही आतां हुकूम?

**महा०**—हं, ठिक आहे. मीही उठलोच, असें म्हणून भुवनपाल राजा उठतो. नंतर सर्व कचेरी उठते.

**भा०**—निगारखो मेहेरबान, कचेरी बरखास्त.

(पडदा पडतो.)

—इतक्यांत, घड्याळवाला (मोठयानें पुकारतो) दस घडी बजगइ माहाराज, ग्याराकां आम्मल सरकर.

## प्रवेश ४.

### स्थळ.

**विलास बागेंतील वाग.**

### पात्रें.

| | |
|---|---|
| भुवनपाल ........................ | राजा. |
| भुवनसुंदरी ...................... | त्याची स्त्री. |
| सुमित्रा ........................... | तिची सखी. |
| सुविचार ........................ | प्रधानजी. |
| शौर्यसागर ...................... | सेनापती. |
| त्रिविक्रम शास्त्री ............ | न्याया धीश. |
| सिताराम जोसी ............. | राजाश्रित जोशी. |
| इतर भिक्षुक ब्राह्मण ........ | यज्ञास आणलेले. |
| गांवांतील बडेलोक ........... | समारंभास आलेले. |
| विदूषक ......................... | मनंरजन करणारा. |

**विलास बागेच्या वाड्यांतील भुवनसुंदरीचा माहाल.**

भु०—कांगे, सुमित्रे ! स्वारी नाहिं का आजून बागेंत आली ?

सु०—हो कव्हांच आलिया. आपल्याबी आदुगर.. काय बाइसाब आजचा थाट ? शहरापून ते ह्यावागे पं पाया पर्इस नाहिं. एक सारखं तीन कोस घोड्यापं घोडं आन् हत्तीपं हत्ती, पालख्यापं पालख्या अन मॉन्यापं मॉनं, एका वर एक मानसबी पडत होतीन् काय ? गांवात बामनाची तरी कोन धांदल उडालिया यांतमद्या लोकांची अशीच धांदल झालिया. दुधाच्या तरी कावडीच्या कावडी-

भरुन बागेंत येत्यातं. लयबगा गडबड. आंजचा खर्च तरी लय दांडगा व्हईलन् काय ? लाखो रुपयाचा चुना व्हइल पन त्याचा विधी निषेध काय ? सगळ ह्या जिवाकर्तां (भुवनसुंदरी कडे हात करुन) ह्या जिवा कर्ता सरकार आसमानातला चंद्रमावी धरतरीपं आणतील.

भु०—पुरे बाई. ह्या जिवाकर्ता, ह्या जिवाकर्ता. काय मलाच का एव्हाढि आगत्य ! त्यांच्या मनांतून नाहींका हौस ? "कावळा बसायास आणि डाहळी मोडायास" एक गाठ पडली. मी विलास बागेंत चला ह्मणायास आणि यज्ञाचा बेत ठरण्यास एक गाठ झाली ; ह्मणून बाई निमित्य झालें. नाही तर एरवीं कितपत माझ्या कह्यांत स्वारि आहे तें दिसतच आहे.

सु०——कह्यात नव्हांहो ते माझ ह्मणनव्हें पन उगिच आपली थट्टाकेली आपल्याला गोडलागत नूसलंतर पुन: असं बोलनार नाही हो ! नाहीं तर थट्टेची गोष्ठ (अर्धेच बोलून).

भु०—सुमित्रे, मीं कांहीं रागानें नाही बोल्ले सहज रितीची गोष्ट सांगितली, त्यांत तुला इतकें आणखर कां वाटलें ?

सु०—नाहीं बाई साब, आनखर कशाच, मी तरी खर होत तेच बगा बोलल्ें, आपल्या जिवा कर्ता कालपून लयसरकार सिनले बगा ! आजतरी काय ? कोन कुठें उतरलय, होम सांलंत तयारि झालिकी नाहीं बामन बिमन आल की नाहीं, संमद्यासनी सामान पोचल की नाहीं, सकाल धरुन हिच गडबड बगा. लय धादंल उडलिया. इतक्यांत,—भालदार ललकतों ऐकून) सवारी आलि हो बाइसाब सवारी आली, ती बगा इकडच येत्याती (स्वारी माहालात येती).

भु०—(स्वारि आली पाहून) लाजून चट कन दिशी उठून

नमस्कार करते, त्यामागून सुमित्राही वंदन करते.

महा०—कल्याण. (नंतर सुमित्रा एके बाजूस जाते.

भु०—कां आज फार घामनूतें आला आहे? सर्व स्वत: का बगितलें पाहिजे? आणि तें मेलें झाळकुजी बोळकुजी भाराभर अहेत ते कुठे गेले? खायला तेव्हढें पुढपुढं येतात आणि कामाच्या वेळी त्यांचा अस्त होतो.

महा०—अग अस्त कशाचा? ते सर्व आहेत पण आपणं स्वत: असल्यावांचून कोणतेंही काम वेवस्तेसीर होत नसतें. सकाळ पासून मी जेव्हां उभा होतों तेव्हां आता सर्व तयारी झाली, होमशाळेत ब्राह्मणाची सिध्धता करुन दिली, गावांतलें लोकांची उतरण्याची वगैरें वेवस्था करुन त्यांस सिधा सरजांम, वगैरें हजार कामांची वेवस्था सर्व जिकडलें तिकडें लावून दिली आणि आतां इकडे आलों.

भु०—आहो ते खरें, पण प्रकृतीकडं काहीं पाहण? सकाळ पासून धांदलित आसल्यानें डोकं नसंलका चढलं? पण ज्याचं नावतें, बोलाव कोणी?

माहा०—आग प्रकृती काय? ह्याजिवा पेक्षां कायजास्त आहे? (हनवटीस हात लावून) किती श्रम झालें तरी एकदा तुझें हस्यवदन पाहीलें कीं, (अर्धेचबोलून)

भु०—(जरा हातास झिडकाऊन) होहो. पुरे आतां. सगळे श्रम माझ्याच कर्ता, आपल्या मनांतून नाही वाटतें?

मा०—काय माझे मनांतून काय?

भु०—मला नाहीं माहित. पण आता खाली बसणं नाहींका होत? माझें मेलें पाय दंमले.

मा०—अग आता बसण्यास वेळ कोठे आहे? तिकडे-ब्राह्मण वाट पाहताहेत. मगांलस्नाना कर्ता चवकांत कां

ज्या जवळ तयारी होऊन सर्व बायका वाट पाहत आहेत ? तुच चललवकर मी आतां बसताविसतनाहीं. इतक्यांत (प्रधान येऊन) महाराज ब्राह्मण वाट पाहताहेत सर्व मडंळी आपणास केव्हां मंगळ स्नान होणार ह्मणून आनंदाने मार्ग प्रतीक्षा करीत आहेत. आणि गंगांळांत उपसलेले पांणी थंड होत आहे. ह्मणून त्वराहोण्या विषयीं विनंती आहे.

म०—ठीक आहे हा आलों पाहा तुह्मी व्हा पुढें.

सु०—प्र०—आज्ञा सरकार (असें ह्मणून जातो)

म०—चल येतसिना आतां ? सर्व वाट पाहत आहेत ऐकिलेस तर खरें.

भु०—पण हें काय ? जोड्यानेंका स्नान करावयाचें, जामेलें मी नाहीं. आतां आपण लाहान का आहेत ?

म०—अग लाहान कशाचे, मंगळ स्नान ह्मणजे अंगास सुगंधिक तेल वगैरें लावून जोड्यानें स्नान करावें, आणि सर्व लोक आनंदानें भोवताली पाहत असतात,वाजंत्री वाजतात, यानावं मंगळ स्नान, आणि तसें कर्ण्याचा आजच दिवस आहे, तेव्हां त्यांत लाहान आणि मोठें काय ?

भु०—हो ! तें खरेंच, पण मला बांई लाज वाटती. जोड्यानें स्नानाची लग्नांत नाहींका हौस पुरली ?

म०—अग लग्नांत काय तुही लाहान होतीस, आणि मीही अज्ञान होतों ; उपयेग काय? आता मात्र हौस पूर्ण होईल. (असें ह्मणून तिला हातीं धरून नेऊ लागतों).

भु०—हें काय वेडेपण मी नाहींजा. मला नको तें मंगळ स्नान, जा तुह्मीच कराज्ञा. मी आपली येथेंच स्नान करून येतें.

म०—वा. मनचीच मुकयार. आज उभयातांनी स्नान

केलें पाहिजें चल लवकर (हनवटी धरून) असें काय वेड्या सारखें करतीस? माझें ऐकत नाहींना? मग आ-टपूं तर यज्ञ समारंभ? ब्राह्मणास सांगूं घरीं जा ह्मणून? बोल. तुझ्याच मनांत नाहीं मग मी तरी कशास याता-यात करूं?

भु०---(किंचित हसून) कायतरी पण, जसा खराच राग आला. जरा नाहीं का, होय, म्हटलें कीं, गेलीतान्नियस येतें हो; असें म्हणून सुमित्रेस हाकमारते; सुमित्रे.

सु०—जी बाईसाब जीं, (धावत जवळयेते) काय सरकार?

भु०—अग मी चवकांत जाते स्नानाला, दुगोली भरजरी रु-प्याचा पिवळाशालू आणि अंजीरी, मोतीजडलेली चोळी ती? संक्रांतीस तयार केलीली? ती घेऊन लवकर चवकां-त येहो?

सु०—ह्य बाईसाब बिगिंशान येतें. तुह्मी व्हां म्होरे.

भु०—चलाहो आतां सरकार, ओपल्याच सारखे होऊद्या असें ह्मणून दोघेंही एकमेकांकडे पाहून किंचित हसून व किंचित रागाचे झटक्याने निघून निरानिराळे वाटेनें च-वकांत येतात.

## होमशाळा.

विदू०—अहो सिताराम जोशीं, अहो शास्त्रीबावा, काय राव? तुह्मीतर सुपाऱ्याच मिळविण्याच्या नादांत. इकडचा ग्रह तिकडे आणि तिकडचा मंगळ इकडे, सर्व सुपारि-चे काळ. एंदा तुमची साल बेजमी होती आहे असें वाटतें. हे किती तांदूळ? आणि किती नारळ, कि-ती हवा तितका खुर्दा उपटून आणला आहे? आणि तें-व्हढा समयाचा चकचकाट आणि उदबत्यांचा घमघमाट?

गंगोळ्याचा थाट करून ठेविला आहे ? ह्मणजे हे पाहूनच सरकारानी खुष व्हावें, बरं ते असो. कांहो जोशीबाबा ? आता हें इतके एकवीस हंडे तूप लागणार कांहो मी कांहीं कुठें बोलणार नाहीं सांगानात ? यांतून घरीं उदर होमास किती लागणार ? दक्षिणेचा तरी हाच गोंधळ दिसतो! कोठीवाल्याची आणि जामदारखानेवाल्याची, सरकत ठेविली असली ह्मणजे बरें, मग हवेतितके घ्यावें. "ऐशि तिर्थपंच्यायाशि, आणि करगे टवळे पुरणपोळ्या" तुमचें काय खर्चते ! आणि कोठीवाल्याचें काय खर्चते ? मुदलांत तोटा माझा.

जो०—अरे, (नाकावर बोटठेऊन) मोठयानें ओरडूं नको. तुझा नाहींका हिसा यांत ? अरे. निघेल तितके यजमानाकडून काढून घ्यावें. असे श्रीमंत यजमान वारंवार का आपल्यातावडीत सापडतात ! बरें तें असो पण कारें विदूषका, सरकारचें स्नान नाहिका अद्याप झालें ?

विदू०—वाहवा वा, एकून राजांस दिवाळी माहितच नाहीं ? तुह्मी तरी दिवसभर ; "पिंडदान का घोड्याचादाणा" या विचारांत असतां असें वाटतें ? अहो सरकार चवकांत येऊन काय स्नानाचा थाट उडाला, प्रथम अंगास उंची तैल वैगरे लावून, ह्मणजे राणीसाहेबास, प्रधानजीच्या व सेनापती च्या वगैरे स्त्रियानी अंगास लाविलें, आणि शागिर्द पेशानें सरकारचे अंगास लाविलें, मग काय ? उभयता शिळेवर उतरल्या बरोबर, चहूंकडून सहस्त्रावधी उष्णोदकाचें तांब्ये पडूं लागले, तशांत स्त्रियांनी मंगल गाणें ह्मणण्यास सुरू केलें होतें. चहूंकडेस दारु सुटूं लागली, तोफांचे आवाज आणि बंदुकांच्या आवाजानी तर कांठाळ्याच बसल्या तशांत चवघड्याची घाई सनयांची

गर्दी, राजकपेंतील स्त्रियांची व पुरुषांची थट्टामस्करिची मौ-
ज अशी मोठी गम्मत झाली बोवा, मी तर एक घटका-
भर अगदीं शुद्धींत नव्हतों या सर्व थाटामधें गुंग होऊन
गेलों होतों. आतां इतक्यांत सरकार येतील. मी इ-
कडे आलों तेव्हां स्नान होऊन पितांबर नेसत होते.
आणि राणीसाहेब डागिने घालीत होते. (इतक्यांत,
समोरून सरकार स्वारी आलि पाहून विदूषक लांब पळून
जातो.)

शा०—(सरकार आलेंपाहून) यावें, यावें, सर्व सिध्धता आहे.
"नंतर, भुवनपाल राजा मांडिलेल्या स्वस्तिक पाटावर बस-
तो.—इतक्यांत, भुवनसुदंरी ही त्या शेजारी येऊन बसते;
आणि वरकड सर्व लोक चहुबाजूनी घातलेल्या बिछायती
वर बसतात, संपूर्ण स्त्रिया वरती जमल्यावर चिकाचें पडद्यां-
त बसून मौज पहातात दारीं संपूर्ण सैन्य थाटानें उभें रा-
हिलें आहे. चहूंकडेंस आनंदानें चवघडे झडत आहेत.
"—याप्रमाणें तयारी झाल्यावर वैदिक ब्राह्मण राजाभोंव-
तीं बसून प्रथम" पुण्याहवाचन, इत्यादी कल्यास, व रा-
जाचें हातास यज्ञकंकण वगैरे बांधण्याचा विधी करण्यांस
आरंभ करतात.—(इतक्यांत विदूषक हळूच येऊन
जोशीबावा सेजारीं बसतो.)

वि०—काहो, रामभटजी ! प्रथमतः (हळूच) सरकाराचे व
राणीसाहेबांचे मात्र कपाळास सुवर्ण घट लाविला, आणि
मीच काय पाप केलें ? माझा नाहींका मान ? मी तरी
काय तुह्माला हलका वाटतों कीं काय ? तिकडून खुर्दा
मिळतो ह्मणून त्यांचे कपाळी नारळ, आणि आह्मा जव-
ळून चिंचोके मिळणार तर आमचें कपाळी सुपारि तर
खरी. यांचे हातांत पिवळें सूत आणि हळकुंड बांधलें,

माझे हातांत निदान सोन्याचे कडें तर खरें. सोन्याला तर कांहीं दुष्काळ नाहींना ?

जो०—(रागाऊन) कायरे काय आहे गडबड ? तुझीं तर सर्व कामांत धांदल अहिच, अशानें सरकारास सांगून तुला येथें येण्याचीच बंदी करीन. हा काय चावट पणा ? वेळ कोण ! प्रसग कोण ! कोठें थट्टा करावी हे कांहीं समजत नाहीं ; " सब भाई बारा टक्के."

वि०—(सितारामजोसी रागावले पाहून) पळून जातो. नंतर यज्ञास आरंभ होतो.

जो०—हुं हं रामभटजी त्या समिधा घ्या हिकडें, हे तीळ द्या, द्या, द्या, लवकर, आणा.

राम०—आहो आणा काय कापूर कोठें आहे ? तूपाची पातेली कोणी लवंडली ही ? छेः काय हे ? मी आतांच येथें पंचपात्री ठेविली ती कुठे आहे? ह्या घ्या, जोशिबाबा समिधा घ्या. पण अहो, प्रथमतः बिज मंत्राचें उपपादन करणें हें आवश्य आहे. कां त्रिविक्रमशास्त्री असेचना ? आपण सांगाल तसें. आमचें काय कोणी तसेंहीं करतात, आणि कोठें अशीही चाल आहे.

शा०—आहो यांत आमचें गम्य नाहीं. तो तुमचाच विषय. जसी रुढी असेल तसें करावे, ह्मणजे झालें. तुमचे आपलें चालूंद्या अहो " भोळा भाव आणि सिद्धीस जाव" शेवटीं मात्र अग्नि नारायणास हात जोडून प्रार्थना करावी कीं, "पत्रं पुष्पं फलं तोयं" या प्रमाणें प्रार्थना केली ह्मणजें झालें ; हं चालूंद्या. दोन प्रहर भरत आले.

—(नंतर, रामभट, गजाननभट रामयादीक्षित, यज्ञेश्वरदीक्षित, वगैरे याज्ञीकी ब्राह्मण मिळून, कुंडांत आहुती टाकतात ! आणि एकच गडबड होऊन जाते.)

गार्ग्य०—ओं अग्नियस्वाहा अग्निइदंनमम. ग० ओं इंद्रायस्वाहा इंद्राय इदंन्मम. रा० ओं मैत्रियस्वाहा मैत्रीय इदंन्मम. य० ओं प्रजापतयेस्वाहा प्रजापतये इदंन्मम. (विदूषक हळूच येऊन वसतो) वि० ओं श्वानायस्वाहा श्वानायइदंन्बव. ओं परस्त्रिये स्वाहा परस्त्रिये इदंनवव. ओं तारायंत्रायस्वाहा तारायंत्राय इदंन्बव.

जो०—(सितारामजोशी रागाऊन) कारे आलासका पुनः गडबड कर्ण्याला ?

वि०—नाहिबा मि आपला गप्प बसलों आहे. पण काहो जोशिबाबा, या मधील कुंडाचे तोंड ईशान्य दिशेस कसें केले ? कारण "बडबड शास्त्रांत, आणि खडखड पुरांणांत या विषयीं एक कायदा सांगितला आहे ह्मणजे, तिनशें ब्यान्नव कलमांत पुनर्विवाहा विषयीं जो सवाल सांगितला आहे. त्यांततरी असेंच सांगितले आहे. पण तें आतां असो. तुमची हि गडबड आटपणार कधी ? आपल्याला तर भूकलागली बा.

जो०—अरे, तु गरीब आहेस म्हणून तुझी दया येतें, नाहीं तर आतांच सरकारास सांगून यज्ञांत गडबड करतोस म्हणून यथास्थित बक्षीस दिले असतें.

वि०—छेबा, तसे काहीं नाहीं. माझी बायको चुकली म्हणून मी या ठिकाणीं तिला पहाण्यास आलों, कारण कुठें तरी या गडबडींत धुरामधें डोळे चोळीत किंवा दशमी खात बसली आसेल ; म्हणून बापडा मी आलों. नाही तर तुम्ही या म्हटाल्याने व सरकारानें, शंभर बोलावणीं पाठविलीं तरी हा गृहस्थ येण्यासारखा आहे काय ?

जो०—अरे तूझी बायको आहे कुठें ? आणि लग्न तरी झालें

काय जा, नीघ येथून. तुला कांहीं खावयास दिलें तर मग जासीलना?

वि०—मगपुन: येणार नाहीं. परंतु जितके दिवस तुमचा हा यज्ञ चालूं राहील? तितके दिवस मला रोज नऊ ओले नारळ देण्याचा रतीब ठेवावा, म्हणजे मग तुह्मी निर्विघ्न यज्ञाचें यश शेवटपर्यंत घ्याल; नाहीं तर (अर्धेच बोलून).

जो०—अरे. हा यज्ञ आज पासून सात दिवस चालणार आणि रोज संध्याकाळ पर्यंत सर्व ब्राम्हण राजा सहीत उपवासी राहून सायंकालीं कंदमूलादी दुग्ध आहार मात्र करणार. सातवे दिवशीं पूर्ण आहुती होऊन मग मोठींच समाराधना होऊन आम्हासर्वांची पारणा होणार. असा हा बेत आहे. तेव्हां तिथ पर्यंत आपलें आगमन कधींच या ठिकाणीं होऊं नये. नऊ सोडून दाहा नारळ मी तुला देत जाईन.

वि०—हो चालतर काय? हलव्याच्या घरावर तुलसिपत्र तुमचें काय जाणार. (असें म्हणून निघून जातो).

पडदा पडतो.

(पडद्याबाहेर).

वि०—नमस्कार (लवून) नमोननम: वाहवा वाहवा, हें झेंडूचें फूल कोणीकडे? इतके दिवस कोठें अस्त झाला होता?

सूत्र०—अरे अस्त कशाचा, कामा काजा मुळें भेट नाहीं झालीं, तुझ्या सारखा मी रिकामा आहे?

वि०—एकून मी रिकामाना? विलास बागेतून लाडू खाऊन हा आतांच आलो. हेंनव्हेका काम? सर्व कामापेक्ष जेवणाचें काम मोठें.

सू०—बरें तें असो. कारे विलास बागेंतील कसा काय थाट झाला. थाट आहेना ?

वि०—ती कांहीं सांगता सोय नाहीं, इतका वेळ माझा कसा कर्मणूकींत गेला. एकून तुमच्या संगतीनें मोठी गम्मत दृष्टीस पडली बोवा, काय नाहर झाली मला तें सर्व हुबेहूब खरें वाटलें. काय यज्ञाचा थाट, आणि जेवणाचा बेत तरी किती सुंदर होता ? काय बुवा सगळें स्वप्ना सारखें झालें, आमचे ते सोवती, सितारामजोशी, आणि त्रिविक्रम शास्त्री हे सर्व कोणीकडे गेले, दहा नारळ मात्र रोजचे बुडाले. काहो सूत्रधार, हे सर्व मीकां झोंपेंत पाहिलें ? झोंपेंत ह्मणावें सर्व तर हुबेहूब डोळ्यापुढें दिसतें. ह्मणजे सात दिवस मी जसा कांहीं विलास बागेंतंच होतो. आणि यज्ञ झाला समाराधना झाली. शेवटी पूर्ण आहुती होऊन, सर्व ब्राह्मणानीं शेष राहीलेला प्रसाद राज्याचें हातानें भुवनसुंदरिस देवविला. आणि मोठ्या स्वरानें ब्राह्मणानीं आशिर्वाद दिला, तेव्हां मीही जसा त्यांत होतो., आणि आशिर्वादांतला भावार्थ सुध्धा माझ्या लक्षांत आहे. सितारामजोशी आणि रामभट प्रभृती मंडळीनी राजास— " तुला अग्निनारायणाचें प्रसादें करून उत्तम कुळाचे उद्धारण करणारीण, माहा पतिवृता रूप व गूण संपन्न आसिं कन्या रत्न प्राप्त होईल." असा आशिर्वाद दिला. काय काय सांगूं इतका वेळ पाहिलेला प्रकार सर्व अक्षरशहा माझ्या ध्यानांत आहे, आतां तर त्यापैकीं कांहींच दिसत नाहीं. फक्त पूर्वीचा हा रंगमंडप तुह्मी आणि मी. यव्हढे मात्र दिसतें. ती शृंगार पुरी कोठें गेली, विलास बाग कोठें गेला, आणि मी कोठें आलों ! हे काय सूत्रधार, तुमच्या जवळ खचीत बंगाली विद्या

आहे. इतक्यांतले इतक्यांत सर्व नाहींसें करून, तुह्मी मात्र दगडा सारखे उभे आहांत. आणिक एक—बंगाली विद्येत मौज दाखविली, पण आपण कोठें दृष्टीच पडलानाहीं, आतां तें नाहींसें करून आपण मात्र दृष्टी पडतां, उपयोग काय ? मला तर आगदीचरका लागला आहे. पुढे एव्हढेंच कसें संपले ? सूत्रधार, मी पाया पडतो, आणिक एकदा तुमची ती नजर बंदी चतुराई दाखवा.

सू०—अरे वेड्या ती बंगाली विद्या नव्हे. मी आपल्या बुधींनें मानसाचें ठाई कांहीं कल्पीत कथा भाग रचून त्या प्रमाणें माझे पात्रा कडून हूबेहुब ती सोंगें आणऊन तो कथा भाग करून दाखविला. आणि तो चमत्कार तूं पाहत होतास त्या वेळीं मी ही जवळ होतों. पण तुझें पाहतो कोण ? तूं त्या लाडूच्या आणि नारळा च्या थाटांत होतास. पहा मी जवळ नाहीं. तर कथा भाग सभासदां च्या दृष्टीस कसा पडेल ?

वि०—त्रा: मोठें विद्वान आहांत ? आजपर्यंत पुष्कळ कथाभाग मी पाहिलें व ऐकिलें पण असलें चरित्र कधीच माझ्या पहाण्यांत नव्हतें. पण काहो ? आणिक थोडेसें पुढें आहेकां ? का आगदीच संपलें ? असले तर तोळाभर द्या, ह्मणजे त्या बद्दल कामिशन वेगळे देऊं, कारण एखाद्याला जेवावयास बसविलें तर पोटभर जेऊं घालवें. तसें तुमचा खेळ अर्धाच पाहून आमची तृप्ती झाली नाहीं. तेव्हां आणिक तोळा मासा असेल तर द्या. आजून रात्र पुष्कळ आहे.

सू०—विदूषका, मी दाखवीत होतो तें चरित्र संपलें नाहीं. अरे हातर पहिला भाग झाला, अजून गम्मत ती तर पु

ढेंच आहे. तुझी मर्जी असल्यास पुढील भाग दाखवितो-पण तूं मदत ठेविसिलना ? तुझी मदत आगोदर असली पाहिजे.

वि०—हो. ते खरें "दुर्जनस्य प्रथमं वंदे." सुत्रधार, तुह्मी सांगाल ती मदत कर्तो, परंतु आणिक एकदा गम्मत दाखवा.

सु०—आतां पहिल्या भागांत काय काय झालें तो संदर्प तुझ्या-ध्यानांत असेलच ? ह्मणजे पुढला भाग दाखवितो, नाहीं तर पुढें पाठ आणि मागे सपाट.

वि०—नाहीं नाहीं हो. अगदी एकून एक संदर्प माझ्या ध्यानात आहेत. ह्मणजें पहिल्या भागात इंद्रजिताची आणि रावणाची झाली मारामारी, तेव्हां मग पांडव मध्यस्ती पडून हिरण्यकश्युपुचा घरी तो खटला तोडला. मग तिकडले लंचाड फिरलें, आणि रामाची कृष्णाची लढाई लागली. मग काय विचारता ? ते कांहीं केल्यानें ऐकेनात, शेवटीं आस्मदिक तेथें जाऊन त्या दोघांचा सल्ला केला, आणि बिल्ला देऊन त्याना वाटेस लाविलेन्, बिचारता काय ? (अंग पुढें करून) हि पहा, ही शालजोडी त्या कामातच मिळाली.

सु०—शाबास, वाहवारे वाहवा, तुझ्या पुढें श्रम करून "पालथ्या घागरीवर पाणी, काय संदर्प ध्यानांत ठेविला ? (आश्चर्य वाटून) बरें असो. ? तूं तर बुद्धीवानच आहेस. परंतु मी तुला आणखी एक वेळ कथा भाग समजिवीतों, ऐकून घे.

—"पहिल्या भागांत भुवनपालराजा, संतती कर्ता दुःखित होच्छतां, विद्वान मंडळींच्या सांगण्या वरून त्याने विलासबागेंत जाऊन पुत्रकामेष्टी यज्ञ केला. नंतर पूर्णाहुती.

च्या पुर्व दिवशीं रात्रीं राजाच्या कुलोपाध्यास स्वप्न पडलें, त्यांत अग्निनारायणानीं दृष्टांत दिलां कीं, भुवनपाल राजास मत्प्रसादे करून येक कन्यारत्न मात्र प्राप्त होईल, पुत्र होणें त्याचें प्राक्तनीं नाहीं, कन्या सर्वगुण संपन्न होईल." या प्रमाणें स्वप्नांतील मजकूर उपाध्यानी सर्वांस सांगितल्यावर दुसरे दिवशी पुर्णाहुती करून सर्व ब्राह्मणानीं राजास आर्शीवाद दिला. नंतर ब्राह्मण भोजन होऊन सैन्यासह भुवनपाल शृंगारपुरीस परत आला." अशी कथा पहिल्या भागांत झाली. तूं नाहींका पाहिलेस ?

वि० हो, हो. खरी गोष्ट. इतकें चरीत्र मीं आवलोकन केलें खरें. आतां कृपा करून पुढील भाग दाखवा. आतां मात्र पक्कें लक्षांत ठेवितों.

सु०—ठिक आहें, आता दुसऱ्या भागास आरंभ कर्तो चमत्कार पहा. त्या भागांत भुवनपाल राजास कन्यारत्न प्राप्त होणार आहें, तेव्हां तूं ही सावध रितीनें मदतकर.

वि०—ठिक आहे. (असे म्हणून सर्व निघून जातात).

पडदा पडतो

# भाग २.

## प्रवेश १.

स्थळ.—कचेरि जागा.

### पात्रें.

भुवनपाल ........................ राजा.
सुविचार ........................ प्रधानजी.
शौर्यसागर ........................ सेनापती.
त्रिविक्रमशास्त्री .......... न्याया धीश.
सिताराम जोसी .......... आश्रीत.
इतरसर्वमंडळी........... सभासद कामगार वगैरे.

(स्वारि सिंव्हासनावर बसताच).

चोप०—नजररखो महाराज. सलाम. बंदेका मुजरा है सरकार निगारखो. (सर्व मंडळी बसल्यावर).

त्रि०—का आज संपूर्ण सभा उदासमय कांबरें दिसती? कोणी कांहींच बोलत नाहीं, सर्व आपापलें ठिकाणी मौन्य मुद्रींका? सरकार तर फारच चिंतातूर दिसतात. (हात जोडून) एक आपण सुखतिर सर्व ..गा सुखी, आपलचे मुख जर म्लान, तर मग इतरांची कशीं प्रफुल्लित असतील? हे उघड आहे. आतां प्राय: आवदासिन्य धरण्याचे कांहीं कारण नाहीं. भगवत् कृपेकरून मानसीक हेतू पूर्ण होतील. आतां, "धीरसो गंभीर." करावे काय? जगींसर्व सुखी कोण आहे? का जोसीबावा, असेच की नाही?

जो०—हो तर काय? सांप्रत असेंच समजलें पाहिजे. इश्वर देईल, करील तेव्हां कोणी पाहिलें आहे? सध्या जाती आहे घटका ही खरी. म्हटलें असतां अजून ही इश्वरी दया होऊंनये काय? झाले, यज्ञ झाले, याग झाले, दान झाला, धर्म झाला, पण प्रभू आजून आमच्या सुखाकडे लक्ष देईना. तेव्हां निरंतर आमच्या धन्या सुध्दा आम्हास दुख: सागरांत ठेवणें त्याला आवडलें आहे- यांत संशय नाहीं, आसो त्याची इच्छा. (वाईट वाटल्यासरखे दाखऊन) म्हटले असतां यज्ञ होऊन ही सहा महिने झाले, तरी अझून तो रंग कांहींच दिसत नाहीं.

मा०—काय इश्वरानें काय करावे? पुर्वी आम्ही वाहिलेंच नाहीं मग तो तरी देईल कोठून? मलातरं आतां अगदी चैन पडत नाहीं. कांहीं दिवस, राज्य सोडून अरण्यवास तरी करावा. काय अभाग्याला काय? अरण्य आणि घर सारखेंच आहे. कारण, ज्या घरीं मुल नाहीं तें घर आरण्यततच आहे.

सु०—महाराज हें काय? असा उदास पणा धरून काय होणार. आज एक वर्षांत आपलें लक्ष बिलकूल राजकीय कामांत नाहीं, तेव्हां फार काळजी वाटती आहे, कारण थोरास नेहमी भय असतें. तसे गरिबास नसतें. (हात जोडून) महाराज, सर्व दु:खाचा विसर करून पुर्वी प्रमाणें आम्हा दिनाचें पालनाकडें लक्ष आसावें, प्रजा पालन कर्णे हाच राजाचा मुख्य धर्म आहे. आणि त्यांतच इश्वर प्रसन्न होईल यांत संशय नाहीं. परतंत्री कामाची काळजी मनुषानें वाहून उपयोग काय? लाभ, मृत्यु, हानीं हि कर्मे परमेश्वराचे श्वाधीन अहेत, त्याची काळजी आपण करून काय होणार? तेव्हां सरकार, आपण/-

स सांगण्याचा ह्मणजे माझा अधीकार आहे अशी गोष्ट नाहीं. आणि बोललो त्याची माफी असावी, परंतु माझ्यानें रहावत नाहीं ह्मणून पुर्वी क्षमा मागून नंतर विनवितो कीं, सरकारानीं आमचे संरक्षणाकडे विशेष लक्ष देत असावें. कारण आसपास बंडावा फार झाला आहे ह्मणून मी ऐकितों.

से०—क्या बोलत हो ? [प्रधानाकडे पाहून] लंडीकी बिसात क्या, अपनें तरफ कुइ आख खोचके देखेगा तो सालेके तुकें तुकें बना देउंगा. मग दुर क्या माहाराज, [हात जोडून] ऐसें लुचें कुचें बंडवालेंसें आपना क्या होनेका है ? सरकार, अबी इसे वक्त हमारे पास आठार लाख फौज हथ्यार बंद तयार है, एबी कुच ऐसी वैसी नहीं, सब आछें आछें जवान, और कवाइतमेंबी बडे हुशार. सुनो खाविंद, और ऐसी हजार सवार बडे मजेंसे रात दिन दुसमानकी रहा देखत है, किसिकी पुग्याइ है आघाडी आनेकी ? [अगदी संतापून] और साला कुइ आयगा तो मै कुच ऐसा वैसा है क्या ? [मोठ्या जलदिने] ए देखो समशेर हमारी ; ए क्या सोती है क्या ? किदर है दुसमान ? अबी उसके नरडीका घोट लेताहूं [तरवार घेऊन उठतो.]

मा०—हं हं सेनापती, ए क्या जुलम ? तुम वैसे आदमी हो ऊसखातर सरकारकु कुच किसीकी पर्वा नहीं. हमारा सब भरोसा तुमारे उपर है, केवके कबी वक्त आयगा तो, तुम आदमी जानकु जान देने वाले सच्चीहै. (पुढे होऊन) बहुत आछा, तुमारी तयारी बहोत ठिक है, अबी चिपी दुसमानका नाम निकाला तो, तुमकु एत्ता घुस्स आया. आनृ जोकनी खरोखर दुसमान आया, तो तुं

क्या कारोंगो कुच समजता नहीं. लेकिन बहोत खु।. (पाठ थापटून) सरकारकी रोटी खाके नोकरी वैसी करना चाहियें. (समजवून खालि बसवितो) इतक्यांत:—

वि०—(थरथर कापून व हात जोडून) नहींनहीं, मममम-ला ककक्क क्या माल्हुम आआआआहे. (हात जो-डून) मीमीमीमी मला लालालालाडू आआआआवडतो.

प्र०—(रागाऊन) अबे कोन हैरें ? एकोन सोंग आयो हैं हा-काल्ह देव. (चोपदार येऊन बाहेर घालवितो.)

सि०—कां शास्त्रिबावा ? सेनापतीची इरश्री पाहिलिना ? तो तरवार घेऊन उठला तेव्हां मी तर "थःपलाय साजिवते" करणार होतो, परंतु तितक्यांत, आपला आश्रय सेजारि होता ह्मणून दम धरला.

शा०—आहो माझी सुध्धा अशीच दशा झालीन् विचारता का-य ? पाय लट लट लट कापूं लागले आणि जिभ शाक-डी वळली, काय नेम ? त्याची स्वारी अंगावर अलि तर काय घ्या, त्याची होईल विरश्री आणि आपलि होईल मु-क्ती.—या विदूशकाची पाहिली नाहीं कशी दशा झाली ! पण त्यानें ती वळेन केलि वाटते.

डॉ०—हो तर काय ? त्याचा नेहमी सवय आहे, तो त्यांत त्यांत आहेच, पण आपल्याला कधी प्रसंग नाहीं. इतक्यांत.

रा०—का शास्त्रीबावा ? कसे कसे लोक मज जवळ प्रसंगास आहेत पाहिलेना ? त्यांचे बळावर तर मी बिनघोरी आहे. आणि आजपर्यंत बिन धास्तपणें राज्य चाललें आहे.

शा०—खरी गोष्ट महाराज. सर्व मंडळी तर उत्तमच आहेत, परंतु [दोघाकडे बोट करून] प्रधानजी आणि सेनापती, अशी माणसें सर्व राशतीत नाहींत. [पायाकडे बोट क

रून] या पायाची इमानानें चाकरी करण्यासच त्यानी जन्म घेतला आहे.

मा०—खरें आहे. इतक्यांत [दस बजे है महाराज ग्याराका अम्मल है] असा मोठयानें स्वर ऐकून, "चला प्रधानजी आतां मी जातो. तुह्मी ह्मणालांत ते सर्व विचार मला समजतो आहे, पण काय करूं? जिवाला स्वस्थच वाटे ना, मी आपल्या कडून मनाला पुष्कळ आवरण्याला पहा-तों, परंतु तें स्थिर होऊन राजकिय कामाकडें लागतच नाहीं, याला मी काय करूं? आतां सर्व भरंसा तुमचा वर आहे. तुह्मीच मालक असे समजा, मी काय निम्मि त्याचा धनी. तुह्माला वाटेल तसा राज्याचा बंदोबस्त ठेवा. तुह्मी आहांत, सेनापती आहेत, झाले, कधी कमी जास्त मोठी खोल बिचाराची मसलत करणें झाल्यास शा-स्त्रिबावांचा विचार घेत जा ह्मणजे झालें. मी आहे नाहीं सारखाच समजा. मी तरी काय करूं? येथें आलो ह्मणजे पुष्कळ प्रकारें मनाची समजूत करून कांहींसें तें आवरून धरतों, परंतु पुनः वाड्यांत, रंग माहालांत गेलो कीं जसेचें तसेंच होतें. माझ्यापेक्षां "तिकडे फार गडबड आहे" आसों, आतां संभाळा ह्मणजे झालें, परमेश्वराचें मनां-त जसें असेल तसें होईल." (असे ह्मणून स्वारी उठते.)

चोप०—निगा रखो माहाराज. दवलत बढती होवे. (सर्वांचें मुजरे होतात) स्वारि गेल्यावर.

शा०—चला प्रधानजी, आतां वारंवार सरकारास कां दुःख देता? तें अगदी भ्रमिष्ट झालेत, आणि त्यांतून इतकें न होतें, परंतु भुवनसुंदरीच्या पुढें त्यांचे कांहीं चालत नाहीं, रात्रंदिवस संतती नाहीं ह्मणून दोघेही शोक करित बसतात, आणि काय? तुह्मीच काय संभाळाल तें खरें.

करावें काय ? आजपर्यंत त्या अन्नदात्यानें कोणास शब्दानें ही दुःखविलें नाहीं, आणि असा राजा आपणास पुनः मिळणार नाहीं. आपणच काय ? सर्व दुनिया त्याला अशीर्वादे देती आहे.

प्र०—खरी गोष्ट आहे शास्त्रीबावा. मीं आज वीसवर्षें काम पाहतों आहें, परंतु कधी चकार शब्द वाकडा ऽ अहो मलाच काय ? लहाना पासून मोठ्या पर्यंत स्वारी सारखी. कोणाला ह्मणजे ह्यांचा त्रास अशी गोष्ट नाहीं. अहाहा ! असा प्रभु मिळणें नाहीं. आज महाराजाना संतती नाहीं ह्मणून सर्व दुनिया शोकाग्रस्त आहे. कारण, सरकार कोणाशींच वाकडे नाहींत. आसो, अश्या प्रभूची एक निष्ट आमच्या हातून चाकरी होवो ह्मणजे झालें.

सेना०—अजीक्या शास्त्रिबावा ? हमारे सरकारकें बालकु जो कुच धक्का होवें, तोमै आपनी जान नहिं रखेंगा. क्या किशीकी मगदूर है ? के उनकें तरफ तेडी नजरसे देखेगा. मै सच्चबोलताहूं कें, हरवक्त आयातो आघाडी हामारी मान. और सब पिच्छेकी बातं.

शा०—(त्याचे डोळे वगैरे पाहून भितात) सससससेनापती सच्चीबात.

जो०—(भीतीनें लटलट कापून मनांतच) या द्वाडासी बोलण्याचा प्रसंग नको. हा, मनुष्य आहे ? एखादे वेळीं, वाकडे जातें व जीभ चुकते. पण हा गृहस्थ लागलीच क्या साहिबासी प्रसंग घालणार ! !

सेना०—चलो आब प्रधानजी, देर बहोत होवी, ह्यासें तीसकोस पर कोइ बंड वालेने दंगा कराया, वैसा मुजकूं कल संदेसा मालूम पडा, तोभी भाग जाताहूं, केवल इसलि

हमेशा रखना चाहियें, तुंबी, सबकाम हुशारिसें बजाना चाहियें, केवकें सरकारकी तबयत बैसीभई, उसवास्तें. जाताहूं-(मुजरा करून) जातो. नंतर सर्व कचेरी बरखास्त होते.)

पडदा पडतो.

(पडद्याबाहेर).

वि०—का सुत्रधार, तुह्मी कोठें बुडी दिली होती ? आज काय दरबाराचा थाट ?

सु०—अरे बुडी कशाची मी तेथेंच होतों, झाला हा प्रकार कोणी दाखविला ? मीच.

वि०—असंकाय ? काय बुवा सगळे पांचटच थूं थूं थूं थूं थूं. जीभ पुसून अहो सगळे आळणी आळणीच कसे वाढतां ? कांहीं तरी फोडणी, अगर खुसखुसीत ? सर्व पुरुष सुध्दां बाया सारखे.

सु०—अरे झालें काय ? मला कांहीं यांतला अर्थ समजत नाहीं.

वि०—अहो, मघां अस्मादिकाची स्वारी जेव्हां पालखींत बसून कचेरींत गेली ? तेव्हां तिथें निघाल्या लढाइच्या गोष्टी. तेव्हां मग सर्वांची बोबडी वळली ऐकताकाय ? त्यांत कोणीच शूर नाहीं. मग झालों पुढें, आणि सेनापतीचीतरवार घेतलि हातांत. तेव्हां कायतो ? वेड्याचें नांव तरी कोणी कारागिरानें ठेविलें आहे कोण जाणे ? शौर्यसागर नांव. आणि अस्मादिकाची स्वारी जेव्हां चवताळली, तेव्हां सरकार (मोठ्याने हासून) मग पुढें नाहीं सांगत तुह्मी ध्याल बिल ऐवादे.

सु०—अरे, असूंदे तें. रात्र फार झाली, काय गम्मत दाखवितों ती पहा.

त्रि०—आतां नकोती आह्माला गम्मत, सर्व बायकांची गम्मत कोणी पहावी? कांहीं लढाई नाहीं कांहीं नाहीं. सर्व भिक्षुकी खटला पाहून मघापासून त्रास आला. यज्ञ पहा आणि लाडू खा. नको तें आह्माला, आह्मी निजतों. आपले-

सु०—अरे आतां भिऊं मात्र नको. सर्व रक्तानें जमीन नाव्हऊन तुला दाखवितों. सहस्त्रावधी वीर मरतील तें तूं पाहा; सावधरहा.

त्रि०—आणि मग काहो? भुवनपाल राजाला कन्या का पुढचें जन्मी होणार कीं काय?

सु०—अरे छेरे. तेंहीं पुढें दृष्टी पडेल. पण आगोदर धडाधडी आणि फडाफडी तर पाहा.

पडदा वर होतो.

———

## भाग २

### प्रवेश २

स्थळ.

**सेनापतीची कचेरी.**

**पात्रें-**

**आर्यसागरसेनापती** ........... सर्व फौजेचा मुक्तयार.
**बाहादरसिंग** ..................... सेनापतीचा दुय्यम कारभारी.
**प्रतापसिंग** ................. जमादार.
**सुंदरसिंग** ................ हावलदार.
**भास्करराव** ................ स्वारांचा सुभेदार.
**विदूषक** ................ मनरंजन कर्णारा.
**छडिदार** ................ दवलतीची इशारत देणारा.

**प्रता०**—केव, सेनापतीसाव, आज इतनेजलदीसे बंदेकू काहेकू बुलाना भेजा ? मै आपने बखतकू कबी चुकने वाला नहीं. लेकिन आज बडीफजर मै जरा हुक्का चिक्का पिये, और छोटेलडकेकू लेके बागमे इदर उदर फिरताथा ; इतनेमे (हातजोडून) आवका होकम सुनकर दवडते ह्या आया. ऐसा सुन्नेकू बंदेकू बुलानेका क्या काम ? एसुनाना चाहिये.

**सु०**—हां, हा, ठीक बोले. जमादारसाव, मेरेकुबी ऐसाच होकम आया, उसवास्ते एदेखो ? एसमसेर बिमसेर वैसीच बगलमे लपेटके दवडते ह्याआया.

भास्क०—जमादारसाब, मालकांची चर्या आज कांहीं वेगळीच भासती आहे. मलादेखील असें जलदीचें बोलावणें कधी नव्हतें. रात्री जागरण झाल्यामुळें, ह्मणजे—सत्यनारायण (अर्धेच बोलून) (जमादार मनांत समजून) हं, हं, समजलों फेरक्या जागरण झाला. भा०—त्या कारणानें नुकाच उठून रात्रि गास्तीत एक स्वारकां आला नव्हता, त्याची चवकशी करीत होतों. इतक्यांत जासूद येऊन थडकला. (विदूषक हळूच येऊन)

वि०—आहो सुभेदारसाहेब, मला तर सरकारचीं बोलावण्यावर बोलावणी, एकदा स्वार आला, एकदा जासूद आला, मग सरकार स्वरी स्वत: यईलकिंकाय? हें भयवाटून याच पाई पळत अलों बगा. कारण, अस्मादिक आल्या वाचून कोणतेंही काम होईल कसें? आमच्या सारखे शाहणे आह्मीच. सगळ्या राशतींत शाहणपणाचा झेंडा आमचाच फडकतो आहे

भा०—(रागाऊन) कारे तूं का येथें? कोण आहेरे छडिदार.

छ०—आज्ञा महाराज.

भा०—अरे कोणी कडे तुमचें लक्ष असतें? कचेरींत कामाच्या वेळी हि काय गडबड? हाकोण आला आहे. हाकूनदे.

छ०—आज्ञा सरकार. ह्मणून (विदूषकास, हाकून देतो.)

भा०—सेनापतीसाहेब, (हळूच नम्रतेने) हुकुमा प्रमाणें सर्व हजर झाले आहेत. अवेळीं कचेरी भरण्याचें कारण मात्र समजावें.

ना०—देखो भास्कररावजी, तुमची वडे पडंत होकर तलवार भादर हो, तुमारे सारिखा बंमनोमे कोइ शूर होनेका नहीं. तुमारी हुशारी और इमन देखकर मुसमानकी, अक्कलगुंग

होजातीहै, देखो भास्करराव, सुभेदारिका काम एक तुमारे खातरचहै. और किसिकी मा नहि पाई.

भा०—शौर्यसागरजी, (मोठा आभारिपणा दर्शवुन) ए सब आपकी महेर्बानीहै, आबकी खुसिकी नजर होवेतो, माझें काम कुइ एखादा मजूर इलकरी पण करेगा. उसमेक्या ? सब आपली कृपापाहिजे. केव जमदारसाब, मी बोल्तोहै एसच की झूट ?

प्र०—ज०—सच्चहै. भास्कररावजी, तुमारी बात बहोत मिठ्ठीहै, देखो, (हात जोडून) सरकारकी मेहेर्बानीकी सब बातहै. (सेनापती कडेतोंड करून) आबके पल्लोमे आज दसवरस मैनेबि नौकरि किई. लेकिन एक दिनबी आबकी तेडी नजर नही देखी, गरिबकी दया बी मनमे बहोत. मै क्या कहु कुच भगवान जानताहै.

सु०—हा०—आजी जमादार, क्याबात बोलतहो, शौर्यसागर महाराज सरिखा आबी आदमी होनेका नही. मै दौलतसे कमती हौ सच्च, लेकिन मेरी उम्मर बहोत जादीहै. शौर्यसागर महाराजकू, मैनें बहोत छोटे और नंगे बी देखे है, उस दिनसे तबियतकी रहा जैसी है वैसी है. ऐसा गरिबका पालनवाला मालक आबी होनेका नही.

भा०—खरी गोष्ट. हावलदारसाहिब, असे सेनापती आहेत ह्मणूनच आज राज्याची व्यवस्था ठिक आहे. नाहीं तर सरकार असे विदेही झालेले, मग आपली दशा कशी झालि असती ? यांच्या नांवा प्रमाणें यांची कर्णीही आहे. नांव जसें शौर्यसागर तसे पराक्रमही आंगी आहेत, किंबहुना जास्त. केव हवलदार, मै बोलताहूं हे खरें कीं, खोटें ?

सुं०—हा०—(हसू आलें ह्मणून तोंडास पदर लावून) सच्च भास्कररावजी. लेकिन तुमाला जर हामारी भाषा बोलता येत नाहीं तर बोलता कशाला? (विदूशक हळूच लपत येऊन मनाशिच.

वि०—काय रांड लेक शुध्ध बोलतात? फुकटचे पगार मात्र तेव्हढे कोणाला पांचसे रुपये कोणाला सातसे रुपये, पण विद्येच्या नांवानें शंख. मग यांचे पेक्षा मीं बरा. माझ्या तरी " एम ए बिए" आणि सीइ कडेये, इथपर्यंत परिक्षा झाल्या आहेत, किंबहुना प्रधानाचें काम आपण चालऊं इतकी हुशारी आहे. पण आपला उगीच नाटकाच्या शोक लागला म्हणून यांत शिरलों, नाहींतर एव्हांना बारिस्टर होऊन किंबहुना जज्ज ही झालो असतो. उगीच इंग्रजी सोडून या मराठीं राज्यांत आलों. मीं पुर्वीं असें समजत होतो कीं, नाटकांत बहुधा बरेंच शिकलेलें आणि विद्वान लोक असतील. पण ते सारें लटकें झालें. या गावीं आपलें जानी उठावें त्याणीं नाटकें करावीं. एकाला सुध्धा कांहीं संवसकृत आभ्यास, किंवा इंग्रेजी आभ्यास, अरे राम! नांवदेखील घेण्यास नको. आसो आता विदूशक महाराज, वेड्यांचे गांवात आलो आहोत तेव्हां आपण ही वेडेच बनले पाहिजे. (उघड पणे)

वि०—खरें. खरें. भास्कररावजी, आपण बोल्ला ते ही खरे, आणि हावलदार बोलले तेही शुध्ध. मीं मघांपासून आपल्या मुखांतून तारा तुटत होत्या त्या ऐकत होतो. (इतक्यांत सेनापती आपल्याकडे पहातात असे पाहून हळूच पळून जातो.)

सेना०—सुनो जमादार, आज इनें सुभेकु तुमकू और सुंदर-

सिंगकू, भास्कररावकू बुलाना भेजनेका काम इत्ना कहताहूंकें, आपने शहरके नजीक नजीक बंडवालेंने बहोत धूम मचाइ है, और कल ऐसा संदेसा मालूम पराके आपनें रामघांटपर जों खेडा गांव है ओबी दुसमानने लुटलिया. और उनकीं रहा शृंगारपुरिपरबी जरा जरा दिखती है. उसवास्तें सब लोकूकू सावध रहनेका होकम फर्माना. और किसकू मालूम, कोइ वक्त कैसा आवेगा तों? उसखातर तुम सबलोक बहोत तयारीसे रहाना. कल रातकु मैंनें बाहदरसिंगकें सात दस हजार फौज देकर उस्कूं बंडवालेकें तरफ दवडा है.

प्र०—क्या मगदूर सालेकी, (मिशावर हात फिरवून) हमारी समसेर ससूरकू मालुम नहीं है. चलों, अब कुच फिकीर नहीं है, दुसमानका आबी समाचार लेताहूं (हात्यारें सावरून) चलो, हावलदारसाब, हुशारि रखना चाहिये, और जो कबी (सेनापतीकडे हात जोडून) आबका होकम होय तो आबीके आबी रामघाटपर दवड करताहूं, और ए हारामके नडिका घोट लेताहूं.

मु०—हा. आजी काहेकूं आब जातेहो, बंडवालेकीं, बिसात क्या, ए बाहादरसिंग गयाहै, वोच उसकीं कतल कर देयगा. ओबी कुच ऐसा वैसा आदमी नहीं है, एबी बहोत ठिक सिपाई है.

भा०—सच, जमादार साब. सेनापती महाराजानी बाहादरसिंगाची योजना तीकडे केली हें ठिक केले. आणि कदांचीत सर्वांचा सल्ला असेल तर मागाहून मींही जाऊन समाचार घेतो. माझेही हात फार वळ-वळ करताहेत, ह्मणजे रामदुर्गावर लढाइ झाल्यापासून अलिकडें

तरवारीचें पोट फार दिवसांत भरलें नाहीं. या करतां सर्व मिळून मला रजा द्यावी.

सेना०—आजी काहेकूं भास्करराव तुमारी तयारी ! ए ऐसें कंगाल बंडवालेपर तुमारा और हमारा जानेका क्या काम है. लेकिन सबनें आपापने हुशारिसे रहना, इतनी बात सच्च है. (इतक्यांत छडीदार पुकारतो).

छ०—सेनापती शौर्यसागर माहाराजकी दवलत बढती होवे :—

सेना०—जमादर, छडिदार मधेंच कां पुकारला ? (इतक्यांत छडिदार आंतमधें जवळ येउन) माहाराज, बहादरसिंगकी, सवारी, बहोत दवडती बहार आइ है.

सेना०—अरे, उसकूं आने देव आंदर. [आज्ञा सरकार ह्मणून छडिदार जातो आणि—बहादरसिंग आंत येतात] [बहादरसिंग आले पाहून सर्व ताजीम देतात.]

बहा०—[बसल्यानंतर] सुनो, शौर्यसागर महाराज, आब बैठनेका वक्त नहीं. दुसमान शहरपर आकर उनें मोर्च्या लगादिया, आजी शहरपर तोफ सूरूं होवंगी. ए दुसमान कोइ ऐसा वैसा बंडवाला नहीं, ए चंद्रपूरीका राजा है, और उसके सात दो लाख फौज बडी जबरदस्त तयार है. कल रातकूं मै आपके होकमसें दस हजार फौज लेके रामघाटपर गया, और उसके सब लोक उस-वक्तबडे गाफल रहेथे उतनेमें मै जाकर व्हा हल्ला करदिया. और दो घंटेमें दस हजार फौजकें तुक्के बनाकर पचास उंट व्हाजवा हिरकें छिन लिये फेर जरा ए लोक सावध होकर उनें हमारा आच्छा समाचार लिया. इतनेमें सुरज निकला और मैंने देखा तो अपनें सब लोक बहोत लाचार हुवे है. फेर मै आपनें सब लोककु लेकर व्हासे जो भाग आया तो रामदुर्गपर सब लोक रख दिये, और

मै ए रस्तेसें आपके पावकें पास हजर हुवा हूं, दुसमानवी रामघाटकें रस्तेसें शहरके हत्तीदरवाजे नजीक आकर उनें मोर्चा लगादिया है. चलो, चलो, क्या देखते हो ? महाराज, आब जल्दि तयारी करो.

सेना.—आछा बहादरसिंग तुम घबरो मत. कुच फिकीर नहीं. चंद्रपुरके राजाका मै आबी समाचार लेताहूं. सुनो भास्करराव, तुम पचास हजार स्वार लेके, और प्रतापसिंग जमादारने पचास हजार पायदल लोक लेकें, और सुंदरसिंगने दोसों तोफ—तोफखाना लेकें व्हां हत्तीदरवाजेपर जाकें आबी पाव घंटेमें तयार रहना. और बहादरसिंग, तुंम एक लाख फौज लेकर सब गांवकोसके उपर और चारो दरवाजेके उपर बंदोबस्त करनां. पिछेसें मैबी हत्तीदरवाजेपर मदतकू आताहूं. चलो कचेरी बरखास करो. सब लोक हुशारिसे आपापनें होकम माफक काम कर्नां चाहियें. नहीतो मै किसिकी, इदर उदर सुन्नेवाला नहीं. कबी किसीकि, कसर मेरें नजरमे आयीं, तो तोफके आगे देउंगा. चलो, भगवानका नाम लेकर निशान ठोक देवो. मैजरा माहाराजकीं, और सुविचार प्रधानजीकी, वाडेमे जाकर मुलाकत लेताहूं. और पिछेसे आबी तुमारे मदतकू आता हूं.

—(जमा॰ सुभे॰ भा॰ बाहादर॰ सर्व मंडळी आज्ञेबरहुकूम कर्तो ह्मणून बोलून) कचेरी बरखास्त होते.

पडदा पडतो.

(पडद्याबाहेर).

विदू॰—(बाहेर येऊन) का सूत्रधार कोठें आहे आमचा घो-

डा? घोडा नाहींतर बैल आणा. चला, आदपाहो मंडळी, व्हां तयार. चला, सूत्रधार माझी कंबर बांधा पाहूं? बळकट चऱ्हाटाने बांधा नाहीं तर लढाइत सुटेल विटेल एखादी. ती तरवार आणा, कट्यार माझ्या पागोट्यांत बांधा, आणि हि बंदुक गळ्यांत आडकावा, ह्मणजे आह्मी पंच हत्यारी सिपाई बनलो! चला, सूत्रधार. शत्रुनी फार गडबड केली हत्ती दरवाज्यावर. आपण तर बा, ज्याची पोळि खाल्लि, त्याची टाळी वाजविणार. नाहींतर यज्ञ झाला तेव्हां लाडू खायला तेव्हढे पुढें पुढें, आणि आतां तुह्मी मागे हटता नाहीं?

सूत्र०——आहो फक्कड सिपाई, आह्मी किती झालो तरी जातीचें ब्राह्मण तेव्हां आह्मी लाडूच खाऊन राहवें, आणि लाढाईंत जाणें हें तुझ्या सारख्यां शूराचें काम.

वि०—हें काय विचारावें, आहो, (हळूच) मी जात नव्हतो, पण सेनापतीला मी नाहीं ह्मटल्याबरोबर कंबरच त्याची खचली, आन् तोंड चिमणी सारखें केलें. मग मला बोबा दया आली. आणि चंद्रपूरच्या राजास जिवंत धरून आणतो [ह्मणून जो प्रतिज्ञा करून निघालो, तो आपले घरी जाऊन तिसऱ्यामजल्यावर आंधारांत लेप गुर्गटून हावेळपर्यंत निजलो होतो. आजून सुध्धा ती अंगातली थिरथ्री गेलि नाहीं, हे पहा आंग कुड् कुड् कुडू करते आहे.

सू०—शाबास, एकून आजून लढाइला प्रारंभ नाहीं तोच तुला थंडी भरून आली, मग चंद्रपूराचा राजास जिवंत कसा धरणार?

वि०—छेब्रा तसे कांहीं नाहीं, मी आपला. मी कधी बोललो चंद्रपुरचा राजास धरीन ह्मणून? पण काहो? लढाई झालिच नाहीं का आजून? आणि सेनापतीच्या केचेरींत



दिल्लीदरवाजावरील लढाई

बेत ठरून हत्तीदरवाज्याकडे सर्व गेले ते? मी आपला दोन घटका लेपांत जाऊन बसलो आणि तितक्यावेळांत लढाई बिढाई झालिहि असेल ह्मणून आता बाहेर आलो, एकून लढाई व्हायची आहे आजून ?

सू०—अरे, सांगतो श्रवणकर सैनापतीचा कचेरींत सर्व बेत ठरून सर्व मंडळी बंदोबस्तास गेली, आणि सेनापती राजवाड्यांत गेले हे तर तूं पाहिलेस ?

वि०—हो, हें इतपर्यंत मी पाहिलें, पण पुढें?

सू०—मग सेनापती राजवाड्यांत जाऊन त्यानें राजास व प्रधानास सर्वांस झालेली हकिकत सांगून व त्याना सावध राहण्यास सांगून आपण हत्तीदरवाज्यावर बंदोबस्तास गेला. तेथें आता सर्व प्रकारें कडेकोट लढाईची तयारी झाली आहे. तिकडे चंद्रपुराचा राजाहि आपल्या सर्व सेनेंसहवर्तमान तयार आहे, आणि आता उभयपक्षी रंजूक झडून महा अनर्थ होणार आहे. इश्वर करो आणि आपल्या प्रभूस जय येवो ह्मणजे झालें. आता मी हि तिकडे जाण्यासच निघालो आहे, तू येत असला तर चल मजबरोबर.

वि०—आपण नाहीं हो बुवा (कानावर हात ठेऊन) आपण आता तिकडे कशास यावे? आतां आह्मी शयनंचमे करणार.

सू०—बरें तूं जर तिकडे येत नाहींस, तर चमत्कार तुला येथेच दाखवितो आवलोकन कर.

## भाग २

स्थळ–चंद्रकांत राजाचा डेरा.

### प्रवेश ३

चंद्रकांत ................ चंद्रपुरीचा राजा.
सिंव्हबल ................ त्याचा प्रधान.
धैर्यशिल ................ सेनापती.
हनमंतसिंग................ जमादार.
हुकमतसिंग................ हावलदार.
रणछोडराय................ सुभेदार.
विदूषक ................ मनरंजनकरणारा.

(चोपदार भालदार वगैरे.)

सिं०—(चंद्रकांत माहाराज बसलेत आहेत पाहून) सरकार, मीं सिंव्हबल वंदन कर्तो.

चं०–शाबास सिंव्हबला, कल्याण आसो. कसे काय? शत्रूकडील वर्तमान कसे काय? त्यांचा तर मोठा कडेकोट बंदोबस्त दिसतो, शिवाय त्यांचेजवळ फौज आपल्या पेक्षां ही तिप्पट दिसती आहे ?

सिंव्ह०—खरी गोष्ट महाराज, आज सकाळपासून, आपण पाहत आहां कीं, आशीं लढांई माझे व किंबहुना आपल्याहि अठवणींत झाली नसेल, अशी झाली. परंतु शेवटीं संध्याकाळीं यशाचा झेंडा तिकडेसच लागला. फुकट आपले चाळिसहजार पायदळ तिनहजार घोडेस्वार आणि सत्याणव तोफा यांचामात्र नाश झाला. कसेहिं झालें तरी त्यांच्याकडे आपल्या पेक्षां चवपट फौजेचा भरणा आहे.

आणि आपण वास्तविक निर्बळ, तेव्हां कसा टिकाव लागतो ! एरवी आपले लोक आहेत तितकेच केवळ निवढक व शूर आहेत, परंतु करतात काय ! सकाळ पासून आस्तमान पर्यंत इतका जरी आपला मोड झाला, तरी एक मनुष्य देखील आपले पाठदाखऊन पळाले नाहीं. तसेच दम धरून निकरानें लढून मेले.

चं.—मग पुढें विचार काय ! सेनापतीला तरी बोलोऊ पाठवा. आणि त्याबरोबर जमादार सुभेदार वगैरे मंडळीसहि विचारास बोलवां. ह्मणजे कायतो एक निश्चय करता येईल, नाहींतर मग शत्रूस पाठदाखविण्याचा प्रसंग कपाळीं येईल ! !

सिं.—खरिगोष्ट. आज्ञे प्रमाणें सर्वांस बोलावणें धाडतो. (असे ह्मणून जासूदास सर्वांचे डेऱ्यांत पाठवितो.) नंतर (प्रधान आणि चंद्रकांत बोलत बसलेत तोच सर्व मंडळी येतात.)

धैर्य.—वदंनकरतो महाराज.

चं.—कल्याण. धैर्यसिला बसावे. (नंतर सर्व मडंळी. सरकार, वंदनकर्तो, महाराज, वंदन कर्तो; असें ह्मणून खाली बसली.)

सिं.—पाहिलेका सरकार ? आज सेनापतीचें मुखतर पहा, काय श्रमानें निस्तेज झाले आहे ?

चं.—हे काय विचारावे, प्रधानजी, आज सर्व लढाईचें श्रम काय तें याचेच माथीं. आणि आजच्या तडाक्यांत हाच होता ह्मणून कांहीं आपण आजून या जाग्यावर आहोत, नाहींतर एव्हाना रामघाट वोलांडून जाणे झाले असते. असो. (धैर्यसिलाकडे वळून) धैर्यसिला, आता पुढें काय तजवीज? आपला टिकाव लागेल का ?

कारण एक चतुर्थांश नाश तर आजच झाला, शत्रूकडी-
ल दमतर चौपट दिसतो आहे, तेव्हां विचार?

**धैर्य०**—सरकार, आपण आगदीं या विषवीं काळजीं करूं
नका. आज जरा पुर्वींच माझी मसलत चुकलीं, ना-
हींतर आजच शृंगारपुरीचा राज्याभिषक आपणास केला
असतां. असो, त्यांचे चवपट सैन्य आहे, आणि माझे
एकपट आहे तरी, सरकार उद्या चमत्कार पहाल काय
होतो तो.

**हन०**—आजी काहेकूं फिकिर सरकार करतेहो? (हात जोडू-
न) ससूरकी मगदूरक्या, मेरी समसेर क्या सोईहै? कल
देखलेउंगा सालेकूं कैसा शौर्यसागर ओर विर्यसागर.

**हुकमत०**—आजी काहेका शौर्यसागरले बैठेहै, जमादार? क-
ल मेरें आघाडी आनेदेव दुसमानकू. फेर मै देख ले-
ताहूं, नहीं तो आबी सरकारने होकम दियातो, आबी
शृंगारपूरकूं बत्ती लगा देताहूं. (चवताळून) ए लंडीकू तु-
मारि समसेर काहेकू नंगी करते हो. कल देखलेव, कै-
सा तमासा उडा देताहूं. मेरे आगे आना चाहिये, फे-
र शौर्यसागर और कौर्यसागर (तरवार उगारून) की
कत्तल उडा देताहूं. क्या बोलत हो?

**सिं०**—नाहीं हवलदारसाब, एबात सच्ची. लेकिन, महराज-
का दिल बहोत घबरागया है उसवास्ते जरा आच्छा वि-
चार करना चाहिये.

**रण०**—(मधेच तोंड घालून) नहि एमा शुं मेरी बात सांबळो.
दुसमान पछी गयो, आबे एमा शुं थाय. ए वात जुदी.
आपने शुं. कोइबी वधारे आपेच एने आपूं बिजोशूं.
इतक्यांत (विदूशक हळूच शिरकाव करून आंत येतो.)

**वि०**—वाहावारे वा काय मराठी दरबार अहे ? सुभेदार साव,

तुह्मी हुंडीची दुकान सोडून, हि तरवार बाहादरी केव्हां-पासून मिळविली ? एकून म्ऱ्हाठीं राज्यांत वशीला आसला ह्मणजे झाले. त्यास हविती हुद्याची जागा मिळते. पलटणीचें सरसुभेदार झालांत पण तरवार तरी धरता येती काय ? पुढें यावरून कवायतींत तर आगदीं हुशारच आसाल. फुकटची नांवें मात्र, धैर्यशील, आणि सिंव्हबल, पण हातानें मांजर सुद्धा धरवणार नाहीं. (मनाशीचि) एकून माझेंच दैव्य फुटकें ह्मणायचें पुर्वीं भुवनपाल राजाकडे कांहीं लोक हुशार असतील ह्मणून त्यांचेकडे मदतीस गेलो पण तिथें काय? शत्रू हत्तीदरवाजावर आले तेव्हां मग शिपाई लोक तरवारी पाहूं लागले. कोणी घोडें कोठें चरतात ह्मणून पाहूं लागलें, असे हुशार बरे, इकडें आलो तर इकडें आगदी कडे कोट सर्वच शिकलेले. मघांपहाना ? चंद्रकांत राज्याचा आणि प्रधानादिकांचे कोणत्या प्रसंगाचें बोलणें, आणि त्यांत हें रणछोडराय, एमोशूं एमोशूं करीत होते. तेव्हां पलटणीचें सुभेदार काय उपयोगीं ? मुख्य सुभेदारच असे, तर मग पलटण किती हुशार असेल ? अरे राम ; या पेक्षां इंग्रेजी बरीं, एक सुध्दा लोक कवायती वाचून नुसता शोभेला ठेवणार नाहींत. असो आपलें काय जातें. आपण मौज पाहण्याचे धनीं. (उघडपणानें) सुभेदारसाब, राग येउ देऊ नकां. मी आपला थट्टेनें बोललों. नाहींतर चंद्रकांताचें राशतींत आपल्या सारखें शूर दुसरे कोणीच नाहींत. असे ह्मणून (लपून बसतो.)

सिं०—सरकार, आतां मी एक पोक्त सल्ला काढला आहे, आणि त्या विचारानें कार्य फत्य होईल यांत संशय नाहीं. एरवी समोर लढाई देऊन ह्मणजे आपण जय मिळऊं

असा रंग आतां राहिला नाहीं. कारण आपला किती दम होता तो शत्रूस समजला. अता उपयोग नाहीं. तो रंग पहिल्या तडाक्यांतच उडाला आसता तर आसतां; आतां साधनें नाहीं. ह्मणून मी जी युक्ती काढली आहें, तिनेंच घर घ्यावें. धर्म शास्त्रांत तरी साम, दाम, दंड आणि भेद. असें चार मार्ग सांगितले आहेतच की नाहीं? त्यांतलाच एक मार्ग मी योजला आहे.

चं०—प्रधानजी. कोणता मार्ग योजीला आहे तो सांगा पाहूं. तुमची बुध्दी मोठी खोल आहे, आणि मसलत अशी तुह्मीच योजावी.

ध०—हो, हो. ते खरे सरकार. मागे तरी सुंदरपुरीचा लढाईंत प्रधांजीचीच युक्ती उपयोगी पडली.

हन०—हो अशी कांहीं युक्ती असेल निकालना, नहीं तो हांम संमशेर लेके तयार खडे हैच है. औरक्या.

हुक०—आजी काहेकूं उगत और बिचार. कल कत्तल करदेताहूं सबकों, उसमे है क्या. उसकु आनेतो देव आघाडी, फेर मेरीबी हातचलाखी देखो.

चं०—आजी हुकमतसींग, तुमारी बात बहोत मिठ्ठी लगतीहै, लेकीने क्याकरना, दुसमानकीं तयारी आपनेसें बडी जादी है, और ए आंदरसें और गावकोसपरसे, मार छोडतेहै, आपनेकुं ह्याकुच आडोसिकीं जागानही. और मेरीबात सुनो? आप आपनें जगाछोडकें ह्या आये है, एकारणेसे आपनादमजरा कमती हुवा है. और दुसमान आपनें जगापर खडाहै, उसवास्ते उनका दम जबर दिखताहै. इतना है तोबी आपकुइ डरनेवाले नहीं, लेकिन प्रधानजीकी उगत कुच सबके मनमे आंई, तो उसरस्ते-

से करना, ऐसा मेरा बिचारहै. और एकुच नहीं हुवा तों बडी फजर सबभरोसा तुमारे उपरचहै.

हुक०—(हातजोडून) आछा खावंद; मैक्या होकमकाबंदा है और, ए शीर सरकाके पावपर रखाहै चाहे मारो और तारो.

चं०—हं, प्रधानजी, बोला पाहूं काय विचार योजिला आहे? रात्र फार होत आली.

सिं०—महाराज, संकट येऊन शत्रूस पाठ दाखऊन जाण्यापेक्षां मतलबानें एखादि असाध्य गोष्ट साध्य करून घ्यावी हेंच योग्य. आणि शास्त्रही या प्रकारास अनुमोदन देते, कीं असाध्य गोष्टीस साम, दाम, दंड, भेद करून साध्य करून घ्यावी. आतां हें जर प्रायः खरें आहे तर प्रस्तुत आलेल्या सकंटास भेदच करून निवारण करावें हे रास्त आहे. कारण भुवनपाल राज्याची सैन्यसंपती फार उत्तम आहे व त्यांचा मंडळीचा जूटहि अतिउत्कृष्ट आहे; तेव्हां भेद केल्या वाचून कार्य सिध्धी होणार नाहीं. इतक्यावर सर्वांचा सल्ला व आपला हुकूम होईल तसे.

चंद्र०—ठिक आहे. प्रधानजी, हाच बिचार योग्य. का धैर्यसिला, तुझे मत कसे?

धै०—माझे मत काय? आपला हुकूम होईल तसे. आपण मतलबानें कार्य सिध्धी करा आगर आमचें द्वारें ह्मणाल तर आह्मीं गादिचे बंदे आहोत, तेव्हां शिर हातावर घेऊनच उभें आहोत.

ह०—आजी काहेकू मतलब और गतलब. हमारा तो सम-

सेर विनाकुच मतलब नही. केव होकमत सिंग? (मिशावरताव देतो. )

होक०—जी जमादार. क्या बोलताहो? सरकारके आगे कुच बंदेका चलता नहीं. नही तो मतलब वितलब सब (तरवार उपसून) ए देखो. होकम हुवातो आबी घंटेमे [अर्धेचबोलून.]

रण०—शूं मतलब शूं बोलेच, महाराजानें आवे केह्या, शूं समसेरना काम छे?

चंद्र०—प्रधानजी त्यांचे हें बोलणें आणि विचार कांहीं उपयोगीं नाहींत, सर्व हुकमाचें नौकर. दुरवर पाहणें ही आपणास काळजी. कोणता आणि कसा भेद कारवा सांगां पाहूं?

सिं०—ती मी सर्व तयारी केली आहे. आपण हूं ह्मणा ह्मणजे झाले.

चंद्र०—अहो माझा हूं तर आहेच. आणि मी तुमच्या बाहेर नाहीं. पण कसा घाट केला आहे. हें तर कळूद्या?

सिं०—विचार असा केला आहे, त्यांचे मंडळीत सर्व जणतर हुशार, शूर व शहाणें आहेतच पण त्या सर्वांत बाहदर सिंगा सारखा शूर, व भुवनपालाचें कृपेतील विश्वासू असा दुसरा कोणी मनुष्य नाहीं. ह्मणून त्यासच मीं आपलासा केला आहे. आणि जर हें राज्य हस्तगत करून देशील तर तेविसलक्षांची तुला जाहागिरी देउं, असे मी कबूल केले आहे. नंतर त्यानें युक्ती सांगितली, " कीं उद्या हत्तीदरवाज्यावर सर्व आमचें लोक लढाईस येणार आहेत, आणि वरकड सर्व दरवाजे व राजवाडा, भोंवतालचा गांवकोस, व शहरांतील सर्व बंदोबस्ताचें काम मजवर सोपलें आहे. हत्ती दरवाजावर तुमची त्यां[illegible]

ढाई सुरू झाली, कीं पंचवीस हजार फौजे सुधा तुम्ही बिलास दरवाज्यानें खुशाल शहरांत या. मी तुम्हास अटकाव करणार नाहीं नंतर—प्रथम राजवाड्यावर हल्ला करा, म्हणजे भुवनपाल सुध्धा हस्तगत होईल, झालें. हे काम करतेवेळी वरकांती मात्र मीं लढेन परंतु आंतून तुमची मदत करीन राजा हस्तगत झाल्यावर बहुधा सर्व दाणा दाण होईलच कादाचीत शौर्य सागर कांहीं कमी जास्तीं करील, तर मी एक लाख फौजे सुध्धा तुमच्या पाटीस आहेच." सरकार, हें त्याचें भाषण ऐकून मी नुस्ति सनद तेवीस लक्षांची त्यास लिहून दिली आहे आणि सांगीतलें, कीं पुढें राज्य हस्तगत झालें, कीं लाग लीच आमचे सरकार सन देवर मग साहिशिक्का करून देतील." माहाराज, असा घाट करून ठेविला आहे. तेव्हां उद्या धर्यशील हत्ती दरवाजा संभाळील, आणि मी हें काम करीन.

चंद्र०—ठिक ठिक प्रधानजी, शाबास. याचे नांव काम. चला तर घ्या देवाचें नांव. करा उद्याची तयारी इतक्यांत (विदूषक येऊन)

वि०—वा प्रधानजींमीं खुप बाईल बुद्धी सांगितली. काय राव! नांव तेव्हढें सिंव्हबल, आणि बल तर उदंराचे देखलि नाहीं. वाहवा (प्रधाना कडे पाहून) शूर लोक अशी बायका सारखीं राज्यें कमावतात काय? सामर्थ्य असेल तर बाहूबळा वर कमवावें, नाहीं तर तळ हातांत पाणी घेऊन जीव द्यावा. मी मघां पासून सर्व बेत ऐकिला आहे. हा पाहा जातो आतां. भुवन पालास सांगून बाहादर सिंगाचा पूर्वींच बंदोबस्त करतो. (जाउं लागतो.)

सिं०—अरे कोण आहेरे, याला आडकऊन ठेवा उद्यापर्यंत नाहींतर हा फितुरी मनुष्य आहे. झालेले सर्व वर्तमान तिकडे जाऊन सांगेल. (विदूषकास पाहाऱ्यांत ठेवितात. )

चंद्र०—ठिक आहे. आतां मी अम्मळ निजतों. रात्र फार झाली. तुह्मी सर्वांनीं (मंडळी कडेस पाहून] प्रधानजींनीं विचार केला आहे. त्या प्रमाणें मदत ठेवावी. आणि शृंगारपुरीवर उद्या आपला यशाचा झेंडा चढवा. वा. इतक्यांत. (दसघडी रात बजगई ग्याराका अ- अम्मल है माहराज. [घड्याळवाला पुकारतो.]

नंतर—सर्व मंडळी मुजरे करून आपापल्या डेऱ्यांत जातात.

(पडदा पडतो. )

पडद्या बाहेर

वि०—(कन्हत व कुंथत) आग आईगं! अरे देवा!! )लंगडत) आतां काय करूं ?

सु०—अरे कोण आहे ते ? कोण! विदूषका तूं आहेस कां ? कारे, असा कन्हत कुंथत इवळतोस कां ? कोठें मार मिळाला कीं, काय ?

वि०—माहराज, नमस्कार असो तुह्माला. हा तुमच्याच संगतीचा प्रकाश. पुर्वीं वाटले कीं तुमचें संगतीनें कांहीं लाभ होईल, पण हा एव्हढा मात्र लाभ झाला. (असे ह्मणून— " अरे देवा ! आतां हा पाय कसा नीट होतो ? पाठीवर हळदबोळ तरी कोण घालील ? —असा इवळतो.

सु०—अरे पण झाले काय ? त्या सपाऱ्यांतून वांचून आलास, एव्हढाच भ समज. फार वेळ ह्मणत होतास, "की आह्माला नको असे सर्व बायकाचे नाटक,

आह्मी आपले जातो, कांहीं धडा धडी नाहीं फडा फडी नाहीं, सर्व आळणी आळणी." घे आतां ठिक झाले की नाहीं ? पुर्वी चांगलें यज्ञांत लाडू खात होतास, ते तुला आवडलें नाहीं. आतां ठिक आहेना ? तरी पुर्वी मी सांगत होतों, लढाईचा गोष्टी दुरून कानानीच ऐकाव्यांत, पण तुझे ऐकतो कोण. आतां पाय मोडला, इवळ सावकास. आमचें काय गेलें ? ज्याचें फळ तो भोगीतो.

वि०—(मोठ्यानें दोन्ही पायावर उडी मारून) सुत्रधार, मी का लंगडा झालों कीं काय ? आहो अशा सत्तावीस लढाया जिंकल्या आहित, ह्या पहा सर्टिफिकीटी. तुमच्या मनांत हात पाय मोडून आलो असेल ? पण हा आस्मादिक समुद्रांत गेला तरी कोरडा निघणार. बरें असो आतां काहो ? सुत्रधार, कसी काय हकिकत झाली ? शृंगारपुरीची अगदीं दुर्दशा झाली ह्मणून ऐकतो.

सु०—अरे दुर्दशा ह्मणजे काय, तुला नाहीं का माहित ? मग तूं कोठें होतास तर इतका वेळ ?

वि०—छेहो, मी नव्हतो ह्मणून तर खरें, मी उगच चंद्रकांत राजाकडील कसा काय थाट आहे तो एकादा जाऊन पाहावा ह्मणून आधल्या दिवशीं रात्रीं त्यांचे डेऱ्यांत जाऊन लपून बसलो होतो. तेव्हां आपल्या बाहादरसींगास फितिवले वगैरें सर्व मजकूर प्रधानांनीं राजास सांगितला, मी लपून बसलों होतों तरी मला वाईट वाटून मी त्यांचे समोर जाऊन उभा राहिलों, आणि त्यांच्या तोंडावर त्यांची नीदा करून सांगितलें कीं, मी हा मजकूर आतां भुवनपालराजास जाऊन सांगतों आणि बाहदरशिंगाचा पुर्वीच वदोबस्त करतो. असें ह्मटल्या ब-

रोबर त्यानीं मला धरून बंदींत ठेविलें. नंतर अज तनिदिवस हातापाया पडतां पडतां आज मोकळा झालों. पुढें गांवात जावें तर जिकडे तिकडे धराधरी आणि मारामारी, चहुकडे गडबडच. तेव्हां कोठें जावें अशा विचारांत गुंग झालों तो इतययांत आपली भेट झाली.

सु०–(कपाळास हातलावुन) अरे द्वाडा ! ! लपून बसून असा मजकूर ऐकला होतास ? तर मुकाट्यानेच तेथून उठून गावांत यायचे होतेस, आणि अगोदर प्रधानास व राजास तो मजकूर सांगितला असता, तर बाहादरसींगाचा मुद्दलच बंदोबस्त झाला असतां, आणि तुला या कामा बद्दल चांगलें बक्षीस मिळालें असतें, अरेरे, घालवीलिस मसलत. त्या बाहादरसींगानेच एव्हढाघात केला ! !

वि०–काय ?घात झाला ?कसें काय झाले हो सांगा एकदा.

सु०–सांगाकाय. "मुर्खा पुढें वाचालिगिता." तुला कांहींच ज्ञान नाहीं. मग काय सांगा ;

वि०–नाहीं सुत्रधार, तुमच्या पाया पडतों. एकदा सागां;

सु०–अरे ही गोष्ट कांहीं खरोखरी नाहीं झाली ? नाटक रुपानें या रंगमंडपीं मींचहें सर्व करून दाखविलें. आणि सांगा काय ? नीट शुध्धीवर ये. आपण काय करतो आहोत ?

वि०–हो, हो, तुह्मी आणि मी दोघेही हें चरित्र कत कल्पित करून दाखवितो आहो, आणि सर्व सभासद पाहताहेत, खरी गोष्ट.

वि०—पण काहो ? यांहीं भागांत हंसपालिका कोठें दृष्टी नाहीं पडलि आजून ?

सु०—अरे, इतका वेळ हंसपालिकेचें नादानें तरी तूं चांगलि मदत करावीस, ह्मणून तसेच सांगत गेलो, पण आतामात्र—तिसऱ्या भागांत तुला हंसपालिका खचित दाखवितों. इतका वेळ झाला हा पहिला आणि दुसरा भाग झाला. त्यापैकीं प्रथम भाग सर्व तुझ्या ध्यानांत असेलच, आणि दुसऱ्या भागांत सेवटीं बाहादरसिंग फितूर होऊन शत्रुच्या प्रधानास वाड्यावर जाण्यास वाट देणार वगैरें मतलब तूं ऐकिलाच आहेस. पुढें काय झालें तें थोडक्यांत सांगतो श्रवणकर.

—"दुसरें दिवसीं खरोखरीच सिंव्हलल शहरांत शिरून प्रथम राजवाड्यावर हल्ला केला. त्यावेळीं सर्व शहरांत गडबड होऊन गेली. जो तो एकमेकास मारीत सुटला, चहूंकडेस पळापळी झाली, घरोघर दरवाजे बंद झाले, रस्त्यानें मारामारिशीगाठ. भर दोन प्रहर दिवस आलेला, लोकांनीं मारलें ह्मणून राजाकडेस शरण जावें तो तेथें पुर्वींच बाहादरसिंगानें सर्व शिपाई फितवलेले. मग काय विचारतोस ? सर्व शहरांत हलकल्होळ झाला.

वाड्यांत गडबड झाल्या बरोबर भुवनपालही माहालांतून पाहूं लागाला, तो सर्व शहरांत मुडद्याशीं गाठ. चहुकडें भयान दिसूं लागलें. हत्तीदरवाज्यावर तर अगदीं कहरच गुदरला. हजारो हत्ती मेले, लक्षावधी फौजेचा अगदीं चुराडा झाला. तोफांचा धूर अष्टदिशेस अगदी भरून गेला आहे असे पाहिले." विदूषका, अशीं वेळ कधींच कोणाचें दृष्टी पडली नसेल. या प्रमाणें बाहदर सिंगाने फितूर करून चंद्रकांत राजाचा यशाचा झेंडा शृंगारपुरीवर लाविला. आणि भुवनपाल स्त्री सहवर्तमान कोठें नाहींसे झाले याचा

पत्ता नाहीं. तसेच शौर्यसागर वगैरे सर्व मुच्छादि मंडळी कोठें नाहींशीं झाली याचाही ठिकाण नाहीं. विदूषका, अ प्रमाणें दुसऱ्या भागांत चरित्र झालें.

वि०—सुत्रधार, अरेरे, काय हें सांगितलेत? एकून शृंगारपुरिचें राज्य चंद्रकांतानें घेतलेन? अरे राम राम राम. भुवनपालावर केव्हढा हा प्रसंग!!! सुत्रधार, पुढें काय झाले, आणि हंसपालिका कशीं दृष्टी पडणार, हें चरीत्र करून दाखवानांत? आजून रात्र फार आहे. मी तर अगदीं आनंदानें तुह्मास मदत करीन. कारण मला फार चटकाच लागला आहे. मलाच काय सर्व संभासदांची सुध्धा हंसपालिका दृष्टि पडण्या विषयीं उत्तकंठा आहे.

मु०—ठिक आहे. विदूषका मी आतां तिसरा भाग दाखवितों. तूंमात्र कंटाळू नकोस (असे ह्मणून निघून जातात.)

दुसरा भाग समाप्त.

# भाग ३

## प्रवेश १

**स्थळ—मोहनबाग.**

**भुवनपाल** ................ राजा
**भुवनसुंदरी** ................ राणी
**हंसपालिका** ................ प्रसादीक कन्या.

**भुवन०**—प्राणनाथ, सूर्यमाध्यानास आला; आतां तरी क्षणभर कोठें विश्रांतीघ्या ? येऊद्या त्या मेल्याना, आले तरी जीवच घेतीलना ? घेउद्या एकदा. ह्मणजे यांतून सुटलो तरी. मागून येतील, मागून येतील, या धाकानें आतां किती पळ काढावा ? काल दोनप्रहर पासून, आज दोनप्रहरपर्यंत एक सारखें आपण मागेपाहत पुढें पळतो आहोत. प्राणप्रिय, शेपन्नासकोस शृंगारपुरी मागे राहिली असेल, आतां कशाचें भय ?

**भु०पा०**—सखे, भुवनसुंदरी, नाहींग नाहीं. आपण सुमारें दाहापाचकोसच ह्याबेळ पर्यंत आलो आहो. तेव्हां शत्रुपासून फार लांब आलो नाहींत. कदाचित पाठलाग करीत आले तर ? या कर्तां निदान शेपन्नास कोस तरी गेले पाहिजे. (जवळ पोटाशीं धरून) प्रिये, तुला कधीं सुर्य किर्ण माहीत नाहीं, व दाहापांच पावलें पादचारी चालण्याची सुध्धा सवय नाहीं, तेव्हां अर्थातच शंभर कोस आलेसें वाटतें.

**भु०सु०**—माहाराज, शत्रू पाठलाग करीत आले तरी चिंता नाहीं. परंतु आतां माझ्यानें पुढें पाऊल टाकवत नाहीं

उन्हानें जीव घाबरा झाला, त्रिषेनें प्राण व्याकूल होतात; सर्वांगावर धूळ उडाली आहे, आतां दम धरवेना. (राजाचें तोंडाकडे पाहून) माझे मेले असो. पण आपली काय ही दशा ! ! मुखावर तिव्र उन्हानें लाली आली आहे, सर्वांगास घर्मानें स्नान झालें आहे, नको, नको, महाराज, आतां पळणें पुरें करा. आपलें श्रम पाहून माझी काय अवस्था होत असेल याचा विचार करा. ती पहा, ती जवळंच एक झाडी दिसते आहे, तेथें चला. ह्मणजे या कठोर हस्तानें (पायाकडे किंचीत पाहून) आपल्या सकुमार पायांची थोडीशी शेवा करीन. मेले दुष्ट शत्रू मागून आले तर माहाराज, एव्हढें मात्र कराकीं, (हात जोडून) आगोदर सौभाग्यवती मला जाऊंद्या. आणि नंतर पुढें ईश्वर इच्छा.

भु० मा०—मृगनयने, तुझ्या कोमल शब्दें माझें अंतःकरण दुःखी असतांही अनंदीत होतें. अहाहा, तुज सारखी रूपानें आणि गुणानें उत्तम स्त्री मला पुनः मिळेल काय? (तोंडावर हात फिरऊन) सखे, कसेंही संकट आले तरी (पोटाशी धरून) माझें आवडतीस मी सोडिन काय ! तुज सारखी प्रियवस्तू या जगांत मला दुसरी नाहीं, किंबहुना प्राण सुध्या तुज पुढें तुःच्छ आहेत: शाबास, तुझ्या पात्यवृत व्रतानेंच तुझें कल्याण होईल: धीर सोडूं नकोस. मी तरी इतकी पळण्याची तसदि तुला दिली नसती, परंतु विन हत्यारी असल्यामुळें थोडी काळजी वाटते: असो, कसाही प्रसंग आला तरी प्राण आहेत तावत्काल पर्यंत तुझ्या केसास धक्का लागूं देणार नाहीं; स्वस्थहो. आणि हळूं हळूं ती समोर झाडी दिसती आहे तेथें जाऊन विसावा घेऊ चल.

भु० रा० ठिक आहे प्राणनाथ, माझाही हेतूं तसाच आहे. (दोघेही चालू लागतात).

भु० मा० अगे भुवन सुंदरी, हे पहा आपण आतां झाडींत शिरलो, आतां कसे गार वाटतें तें ?

भु० रा० होय, मलाही अगदीं थंडवाटत आहे.. अहाहा, ज्यानें स्थळ बांधलें असेल त्याचें कल्याण होओ.

भु० मा० ये इकडे, माझ्या मागून येहो.

भु० रा०— होय. ही आलें पहा. (एक मेकाचा हात धरतात).

भु० मा० प्रिये, पाहिलीसका किती झाडी दाट आहे ? असें वन माझे कधीच पाहण्यांत नाहीं. हे अंब्र वृक्षपहा, किती उंच आणि विस्तीर्ण पणे पसरलेत ? ह्या जांबळी, पेरूं पहा ह्या सिताफळी, त्याचे पलिकडेच रामफळी, आणि ह्या उजव्या हताकडेस सहस्त्रावधी केळी पहा काय एक जात लाविल्यात ?

भु० रा०—पण ! माहाज, तें झाड कशाचें ? आग बाई ! असे झाड नव्हतें मी पाहिलें. फळें तरी केव्हढालीं आहेत ? त्याचें नांव काय सरकार ? [बोटानें दाखवितें.]

भु० मा०—हा वेडे. शेकडो वेळ तें फळ खाल्लें अश्शील ! पण नांव नाहींन ध्यानांत? तें पपनस नव्हे कां ?

भु० रा० हो, हो. खरें. मी बाई नांवच विसरतें.

भु० मा० तें असुदें. पण हीं तुझ्या डाव्या हाता कडेच लहान असून बोळीनेंच झाडें लाविलींत, ह्यांची नांवें काय ?

भु० रा० खरेंच कीं हो प्राणनाथ. ही झाडें मोठीं गमती ची दिसतात. आणि फळें तरी काय शानदर आहेत एकुण हीं फळें पाहण्यासारखी खरीं. नाहींतर मेलीं

मघाची ! काय मेलीं हिडिस्स ! फार ही मोठीं फळें शोभ—त नाहींत. हीं बरीक खरीं. प्राणनाथ, रंगतरी काय! थेट माझ्या काचोळी सारखाच आहे.

भु॰ मा॰—खरींच ही पहा [दोन फळें तोडून] हीं दोन फळें आणि तुज जवळील दोन अगदीं [ह्रिदया जवळ नेऊन] सारखीच दिसतात. तीं तरी तांबडी काचोळीवर असल्यामुळें हुबेहूब नारिंगेच दिसतात.

भु॰ रा॰ अहाहा. काय तरीपण! [राजाच्या हातास पीलकडे करून] अगदीं वेडच लागलें दिवसंदिवस. खऱ्या भावानें विचारलें तरी थट्टाच मेली.


भु॰ मा॰ अग, थटा कसली यांत, तुझी अवयवच तशी रेखली आहेत.

भु॰ रा॰ वर हो पण, माझी आपली असुद्या रेखली. तुम्हाला काय करायचें आहे त्याचाशी ?

भु॰ मा॰ माला काय करायचें आहे, तुझी अवयव तुलाच लकलाव असूदे. पण तूं मात्र माला हवीस.

भु॰ रा माझी अवयव तुम्हास नकोत ! मग मी तरी कशास्हावी ? आतां मात्र माझ्या अवयवास कधी हात लावालतर संभाळून असा.

भु॰ मा॰ हा वेडे. अलाका रागोपंत पुन: ? [जवळ घेऊन!] तूं पाहिजे म्हटले म्हणजे तुझीं अवयव नाहींका अली त्यात ? अवयव आणि तूं दोन आहांत का ? नाहीं. तूंही माझी आणि तुझी सर्व अवयव ही माझीच आहेत. (समजवितात)जरा कांहीं बोललेकीं लागलिच गाई पाण्यावर आल्यास-उगी-हेकाय? (आपल्या शेल्यानें डोळेपुसून) असें भलतेच मनांत समजून दु:खी व्हावें हें काय ? हेंच का



तें शहाणपण ! आतां पुनः नाहीं असे बोलणार. झाले, आतां गेलान राग ?

मु० रा०—(गालांत हसून) आला होता कधीं ? तो गेला.

मु० मा०—बरेंतर आतां थोडें अंजीर द्राक्षें नारिंग हीं घेऊन त्या पलिकडील कारंज्यावर जाऊं येतीसका ?

मु० रा०—हो. आपल्याला क्षुधा लागली असेल, पण बाई बोलाव कोणी ? माझा मात्र तीळ तीळ जीव तुटतो आहे. पण; इकडे कोठें आहे ध्यानीं मनीं.

मु० मा०—हीं पहा, हीं शेल्यांत आपल्या दोघां पुर्ती फळें घेतली. चल आतां पाण्या जवळ जाऊं.

मु० रा०—माहाराज, मला वाटतें त्या मधल्या संगमरवरी कारंज्यावर जावें. तेथें पाहिलिका काय मौज दिसती आहे ? सहश्रधारा किती बाई उंच उडतात ह्या ! अहाहा, आपला विलासबाग ही या पुढें तुच्छ आहे सरकार.

मु० मा०—बाग कशांचा विलासबाग ह्या पुढें. आतां भरदोन प्रहर झालेत, परंतु येथें हिवाळ्या सारखी थंडी वाजती आहे. आणि जागोजागीं कारंजी उडत असल्यानें, केवळ पावसाळ्याचाच भास होतो आहे. ते पहा. तें कारंज्या जवळ मोर कसे आनंदानें नाचतातते. लांडोरी तर आनंदानें त्याना अलिंगन देण्यास सिध्ध झाल्या आहेत. चहुकडें सुगंध वायू दर्वळून गेला आहे. हंस, चाष, बहिर, सांळुक्या, पोपठ भारद्वाज इत्यादि पक्षी आनंदानें वृक्षावर बसले आहेत. "कान दे" कोकिला काय सुस्वर गायन करीत आहेत. अहाहा. प्रियसखे, केवळ नंदनवनाचीच उपमा यास. या बागेची

मी पूर्वी किर्ती फार वेळ ऐकली होती. आपले सु-विचार प्रधानजी नेहमी याची तारीफ करीत, असे, आपल्या शृंगारपुरींत धनपाल ह्मणून जे सावकार आहे त्याचा हा बाग असें वाटते. आणी याचे नांव ही मोहन बाग असे माझे ऐकण्यांत आहे. खरोखरींच बागेत आले ह्मणजे माणसास मोहनीच पडती. हा तयार झाला तेव्हां दोन तीन वेळ धनपाळ मला विनंती कर्ण्यास आलाहोता कीं. "एकदा माझे बागेस पायलागावेंत" पण मीं आज येऊं, उद्या येऊं असेच सांगीतलें. असो., बागेत आल्या बरोबर आपल्या सर्व श्रमाचा परिहार झाला. प्रिये, आतां चला त्या कारंजावर फराळ करूं.

भु॰रा॰—चला लवकर. (असे ह्मणून दोघे ही फराळ करावयास जातात.)

(फराळ झाल्या नंतर)

भु॰रा॰—सरकार, ते पाहिलेकां तुह्मीं ? ते पाहा. येथें उंचउभे राहून पाहिले ह्मणजे पलिकडेस अगदीं गर्द एक सारखे अशोक वृक्ष लागले आहेत आणि मधें मोठें विस्तिर्ण सरोवर दिसतें आहे. त्यांत कमळें तरी किती प्रफुल्लित झालीत ?अहाहा. महाराज, त्या गर्द छायेंत सरोवराचे काठीं आपण स्वस्थ विश्रांती घेऊं चला.

भु॰रा॰—भुवनसुंदरी, कोठें आहेग ती छाया ? (उठून उभा राहून) हं, हं. खरेंच, फारच रमणीय स्थळ आहे. चल आपण तिकडे जाऊं.

(दोघेही जातात.)

भु॰रा॰—सरकार, मी ह्मटले तशी आहेन जागा !

भु॰मा॰—वा: जागा काय फारच सुंदर आहे. पण ! ती एक गम्मत पाहिलिकां ? (बोटानें दाखविते)

भु॰रा॰—कुठें आहे हो? हं, हं. पाहिले. ती दाट वेलाचें घर असल्या प्रमाणें जागा झाली आहे ती?

भु॰मा॰—हो. त्या वेलाच्या घराजवळ शेकडो हंसपक्षी एक ठिकाणीं जमलेत आणिं जेवण करतात असे वाटतें.

भु॰ रा॰—खरेंच महाराज. एक टिकाणीं कांहीं खाण्याचा पदार्थ ठेवून ते सर्वत्र खात आहेत असे वाटते. चला आपण तिकडे जाऊं येतां!

भु॰ मा॰—कशाला? येथें बसून नाहींकां दृष्टि पडत?

भु॰ रा॰—पण तुह्मी नाहींन तिकडे येत? नाहींतर मला तरी रजा आहे कां?

भु॰ मा॰—हो. तूं जाऊन पाहाजा. मी येथेंच बसतों.

भु॰ रा॰—बरेंतर. मीच जातें. (दोन तीन पावले पुढें जाऊन) पण बाई मला भय वाटतें. ते मेले डसतील बिसतील नाहींतर! तुह्मी चलानात बरोबर.

भु॰ मा॰—अग, मी अगदीं जवळ आहें. आणि तूं तरी त्यांचे जवळ जाऊ नकोस, लांबून पहा काय आहे ते ह्मणजे झाले.

भु॰ रा॰—बरेंतर. मीच जातें. (हंसपक्षा जवळ जाऊन) अहाहा. (मनांत) कायग बाई रत्न हे! वा: किती सुंदरपणा! लेक आहे बरकां. [टाळी वाजवून] अहाहा अगांवर रत्नखचीत बाळ लेणी घातलीत. पण हे कन्यारत्न कोणा भाग्यवंताचे असावे. अहाहा. पक्षीपहा, कोणी पंखानें छाया धरतात, कोणी चंचूनें अन्न मुखांत घालतात. दूधपाजितांत. आणि शेकडो राजहंस पक्षी इचे ममतेनें पालन करतांत. वः काय आश्चर्य!! कोण भाग्यवंत माय इला व्याली अ-

सेल ? अहाहा. कांति केवळ सुवर्णा प्रमाणें चमकती आहे. नेत्र किती पाणीदार आहेत ? शाबास, याचें नांव स्वरूप. नाहीं तर आह्मीं, जन्मास येऊन व्यर्थ. अहाहा बाळाचेहस्यवदन पाहून उचलून घ्यावेसे वाटते. अरेरे. माझ्या स्थनांतून दूध ही येऊं लागलें. काय हा चमत्कार ! ! कसे ही असो आतां प्राणनाथास हिकडे हाकमारून, या बाळास उचलून आणावे. अहाहा केंव्हां पोटाशीधरून चुंबन घेईन ? देवा ! असें सुख माझे प्राळब्धीं लिहिलेंच नाहींस का ? (असे ह्मणून भुवनपालास हांक मारते.)

भु० पा०—(धावत येऊन] कांगे, घाबरालिस कां ?

भु० रा०—अहो, घाबरले नाहीं. पण त्या राजहंस पंक्तींत एक कन्यारत्न फारच उत्कृष्ट आहे, आणि हें सर्व हंसपक्षी तिचें ममंतेनें पालन करीत आहेत. मला तें पाहून फार गहिवर येतो आहे. एकवार त्या बाळस मजजवळ द्याल तर माझी हौस मी पुरऊन घेईन. प्राणनाथ, तुमच्यां पायापडते. एकदा त्या कन्येस माझे जवळ द्या. पाहा, माझे स्थनांस पान्हामाईना. द्याहो द्या.

भु० पा०—देतो. गडबड करूनको. युक्तीनें काम केले पाहिजे. हातचें कार्यं जाईल. [असे ह्मणून हळूच जवळ जातो]नंतर [मनातच] अहाहा. काय इश्वरा, आह्मा कर्तांच.हे रत्न पाठविलेस काय ? मृत्युलोकीं असेंरूप तर कोठें पाहण्यांत नाहीं. असे कन्यारत्न कोण माय टाकून गेलीअसावी ? कोणास हे बाळ नकोसें झालें ? अहाहा. मला या बाळाचें चुंबन मिळेले काय ? माझे मनाची स्तिथी आगदीं बदलून बाळपाहाताच मोहउत्पन्न झाला. अतां कसेकरू ? बरें,उचलून घेईन तर

हे इतके पक्षी तिचें संरक्षण करित आहेत हें उचलूं देतील काय ? अहाहा. हे बाळ जर माझे हातीं आलें, तर जगदंबे तुझे आभार माझ्यानें फेडवणार नाहीं त: आणि कोणजाणे, तसे हीं तुझ्या मनांत नसेल कशा वरून ? पण मी खचींत सांगतो कीं, जगदंबे, ही कन्या जर तुझ्या कृपेनें मिळाली तर दुसरें कांहीं नको. माझे राज्य गेल्याचा ही तुजवर शद्ब नाहीं ; असो. आतां मी तर तुझ्या भंरशांवर बेलाशक ह्या पक्ष मंडळींत शिरतो. यश देणारीण तूं समर्थ आहेस. [असे ह्मणून कन्या उचलून अणण्यास जातो.]

भु० रा०—[कन्या आणली पाहून] आहाहा. मजवळ द्या. द्या लवकर.

भु० मा०—अग पण ! मला एक मुका तर घेऊदे. [मुके घेऊन] चला ही घ्या तुह्मा जवळ. [भुवनपाल देतो आणि बाळ हसत हसत भुवनसुंदरी जवळ जातें.]

भु० रा०—या बेटा या. तुझी आई कुठ आहे ! [जवळ घेऊन पदरा खालीं थान पाजतें] डोळ्यावाटे अनंदाश्रूं वाहातात. आणि ह्मणतें. जगदंबे, जयसुमंगले, हे बाळ मलाच दिलेस काय ? अहाहा. असे रत्न राज्यावर असतां दिलें असतेस ! तर काय आनंद झाला असतां. आणि राज्य तरी कशास गेले असतें ? प्राणनाथांचा जीव सुचीत नसल्यामुळेंच राज्यांत फितूर पणा झाला. आणि जीव सुचीत नसण्याचें कारण कायते संततीच. ही जर पूर्वीं दिली असतीस, तर असे कां झाले असते ? बरें, या रत्नास (मुके घेऊन) तरी काय मिजास मिळाली असती. (बाळाकडे पाहून) बाळा, छकुड्या, आतां तुला रत्नखचीत पाळणा कोठून आणू ! अहारे दै-

वा ! आमच्या बरोबर आतां आमच्या तान्हुल्यास दुःख काढावें लागेल. अरेरे, एव्हढे मात्र दुःख वाटतें.

भु० मा०—प्राणप्रिये, तुला कां वेड लागलें कीं काय ? बाळाचें दैव काय आपण धुवून पाहिलें आहे ? तिच्या दैवानें पुनः राज्य मिळणार नाहीं कशा वरून ? आणि इच्या चिन्हा वरून तर ही पृथ्वीची स्वामिणी होईल असें वाटतें. असो. आतां जगदंबेच्या कृपेनें एव्हढे रत्न आपणास पचो ह्मणजे झालें.

भु० रा०—पचो ह्मणजे काय माहराज, ही काय भलतीच शंका ?

भु० मा०—अगे, शंका इतकीच कीं, ही लेक कोणाची आहे कोणास ठाऊक ? एकादा आला आणि त्यानें माझीच ह्मटली तर ? मनुष्याची कन्या हंसपक्षांनीं संरक्षण करण्याचें कारण काय ? पक्षांच्या स्वाधीन होऊन ह्या स्थळीं ही कशी आली ? कोण त्याजातीची आहे वगैरे सर्व खुलासा समजल्या वाचून हिचें आपण तरी पालन कसें करावें ही मोठी काळजी पडली आहे.

भु० रा०—माहराज, हे रत्न कोणी माझे ह्मणून जर बळेच घेऊं लागेल तर मी कधीं देणार नाहीं. आणि हिचा माझा जर आतां वियोग झाला, तर मी आपलें प्राण ठेवणार नाहीं. बरें, जाती विषयीं आपण ह्मणता, तर हे बाळ आजून अगदीं अज्ञान आहे, आणि पक्षीं संरक्षण करीत होते तेव्हां ते अगदीं शुद्ध आहे. एव्हां पासून आपण पाळण पोषण केल्यास जाती दोष बिलकूल नाहीं. खेरीज तुह्मी असा विचार करा कीं, बाळाचें तेज केवळ सुवर्ण कांती प्रमाणें आहे, तेव्हां असें तेज अन्यजातीचें खचीत नसतें. एक ब्रह्मबीज, किंवा

राजबीज. या वांचून अन्यजात नाहीं, यांत संशय नको.

भु० मा०—ठिक आहे, जगदंबा तुझे इच्छे प्रमाणें करो. आतां तुला आणि मला दिवस भर फारच श्रम झाले आहेत; तेव्हां पलिकडे गर्द छायेंत आम्मळ निद्रा करूं चला.

भु० रा०—ठिक आहे. छकुडी आणि मी शेजारी निजतों,

(असें ह्मणून कन्येसह राजा राणी वृक्ष छायेंत निजतात.)

(पडदा पडतो.)

---

# भाग ३

## प्रवेश २

### स्थळ.

शृंगारपुरींतलि राजकचेरी.

### पात्रें.

चंद्रकांत ........................ राजा.
सिंव्हबल ........................ त्याचा प्रधान.
धैर्यशील ........................ सेनापती.
हनमंतसिंग ........................ जमादार.
हुकमतसिंग ........................ हवलदार.
रणछोडराय ........................ सुभेदार.
दुल्यानाईक ........................ रामोशी.

[कित्येक कामगार मंडळी वगैरे.]

[चंद्रकांतराजा सिंव्हांसनी बसल्या बरोबर]

चोप०—निगारखो मेहेर्बान सलाम—दवलत बढती होवे. [असा पुकारतो.] नंतर—

सिंव्ह०—सरकार, [हातजोडून] वंदनकर्तो.

चं०—कल्याण, सिंव्हबला बसावेस. माझे मनांत कांहीं विचार पुसणे अहे.

सिं आज्ञा सरकार. बंदा हाजर आहे.—असें ह्मणून [खालीं बसतो.]

इतक्यांत—[सर्व मंडळी मुजरे करून आपापल्या जागीं बसतात.

सिं०—सरकार, आज तबियतीची रहा कांहीं वेगळीच दिसती आहे, परंतु तसेंच कांहीं असल्यास या दासाजवळ चोरूं नये. कारण ज्या परमेश्वरानें आज हीं सिंव्हाच्या कब- ज्यांतील आपणास गादी दिली, तो परमेश्वर काय यत्- किंचीत दुःख असल्यास परिहार करणार नाहीं काय ? सर्व काळजी त्याला आहे. तस्मात् व्हिद्गत् गुप्त ठेऊं नये. (पायाकडे बेट करून) या गादीच्या चाकरीस शीर कमल आमचे हातावरच आहे.

धैर्य०—खरी गोष्ट. प्रधानजी, काल पासून सरकारची कांहीं चमत्कारीकच वृत्ती झाली आहे, आपण प्रश्न यथा योग्य केला.

हम०—आजी सरकार, कोनसा संकठ मनमो हुवा, वंदेकू कह देव. (हात जोडून) कुइ दुसमाननें तेडी नजरसे देखे हैक्या ? मगदूर क्या सालेकी. आबी कोन माई- का पूत ए शृंगारपुरीपर देखेगा ? क्या बिसाद. एक दफे संकटका मैनातो बोल देव.

रण०—एमांशू संकट छे ? आज अठवरसने आठदाडा थ- या. आवे संकट येशुछे ? कैम जमादारसाव ? मेरीवात सांबळो.

हुक०—आजी रणछोड राय, सरकारके मनमें ए दुसमान का डर मालूम पडता है. लेकीन, मेरें गांवसें एक रा- मोशी कल आयाथा. उन्नें ऐसा कहदिया, के भुवन- पाल, भुवनपाल करकें कुई राजा वहोत दिन ह्यासे नाजि- क जो मोहन बाग है नही ! वामें रहथाथा. और, आज छबरस हुवा रामेश्वरकुबी बहोत आदमीनें उसकु देखे. और आबी ऐसा संदेसा हैके, वो बनारसकें आ- यली तरफ कुइ बिश्रांत बनकरके बडा जंगल है वामे र-

हाहै. और उसके सात कुई आच्छी खुप सुरत एक लडकी वी है. वैसा संदेसा मेरे सुन्नेमे कल आया. ओ रामोशी वी आज ह्या रहाहै. लेकीन सरकारका होकम होयगा तो, उसकु वी ह्या बुलालेताहूं.

चं०—( हुकमत सिंगाचें बोलणे लक्ष देऊन ऐकल्यावर ) आजी हुकमत सिंग, वहोत अछीबात तुमने कह दिई. यही कारणसे मेरी तबियत आच्छी नहीं. और कुच दुसरा संकट नहीहै. भुवनपाल जो कवी ज्ञानसे आज तलख शाबूत है. तो उसकू ठार करने का इलाज जलदी करना च्याहीये. केव हनमतसिंग ?

हन०—सच महाराज. ठार हुवातो पिछे सब बात हो चुकी.

चं०—कां सिंव्हबला, ऐकलेन ! या घोरानेंच माझे अन्न पाणी सुटलें. कारण जरी राज्य घेऊन आपणास आठ वर्षे होत आली, तरी तो जर खरोखरी जीवंत असेल, तर पुनः बंड करण्यास राहणार नाहीं. या कर्ता अगोदरच बंदोबस्त करावा हे उत्तम. कसे धैर्यशीला ?

धैर्य०—खरी गोष्ट माहराज- शत्रू लांब आहे ह्मणून स्वस्थ निद्रा घेऊं नये, तसा अग्नी अताशीच पेटला आहे ह्मणून विझविण्याचा आवकाश करूं नये, सर्प लहान आहे ह्मणून जीवंत सोडूं नये, विष काय थोडकेंच आहे ह्मणून भक्षण करून त्याची परिक्षा पाहूं नये. कां प्रधानजी, खरें की खोटें ?

सिंव्ह०—शाबास धैर्यशीला. (सरकाराकडे पाहून) मग पुढें काय विचार करणें तसा हुकूम व्हावा.

चंद्र०—हुकूम काय, हुकमतसिंगाला सांगून तेव्हढ्या रामोश्याला येथपर्यंत आणवा. ह्मणजें काय तो पक्का शोध लागेल.

सिं०—आज्ञा सरकार. असें ह्मणून. (हूकमतीसगास सांगून दुल्यानाईक रामोश्यास कचेरींत अणवितात.]

दुल्या०—[वाकून व हातजोडून] मी खानाजाद आपला दुल्या मुजराकर्तो सरकार.

चं०—कारे दुल्या, मी विचारतों तें खरें सांगशील्ना ?

दु०—जी सरकार, [थोडा भिऊन] ह्या पायापंकंदी खोटं नाहीं बोलनार:—असे ह्मणून [थरथरकांपूं लागतो.]

चं०—अरे, तूं भिऊनकोस विचारतो तेव्हढें सांग ह्मणजे झालें.

दु०—व्हय सरकार. मी आंदुगरच पायाप आरज केल्य या. मंग नई जाओ वा राहीं.

चं०—अरे, भुवनपाल राजाची तुला कांहीं खबर आहे कां ?

दु०—व्हय मायबाप. ह्मंजे बगा—आमचा एसबा नाइक हैकी नइ, त्यान बगा त्याला धरल होत—पन त्यो लइफस्ट बोलनार बगा. त्यान गोड बोलून शनी एसबाला दिला वाल्यान् काय ? तो एसबाबी लयहुसार माहराज, पन बगा जसी मोहनी पडावी कीं नाहीं, असी बगा त्याला मोहनी पडली. याच्च कारन नाहीं तुह्मी उमंगला ? त्या बेऱ्या बरोबर बगा आठ दाह वरसाची एक कार्टी है बगा. ती लयनाजूक है; आनजनू आक्शी नक्षीतर. लय चंमका मारती बगा. मी काय सांगू. आमच्या एसबाला आक्शी मोहनीच पडली बगा. आन तीबी लय नकरा करतीया. एकदा हातांत तीरकामटा घेतला, की मंग म्होर जातो कोन ? आमच्या गांवांपून नऊधा कोस ते हायती. आन तींत तरी उंगीच बसलेत का, लय खटपट करत्यांती. आमचा एसबाबी त्यांतहै. आन दुसरें बगा सारं मिळून नऊ शंभरा रामोशी जमल्याती. मंग काय करनार हैती कोनासनी ठाऊक. पन एव्हढं

माहितहै कीं, त्या कार्टीनं आमच्या एसबाला लय वचन दिल या. मंग ह्मोर त्यांच्या मनांत काय वाटतया तें एक आई काळूबाई जानत असल बगा. पन आपन काइ त्यां मंदी अगदीं नाहीं बंगा. आइच्यान. माझे गळ्याच्यान मी सरकारच्या पायापं खोट नाहीं बोलनार.

चं०—अरे, पण तूं त्यांत नसशीलच, मग इतक्यां शपता कशाला वाहतोस. पण आगोदर इतके सांग कीं, तूं येथें कशाला आलाहोतास ?

दु०—मी व्हय. माझी सासुरवाडी नव्हकां इथं ? भल्या नाईक आन सोनबानाईक माज सासरे—आन ह्माळसाई सासूं. त्यानाबी जरा इतकेदी राग आला होता. पन बगा आतांशी लय नरम आल्याती. नाहीं तर आक्शी जिवपरान तोडला, पन त्या बच्यांनीं माझ्या बायलस आखर नाहीं धाडलं नाहीं धाडलं. आतां न्यायासनी आलोया. मंग धाडल्यात कीं नाहीं कोनजान.

चं०—अरे दुल्या, तुझी बाईल जर तुझ्या बरोबर पाठविण्याची तजवीज केली, तर तूं एक आमचें काम करशील कीं नाहीं ? शिवाय त्या कामा बद्दल असें बक्षीस देईन कीं, जन्माचें कल्याणच होईल. पण काम फार जपून केलें पाहिजे.

दु०—महाराज, काम करिन कीं नाहीं याची खातरी (हुकम, तशिंगा कडे वळून] याना विचारा. कारन हे आह्मीं एके गांवचें. पन आतां मात्र तें लय भारांसुद झालें. नाहींतर आमच्या मंदी लगोऱ्या खेळत होते.

दु०—[अनुजाती ह्मणून दुल्यासदावून] सरकार, ए अदमी बहोत इमानी है; और आप जोकुच होकम करोगे,

वो ए बहोत इमानसे करेगा. छाहेसो होकम बोलदेओ. दुल्याकू जामीन मै रहाताहूं.

चं०—ठिक आहे. प्रधानजी, हुकमतसिंगाची खातरी आहे त्यापेक्षां दुल्याला असे असें कानांत सांग.—[ चंद्रकांत प्रधानाच्या कानांत सांगतो.—आणि प्रधान दुल्याच्या कानांत सांगतो. ] नंतर. उघडपणे.—

सिं०—दुल्या, संभाळ निट विचारानें काम कर. गुलामा ने मालूम काम केलेस तर—जन्माचें दरीद्र घालवीन. पण मी तें दुसरें काम सांगितलें तें ध्यानांत आहेना ! (हळुच व दुल्यास एकीकडे नेऊन.) हें पाहा, तीला असें सांग, कीं असा श्रीमंत, व खुपसुरत आहे कीं, तुझ्या अमोल तारुण्याचें सार्थक होईल. अरे, तुला सांगावें असें नाहीं कसें ही करून तिला माझ्या स्वाधीन आणून कर, ह्मणजे झालें काम. एव्हढे होण्या कर्ता वाटेल ती थाप दें. आणि लागेल तितका खर्च कर. हे घे. तुला खर्चण्यास शंभर मोहरा. झालेन ? ही गोष्ट एक तुला मला माहीत. सरकारास कळवूं नको हो. सरकारचें काम कर म्हणजे तिकडून ही तुला बक्षीस मिळेल. आणि माझें काम केलेंस तर मी तुला जे मागशील तें देईन." असे सांगून त्याला लाऊन देतो.

चं०—कारे सिंव्हबला, नीट समजून सांगितलेसन दुल्याला ?

सिंव्ह०—महाराज, या विषयीं आपणास अतां काळजी नको, काम झालेंच असें समजा. इतक्यांत (दस बजगये ग्याराका अम्मल है माहराज). घड्याळवाला पुकारतो.

चं०—प्रधानजी, अतां मी जातो. फार संभाळून बेवस्था ठेवितजा. आणिं सर्वांस सावधगीरी विषयीं ताकीद द्या.

वि०—ठिक आहे महाराज. (नंतर चंद्रकांत राजा उठतो.)

(कचेरी बरखास्त.)

(पडदा पडतो.)

(पडद्या बाहेर.)

वि०—कां सुत्रधार, पाहिलेन हे दुष्ट लोक? या बिचाऱ्या भुवनपालास आतां मारेकरी घातलेत. सिंव्हबलाचा डोळां तर या हंस पालिके वर आहे असें वाटते. अरेरे. आतां तिकडे विश्रांती वनांत काय अनर्थ होईल कोण जाणे. ते सारें असो, ती नवरी माझ्याशी ठरली असतां सिंव्हबला नें मध्यस्ती घातला आहे. तेव्हां कसें करावें. सुत्रधार, तुह्मीं एव्हढें काम करतां कां? लवकर विश्रांती वनांत जाऊन हंसपालिकेस सांगाकीं, माझ्या गावीं एक तुला योग्य नवरा पाहिला आहे. नांव विचारलें तर विदुषकपंत कावडी वाहणोर असें सांगा. आणि लवकर जुळऊन टाका ह्मणजे झालें. कारण यंदाच्या सालांत रात्रीं सुर्यगृहण आले आहे. तेव्हां लग्नास गण गोत्र पाहतां येत नाहीं.

सु०—शाबास. ब्रहस्पती, शाबास. तुझी गोष्ट काय! तूं आकाशांतील चंद्र सुध्धा मागशील.

वि०—अः या चंद्राला काय करतां? मला मुख चंद्र असला तर द्या.

सु०—बरें, पुरे आतां. विश्रांती बागेतील प्रकार पाण्यास येतोसका तूं?

वि०—हो, हो. खरी गोष्ट. मीं आगदीं विसरलोच होतो. चलातर चला लवकर. दुल्यानाईक तिकडे पोंचला ना-

हां, तोच आपण पुढें जाऊं. ह्मणजे ठिक पडेल. पण कांहो ! अगगाडीं तूंन येता ? कीं, भाऱ्यांचे मेणें करूं ?

सु०—अरे, आपल्याला इतकी यातायात नको, तो सर्व प्रकार तुला येथेंच करून दाखवितो.

वि०—ठिक आहे तर मग. दाखवा लवकर.

(पडदा पडतो.)

## प्रवेश ३

**स्थळ.**

राजपुत्राचें मंदीर

## पात्रें.

**सौंदर्यसागर** ............ चंद्रकांत राजाचा मुलगा.
**प्रेमसागर** ............याचा । जिवलग मित्र.
**भालचंद्रभट** ........ ... उपाध्ये.
**मन्याबा** ............ प्रितितील हुजऱ्या.
(देवडीवाले व खिजमतगार वगैरे.)

**प्रेम०**—कां मन्याबा, सरकार स्वारी काय करीत आहे?

**मन्या०**—जी माहराज. सरकार व्हय, सरकारच चिन्ह आज कांहीं न्यारच दिसतया म्हाराज. लय बेकु वानी झालेतन्. मी बगा तुमासनीच पाह्या निघाले होतो बगा, तो ह्योच आपल दर्शन झालं.

**प्रेम०**—अरे, कसें काय? कांहीं कमी जास्ती झालें कीं काय

**मन्या०**—कमी जास्ती काय पुसता म्हाराज. आज मंगाशी किवो कचेरींतून सुदीतच आल, आन मंग माह्यालांत पाय ठेवला आन वेड इन्न वाल् लागलेन काय?

**प्रेम०**—(घाबरून) अरे तर मग? ते आहेत कोठें? चल चल लवकर.

**मन्या०**—इतक घाबरू नका माहराज. त्याना कंदी मंद असं होत आसत बगा. (कांहीं स्मरल्या सारखें करून मंजे बगा त्याला लयदी झाल. तुमासनीबी ठाव असेल ती दिल्लीची एक लय नामी गानारीन आली होती

आन तिच्या संगती तिची एक नउधा वर्षांची पोरगी होती, तिला बगीतल्यान बी सरकारची परकत आशीच झाली होती बगा. (हळू) आहो, करस्यात काय! झंटल झनजे हे जवानीच दिवस. ह्या दिसांत जर आस नहोईल, तर मंग का झातारपनी होईल. तुमीच सांगानात ?

प्रेम०—खरें आहे, मन्याबा, तुह्मी ह्मणता ही गोष्ट खरी. आहो, आधीच पंधरावें सोळावें वर्ष, त्यांत खाण्या पिण्याला यथास्तित. मग कां बरें असें होऊ नये ? कांहीं कोणत्या गोष्टीची तुम्हा अम्हा सारखी काळजी कां आहे? बरें, तें आसोंद्या आतां. मी अतां जाऊन प्रकृतीचा तालामाला पाहतो.

मन्या०—बरंतर. मीबी वायच घरीं जाऊनशानी भाकरबिकर खाऊन येतो. तुह्मी मात्र मी येईपर्यंत हालू नका. मी बगा ह्याच पावली आलो. असे म्हणून—(मन्याबा घरीं जातो. आणि प्रेमसागर मंदीरांत प्रवेश करतो.)

प्रेम०—(सौंदर्य सागराचे खोली जवळ जाऊन मनांतच.) एकदम आंत जाऊं नये. सौंदर्यसागर काय करीत आहे, हे जरा दारा आड उभे राहून पहावे. आणि नंतर आंत जावे. (असा विचार करून दारांआड उभा राहतो. )

सौंद०—अतां कसे करूं ! (खोलींत दुसरें कोणी नसतां मनाशीच मोठयानें बोलतो.) अरे, माझे आकलेचा आणि विद्येचा क्षणांत भंग होऊन काम रंग ध्यानीं मनीं भरला, आतां हें काम "चंग" बांधून कोण फत्ते करील ! ह्या रोगास "वंग" खाऊन ही गुण येणार नाहीं. तर मनांत जिचें स्वरूप भरलें आहे, तिचा संगच के-

ला पाहिजे. आहाहा, भाळचंद्रानें किती तिच्या स्वरू-
पाचें वर्णन केलें. मला ती हंस गामिनी प्राप्त होईल
काय ! (पुन: आपल्याशीच.) अरे, सौंदर्य सागर, तूं
घरांत बसून ती मिळेल कीं नाहीं, मिळेल कीं नाहीं, अ-
सा सहस्त्र वेळा जरी जप केलास, तरी प्राप्त होईल काय?
नाहीं. तर अम्मळ घरा बाहेर नीघ. जिवाचा धडा
करून एकदा विश्रांत वना जवळ प्रवासास जा. आणि
तिच्या भेटीचा यत्न तेथें राहून कर. विश्रांत वनाच्या
आंसपांस राहिल्यानें ती चारुगात्री एकदा दृष्टी तर पडे-
ल! हो, हो. (टाळी वाजऊन) झालें आपलें कार्य.
अरे, तिला शिकारीचा फार नाद आहे, ह्मणून मघां ना-
हीं कां भाळचंद्रानें सांगितलें? खरीं गोष्ट. त्या वनाच्या
आंसपांस आपला डेरा देऊन राहिलें, कीं कामच झालें.
वा! छान युक्ती निघाली. चला आतां करा तयारी.
बरें, पण आतां बरोबर कोण कोण आसाम्या घ्याव्यात?
आपण तिकडे जाऊन काय करूं, आणि काय नाहीं,
त्यांचा मागमूस बाह्रास नसमजला पाहिजे. (कांहीं स्म-
रण केल्या सारखें करून.) हो. मी इतक्या विचा-
रांत कां पडलो? आपला प्रेमसागर बरोबर घेतला कीं
कार्य फत्ते. कारण तो शहाणाही आहे, आणि मोठा धू-
र्तही आहे. शिवाय विश्वासूक पुरा. झालें, मन्याबा आ-
हेतच. आणि त्या कामाच्या खटपटीला भाळचंद्र फा-
र हुशार आहे. त्याला बरोबर घेतलाच पाहिजे. शि-
वाय त्याला त्या देशांची माहितीही पुरी आहे. ठिक
झालें. चला. हें इतके कपडे बरोबर. आणि ही
छोटी बंदूक, व हीच तरवार. झालें, मन्याबाला सांगून
पर्वाचा भाला आणऊं. झालें. आतां काय राहिलें?

कांहीं नाहीं. बरें, तर हा निघालों. (दोन तीन पावलें चालून.) अरे पण वावास कोठें विचारलें! आणि आईला तरी! आतां ही पंचाईत झाली. त्यांनां विचारलें, आणि त्यानी जर नाहीं ह्मटलें, की झालें मग. गेला सर्व बेत पाण्यांत. (असा विचार करतो आहे, इतक्यांत.—

प्रेम०—(मनांत) आतां आपण आंत जावें. याला कोणतें वेड लागलें हें आपण ओळखिलें. चिंता नाहीं. (असें ह्मणून आंत जातो.)

सौं०—(प्रेमसागर आला पाहून.) प्रेमसागरा, येरे वा ये. ठिक आलास. माझी ही तयारीच आहे. हा निघालों पहा.

प्रेम०—अरे, निघालास कोठें? आहे काय आणि नाहीं काय! असा वेड्या सारखा कां करतोस. नीट शुध्दीवर ये.

सौं०—(दचकून शुध्दीवर येतो.) कोण प्रेमसागरा, तूं आहेस कां! मी हा नुक्ताच झोंपेंतून उठलों ह्मणून असें बोललों. ये, येथें बैस. (डोळे चोळिल्या सारखे करून.) कसें काय ठिक आहेना. कांहीं कमी जास्ती नवी बातमी!

प्रेम०—होय. नवी बातमी आहे, ह्मणूनच आपणास कळविण्यास आलों.

सौं०—कोणती नवी बातमी आहे, एकदा सांगा पाहूं.

प्रेम०—ह्मणजे नवी खबर अशी आहे, आमचें सरकार तुह्माला माहीत असतीलच. त्यांचे पदरीं कोणी हुकमतसिंग ह्मणून मोठे पगाराचें हवलदार आहेत, त्यांच्या गावांहून कोणी काल एक रामोशी आला होता.

०—( आपल्याच कार्या संबंधी ह्या बातमीचा रंग दिसतो, असें जाणून मोठ्या आनंदानें.) बरे मग पुढें काय झालें !

०—पुढें मग असें—कीं त्यानें कांहीं भुवनपाल राजाचा पत्ता लाऊन देतो ह्मणून सांगितलें. आणि तें अमूक ठिकाणीं आहेत, व त्यांचे बरोबर एक सुंदर तरूण मुलगी आहे, वगैरे मजकूर त्यानें इथंभूत सांगितला. मग आमच्या माहराजानी त्यास तीस हजार रुपये देऊं करून तूं आपल्या सर्व मंडळी सुध्दा मिलाफानें भुवनपालस ठार मार, ह्मणून सांगितले. या प्रमाणें दुल्या रामोशी प्रतिज्ञेचा विडा उचलून गेला. आणि हा सर्व झालेला मजकूर भाळचंद्रभटानें जाऊन आमच्या सरकारचें चिरंजीव सौंदर्य सागर माहराज यास सांगितला. आणि भुवनपालाच्या सुंदर कन्येची त्यानें बरीच तारीफ केली असें वाटतें. आतां सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, भाळचंद्राचा मजकूर ऐकून सौंदर्यसागर माहराज विश्रांत वनास जाण्यास निघाले आहेत, आणि आईबापास विचारणें वगैरे सर्व ठेवले गुंडाळून.

सौं०—[ लाजून व यानें आपला सर्व बेत पाहिला असें जाणून. ] अरे, जरी सौंदर्य सागर निघत होता, तरी प्रेमसागरास बरोबर घेतल्या शिवाय निघत नव्हता. हें तर खरें. आसो आतां थट्टा पुरे. परंतु आतां पुढें कसें करावें हें सांग. आपल्या सिंव्हबल प्रधानानें तर दुल्या रामोश्यास पन्नासहजार रुपये देऊ केलेत, आणि असें सांगितलें आहे कीं, सरकारच्या हुकमा प्रमाणें भुवनपालास राणीसह ठार करून तें सुदंर रत्न आहे तें इकडे आणून माझे स्वाधीन कर". प्रेमसागरा, त्या सुंदरी वर

त्याचा डोळा दिसतो आहे, आतां कसें करूं ! मला तर भाळचंद्रानें सांगितल्या पासून चैन पडत नाहीं. माझे मनांतून भुवनपालास व त्याचे सुदंर लेकीस दुल्यारामोशी तेथें जाऊन पोहचला नाहीं, तोच जाऊन आपण आश्रय द्यावा, असे आहे. मग तुझा विचार कसा ? पहा, व्य आपल्या बाबानें त्यांचें राज्य हरण केलें. आणि अजू ही त्या बिचाऱ्यांची पाठ सोडीत नाहींत. अतां क करावे. तो भुवनपाल किती सुज्ञ, न्याई आणि राज काय सुंदर रितीनें चालवीत होता ? नाहींतर आमचें बा बा. ज्यानां संतोष ह्मणून कसा तो स्वप्नीं ही नाहीं किती ही संपत्ती असली तरी दुसऱ्याचें हरण करण्याचं इच्छा आहेच. बरे, हरण केल्यावर तरी व्यवस्था, तर तें ही नाहीं. आज आठ वर्षांत प्रजा अगदीं जर्जर करून सोडली. आणि मसलत काय ती सिंव्हबलाची. मग तो कांहीं कां सांगेना, तें ग्राह्य. अरे, मुख्य राज्याच्या कामास प्रधान काय तो निस्पृही, न्याई, धूर्त आणि इमानी असा पाहिजे. तेव्हां या पैकीं कोणता गुण सिंव्हबळाचें अंगी आहे, तुला ठाऊकच आहे. असो. माझें मनांतून तें सुंदर रत्न त्या दुष्टाचें हतीं न लागो असे आहे. अरे, भाळचंद्र पर्वां काशिहून आला कीं नाहीं ? त्यानें सर्व प्रकार सांगितला. भुवनपाल कोठें आहे, व त्याचे कन्येचें गुण वगैरे सर्व दृष्टीनें पाहून मला सांगितले. बाकी आणिक कोणांस त्यानें ही गोष्ट कळविली नाहीं. परंतु इतक्यांत मागून तो दुल्या रामोशी का न यावो, त्यानें हा सर्व नाश केला. आतां ते जाऊन तेथें पोहचला नाहीं, तोच आपण पुढें गेले पाहिजे

प्रेम॰—ठिक आहे. सरकार, माझें ही मनांतून तेंच आहे. हा मी निघालो, करा तयारी. आणि बावास फक्त शिकारीला जातो असे सांगून चला ह्मणजे झालें. लांब जातो ह्मटलें, तर धाडणार नाहींत. आणिक एक, बरोबर सरंजाम सडाच पण अगदी निवडक घ्या. नजाणो ! वेळ आहे, प्रसंग आहे. बरें, अगोदर माहितगार मनुष्य आपला कायतो भाळचंद्र. त्याला बोलवा. ह्मणजे आज पाहाटेस कुच.

सॉं॰—ठिक आहे. प्रेमसागर, फार चांगली युक्ती काढलेस. (असे ह्मणून भाळचंद्रास बोलवणें पाठऊन त्यास आणविलें.)

भा॰—कां सरकार, (हात जोडून) आज फार जलदीनें बेलावणें आलें ? मी देवघरांत एकादशनी करीत होतो, मला असें झालें, कीं एकादशनी आटपेल कधीं आणि मी जाईन कधी. का बरें चित्त ही फार व्यग्र दिसतें ?

सॉं॰—अरे व्यग्र काय ? मघां तूं सांगितल्या पासून अंगाची लाही होऊन गेली आहे. असें सुंदर रत्न प्रधान आपलेंसें करणार काय ? पाहतो आतां चमत्कार ! ( मिशावरून हात फिरऊन.) भाळचंद्रा, तूं लवकर घरीं जाऊन आपली तयारी कर. आज पाहटेस येथून कुच.

भा॰—पण माहराज, थोरलें सरकारची कांहीं पर्वानगी वगैरे ?

सॉं॰—अरे, पर्वानगी काय शिकारीस जातो ह्मणून आजच रजा घेऊन ठेवितो.

भा॰—ठिक आहे. मजकडून अगदीं तयारी आहे. कारण माझ्या मना सारखीच गोष्ट होती आहे. मग का आळस ? ज्या दिवशीं त्या हंसपालिकेस पाहिलें त्या दिवसापासून दोन वेळा रोज ईश्वरास प्रार्थना, कीं, ईश

रा, कृपाकरून असलें रत्न आमच्या सौंदर्यसागर माहराजाना मिळो. सरकार, [हात जोडून.] आपण समक्ष पाहिल्यावर मी बोलतो याची खात्री होईल. अहाहा. धन्य विधात्याची. काय बांधा! आणि काय तें तेज!! मनोरथ पुर्ण झालें तर जोडा खरोखरी साजेल. [सौंदर्यसागराकडे पाहून.] माहराज, हुबेहुब आपण मदन आणि ती रतीच शोभेल.

प्रेम०—अरे, पण तें सारें असो. आज पाहटेस तूं आणि मी व माहराज आणि चार हत्यारबंद स्वार असे उजडलें नाहीं तों येथून बारा कोसावर गेलो पाहिजेत. कां, माहराज?

सौं०—हो. तूं बोलतोस याच प्रमाणें. आपल्या तिघांकतां तीन घोडे उत्कृष्ट निवडून घेतो, आणि एक मन्याचा कर्ता. झालें, चार घोडेस्वार अगदीं तयार व विश्वासूक असे घेतो. ह्मणजे झालेंन काम?

रा०—हो. चल आतां प्रेमसागरा, आपल्याला तयारी केली पाहिजे.

प्रेम०—चल. मी ही आलोच. [असे ह्मणून सर्व निघूनजातात. व सौंदर्यसागर बापाकडे रजा घेण्यास जातो.

[पडदा पडतो.]

## प्रवेश १

### स्थळ

विश्रांत वनांतील किर्र झाडी.

### पात्रें.

| | |
|---|---|
| एसबानाईक | रामोशी. |
| खंडबानाईक | रामोशी. |
| सटवोजीनाईक | रामोशी. |
| दुल्यानाईक | रामोशी. |
| भुवनपाल | राजा. |
| भुवनसुंदरी | राणी. |
| हंसपालिका | कन्या. |

(कित्येक पुष्कळ रामोशी.)

दुल्या०—कां एसबा, आवतन्या परमान संमदे लोक जमल्यात, आतां होर कसाकाय विचार?

एस०—आपला विचार व्हय? आपुनत्रा काळूबाईच्यान सांगतों, आपल्यापून कंदी अस काम व्हायच नाहीं. कां, आपून त्याच कस झाल तरी अन्न खाल्लया. आन त्याच्यावर हत्यार धरन? आपन नाहीं अस करनार.

खं०—आरे, काय बिल्या? संमद बायलवानीच विचार बोलतोस. अरे कशाची शपत आन कशाची आन. असी वेळ मग होर येईल कां? आज तीस शंभरा कीतीरे दुल्या?

दुल्या०—अरे, तीस शंभर नव्हं, तीसहजार. मंज बगा, धाशंभरा मंज एकहजार. तेव्हां संमदा किती शंभरा? तुमीच हिसब करा आतां.

खं०—तो हिसाब सटवाजीला इचारा संमदा. त्यो लय या कामा मंदी फस्ट है. दोन साल नाहीं कां झाली, ती वरनगांवची चोरी केलीती ? ती वरनगांवची. तवा ब-गा संमदा हिसाब त्यानच अवशी ठेवला होता.

दुल्या०—हो खर राव. कारे सटव्या अरे धाशंभरा एक आन धाशंभरा एक तवा संमद किती झालरे ?

स०—काय राव, हिसाब करत्याती. संमद्या इस शंभरा नाहीं कां झाल्या ?

दु०—खरं हो खर राव. सटव्या कंदीरे इतका फस्ट झा-लास ? अरे, आतां हे एव्हढं काम लक्ष देऊन कर बग. मंग चंद्रकांत राजापं माझी अवशी वग है बग. त्यो योक हुकमत्या नाहींका तित ? तसा तुला करून टाकीन.

खं०—तें राहुदेरें. झोरचं झोर काय होईल तें काळूबाइची इच्छा. अंदुगर बोलन काय चाह्ट या, याचा इ-चार करा.

दु०—हो, खरं राव. कां एसबा, तुम्ही राव अवशी वडूनच आनल्या. राव तुमच्या मनांतल तरी कळूद्या. धांन धाइस शंभरा तुमी घ्या मग तर झाल ?

स०—अरे दुल्या, तुला एकदा सांगितलं, कीं मपून कांहीं ही गोष्ट व्हायची नाहीं. मंग कां उगीच तरास दे-तोस ? धा शंभरा नग आन इसशंभरा नग. अरे, सं-मद दिल तरी नग. नाला राव एकदा आपल मटलं त्यावर आपन काय कंदी हत्यार धरनार नाहींत. मंग त्या पाइ तुमासनं राग आला तरी चिंता नाहीं. तुमीं जान आन तुमचं कर्म जान.

खं०—अहो, एसबा, अस माथ नका फिरूं देऊं. आंठ धावरसांत बगा आईकाळूबाईला बली मिळाला है कां ? तुमीच इचार कारा ? आन आज राव राजा आनि रानी दोनी बी चांगली मिळत्यात. ते डावलता काय ? आन आईकाळूबाईचा राग व्हईल तवा मंग ?

स०—अहो एसबा. ऐकानात का पन ! त्या मंदी लय हित है बगा. अहो तीसहजार रुपयें मिळतील आन काळूबाइला बली व्हईल आन संमदच व्हईल काय. अहो, दोघासनी द्याव बली आन पोरगी परधानाच्या सवाधीन करूं, मंज सेवी पन्नासहजार मिळतील. ते सार तुमी मनावर धरल मंज व्हतय बगा.

ए०—तें राव पन्नासहजार किव्हां शंभरहजार मिळोत, पन असकंदी आपल्या पुन व्हायच नाहीं. आन काळूबाइचा धाक मला घालता, त्यो बी अक्शी खरा नाहीं. आसा मानसाचा बली दिल्यान कुटदेवी परसन होती काय ? काय राव ! तुमासनी वाढलतस करा जा मी आपला जा तो बगा. (निघून जातो) नंतर.

दुल्या०—कस काय राव. एसबानी तर आपल्यासनी सोडल. आतां म्होर कसाकाय इचार.

ख०—इचार काय, तोगेला मंगुन काय आपन बी बांगड्या भरायच्या ? अहो चला राव आईकाळूबाईचे नांवन काम फत्य करू या, आन है काय त्या मंदी. चला नाहींतर-नाहीं त्या बिऱ्याचें नशिबीं नाहीं, त्याला आपन काय क राव ? चला.

दुल्या०—खर बुवा तुमी बरीक खर सूर. आमच्या मंडळी मधें एक तुली किवां एक सटवाजी.

खं०—खरच गड्या. सटवाजी तर अक्शी लय फस्ट है.

आतो आतां बिगीन चला. रात्र उालेशी उराले या.

स०—चला तर चला. घ्या काळूबाइच नांव.

दु०—पन आक्शी पाय नका वाजऊं नाहीं तर ते जाग होतील. (असें ह्मणून ज्या ठिकाणीं भुवनपाल होता, त्या ठिकाणीं जाते झाले.)

(पडदा पडतो.)

---

## प्रवेश ५.

स्थळ

अरण्यांतील पर्णकुटी.

### पात्रें.

| | |
|---|---|
| भुवनपाल | राजा. |
| भुवनसुंदरी | राणी. |
| हंसपालिका | कन्या. |
| दुल्यानाईक | रामोशी. |
| खंडबानाईक | रामोशी. |
| सटवाजीनाईक | रामोशी. |

( दुसरें पांच पन्नास रामोशी वगैरे. )

दु०—कारे सटव्या, वेस वेल हैकी नइ ? बर आतां संमदे झोपी गेलेत. हं बगतोस कां ? हान फटकान् काय ?

स०—अरे वाहवारे गवश्या. देविपं न्यायच कीं हितच ?

खं०—अरे, सटव्या. या दुल्याला कोनइ अक्शी सुमरन राहत नाहीं. मंगा ह्मनाला की, राजाला आन् रानीला देवीपं न्यायच आन् कार्टीला परधानाप न्यायच. आन् अतां ह्मनतो हाना फटका. कां, हैत की नइ शान ?

दु०—खर गड्या. मी मंगालो होतो खरा. पन आतां ह्मोर कस काय ? करन तें आपलं इचारान.

खं०—अरे, आतां चन्हाटं हैतच आपल्याजवळ. आवळा बगता काय ?

स०—व्हय राव. ही आवळतो बगा. [असे ह्मणून रा-

जा व राणी निद्रिस्त असतां एकदम सर्वांस बांधून टाकतात.]

भु० रा०—माहराज, काय गडबड आहे हो? आहो, दगा हो दगा. सावध व्हा. हंसपालिके, बेटा सावध हो.

भु० मा०—अरे, कोणरे हे दुष्ट. अरे आम्हास कां बांधता? कांहीं द्रव्य किंवा पोशाक कांहींच नाहीं आम्हा जवळ, मग व्यर्थ कां धरता? संशय जात नसेल तर झाडा घ्या. पण विनाकारण आवळां आवळी करू नका. [इतक्यांत हंसपलिका जागृत होऊन.]

हं०—आई, कांग रडतेस? झोपेंत चावळतीस होय? घाबरू नकोस. मी बाबास जागे करतें.

भु० मा०—बेटा—हंसपालिके, आपल्यावर आज कांहीं तरी महत प्रसंग आहे. बेटा, आह्मास कोणी दुष्ट लोकांनी बळकट बांधून टाकिले आहे.

हं०—बाबा, असें आहे काय? ही पहा मी उठले. (असें ह्मणून उठण्यास जाते तो देह बांधलेला.) बाबा, घात हो घात. हे पहा मला ही बळकट खचून टाकिले आहे. बाबा, कोण हे दुष्ट लोक आहेत?

भु० रा०—अगे बेटा, तुला ही बांधून टाकिले काय? अरेरे. आतां पुढें वाट कशी. [असें ह्मणून भुवनसुंदरी करुणा स्वरानें रडूं लागते.]

हं०—आई, नकोग रडूं. आतां काय करूमी? बळकट बांधले गेले. नाहींतर दाखविला आसतां चमत्कार. आई कुठें आहेस तूं? मला कांहींच दिसत नाहीं. आणि त्यांत हे दुष्ठ मेले डोळ्यांत धूळ टाकतात. अरेरे. शंकर कसा कोपला आह्मावर. या ठिकाणीं आज सहा वर्षें निरवेध रितीनें दिवस काढीत आसतां त्रास आणिक

दु:ख द्यावे असें वाटलें काय ? या वेळेस कुळस्वामिनी सुमंगला तरी कशी झोंपी गेली ? असें ह्मणून त्या दुष्ट लोकास विचारते.) अरे, तुह्मीं असें पुरुष असतां भितरें स्त्री सारखें कां लपून घाला घातला ? मर्द असोन आम्ही निद्रीस्त आसतां धरणें हें शुराचें काम काय ! छि, थूं तुमच्या तोंडावर. अरे, तुह्मी कोण आहा हें मी वोळखिलें. मेल्यानो, द्रव्याचे अशेनें निमक हरामी झालांत काय ? अरे, या अरण्यांत तुमच्या विश्वासावर, तुह्मी साह्य कराल ह्मणून आह्मी निर्भय असतां. असा विश्वास घात केलात काय ? जळो तुमचें तोंड तें. मेल्यानो माराल एकदा एव्हढेच की नाहीं ? तुमच्या हर्ता तो चंद्रकांत काय देणार आहे धूळ. अरे या अनाथ झालेल्या राजास अश्रय दिला असतां तर तुमचें जन्माचें कल्याण झाले असतें. असो. आता उगीच हाल कां करतां ? चला एकदा तुमच्या मनांत काय कर्णे असेल तें करून घ्या. नाहींतर सामर्थ्य असेल तर मला एकदा मोकळी सोडून पहा. मग पाहतें तुमचा पराक्रम. अरे, मी तर राजकन्या स्त्रीजात आहे, आणि तुह्मी शंपन्नास रामोशी हत्यारबंद आहांत. पण ! मग तुम्ही पराक्रम पहा. असो. आतां तुम्ही सोडणार आहां, ही गोष्ट स्वप्नीं सुध्धा नको. परंतु तुम्ही कोण आहांत एकदा ओळख द्या. कोण ! एसबा, तुम्ही आहांत कां यामधीं ? छि: तुम्ही नसाल. तुमच्या हतुन अशी गोष्ट नाहीं कधीं व्हायची, ही माझी खातरी आहे. हो. मेला दुल्या असेल दुल्या. तोच गुलाम पर्वां श्रृंगारपुरीस गेला होता म्हणून एसबा सांगत होता. त्याचेच हें क्रिय. श्रृंगारपुरीस गेला होता तेव्हां तिकडून कां

हीं मसलत करून आला असेल. होय. तोच असा-वा. कोण! दुल्या, तूं आहेस यामध्ये? मग असा बोलत कां नाहीं. वा ठिक केले. शाबास.

दु०—[सर्वांस सांगतो. हळूच.] अरे, आतां अगदीं बोलूनका. जरकां दादा आतां यांला सोडाल, तर दादा मंग गठडीच तुमची. ठाव नाहीं? एकदा या कार्टीच्या हाती तिरकांमटा गवसला, कीं, मंग कशाला राव इचारता. आपून इतकंजन हौत पन मंग गठडीच. आइच्यान.

खं०—अरे दुल्या, पन सोडूं तवान? आवराव आसच चला घेऊन काळूबाइच्या देवळापं मंज झाल काम.

स०—व्हय राव. असच करा दादा. लय नामी ऊगत काढली.

दु०—चला तर चला मंग कां उशीर?

खं०—अरे उशीर बिशीर काय नाहीं. हे आव्वळं बगा.

स०—आहो पन दादा, आंदुगर कसकाय? कार्टीला मी व दुलबा संभाळतो. आन तुम्ही सार जन दोघासनी घेऊन काळूबाईपं जा म्हंज झालें. कां दुलबा?

दु०—खर दादा. लयबेस उगत. का खंडबा? हूं. होऊ द्या आनू काय.

खं०—बेस. हा मी निघालो. (असें म्हणून खंड्या रामोशी, व दुसरें सर्व दोघां राजा राणीस घेऊन जातात. आणि सटवाजी व दुल्या हंसपालिके जवळ राखण बसतात.)

(पडदा पडतो.)

(पडद्या बाहेर.)

विदू०—कां सुत्रधार, झोंप झालीकी नाहीं ? व: ही कां गुलाबी झोंप कां साखरी झोंप ?

सू०—शाब्बस. झोंपेंत मी आहे. कां तूं ?

वि०—आहो, तर हे सभासद मघां पासून वाट पाहतात कीं, विश्रांतवनांत दुल्या रामोशी चंद्रकांतराजाचा हुकूम घेऊन-गेल्यावर पुढें काय झाले ? शिवाय सौंदर्यसागर मोठ्या थाटानें निघाला होता त्याचें काय झालें, हें सर्व पाहण्यास डोळ्यांत तेल घालून वाठ पाहत आहेत. आणि तुह्मी आपलें स्वथ झोंप घेतान ? व: एकदम संदर्पचें संदर्पच तोंडांत टाकता ?

सू०—अरे, सौंदर्यसागर निघून पुढें काय झालें तें तुला दाखवितो. पण दुल्यानें येऊन काय गोंधळ केला, हें तूं इतका वेळ पाहिलेस नाहीं कां ? अरे, हा मागचाच प्रवेश झाला तो ? त्यांत दुल्या आणि सटव्या हंसपालिके जवळ राहून खंडत्रा व सर्व रामोशी भुवनपाल राजास व राणीस घेऊन काळूबाईचें देवळांत मारण्यासाटीं नाहीं कां गेलें ? आणि हें तूं पाहिलें नाहीं का ? आतां झोंपेंत तूं असतोस कीं, मीं ?

वि०—हो हो. खरें. मी हें पाहिलें खरें. पण त्या वेळेस किंचीत डोळे झाकून अम्मळ जागा होतो, ह्मणून तें असें झालें. आतां मात्र नीट लक्ष देऊन टपत बसतो. होउद्या पुढें काय होते तें. चला आटपा लवकर रात्र फार झाली.

सू०—ठिक आहे. पहा अतां चमत्कार.

( प. निघून जातात. )

## प्रवेश ६

स्थळ.

अंबराई.

### पात्रें.

| | | |
|---|---|---|
| सौंदर्यसागर | .................... | चंद्रकांताचा पुत्र. |
| प्रेमसागर | .................... | त्याचा स्नेही. |
| मन्याबा | .................... | विश्वासूक हुजऱ्या. |
| भाळचंद्रभट | .................... | उपाध्या. |
| एसबा | .................... | रामोशी. |

**मन्या०**—महराज, जागा लय नामी दिसतीया. हितच उतरा अता सांजबी झालिया.

**भा०**—होय, सरकार, उतरण्याची जागा आतां हीच. मग पुढें असें स्थळ नाहीं. आतां हे येथून सारे विश्रांतवनच लागले. येथेंच डेरा द्यावा. कारण जागा फार दाट छायेची आहे. शिवाय त्या पवन गंगचें पाणी काय सुंदर आहे. एकदा तुह्मी प्यालात तर पुनः या जाग्या वरून हलवणार नाहीं. व: जागा पर जागा.

**सौं०**—अरे भाळचंद्रा, तूं सांगशिल तसें करायचें. कारण, या देशाची व रस्त्याची माहिती तुला आहे ह्मणून. कां प्रेम सागरा?

**प्रेम०**—होय, खरी गोष्ट. आतां रानांत सर्व अधार भाळचंद्राचाच. उतरा येथेंच. (सर्व खटला तेथें उतरून डेरे वगैरे देताव.)

सौं०—प्रेमसागरा, दोन प्रहरीं भोजनास उशीर झाल्यामुळें आतां क्षुधा बिलकूल नाहीं. थोडें पाणी मात्र स्वच्छ आणून दे ह्मणजे झालें.

प्रेम०—सरकार, कोणासच क्षुधा नाहीं आतां बिच्छान्याशी गाठ. हें पाणी आणलें घ्या. (सौंदर्यसागर पाणी पिऊन.)

सौं०—भाळचंद्रा, आतां सर्व जण निजा लवकर. पण पाहटेस चंद्र उदय झाल्या बरोबर भुवनपाल राजा ज्या पर्णकुटींत राहतो, तो मुक्काम गाठायचा बरें.

भा०—ठिक आहे. सरकार, येथून कोशभर त्यांची पर्णकुटी आहे. सकाळी सर्व खटला येथेंच ठेऊन आपण तिकडे जाऊं. आणि त्यां सर्वांसच घेऊन भोजनास इकडे येऊं ह्मणजे झालें. मी समजलों. तुह्माला कां वेड लागलींतो, पण आतां सकाळ पर्यंत कसें तरी काढा. ह्मणजे तिची भेट होईल. आपण आतांच तिकडे गेलो असतो परंतु रात्र अंधारी, आणि त्यांत हे भिल्लाचें रान.

सौं०—ठिक आहे. आतांची रात्र कशी तरी जाईल. (असें ह्मणून सर्व निजतात.) नंतर—

मन्या०—(कोणी रडत आहे असा कानोसा वाटून.) कोण हायरे झाडींत ? अरे जबाब दे. कोन रडतो है तित ? (जबाब मिळत नाहीं असें पाहून.) अरे पाहऱ्यावर कोन है ?

सिपाई०—जी, मन्याबादादा मी हजर हैकी पाहऱ्यावर.

मन्या०—अरे पलिकडं झाडींत कोनी रडतया असा सुगावा लागतो या. कोन है तपास कर.

सि०—जी व्हय करतो. (ह्मणून जातो. आणि तपास

करून परत येतो. ) मन्याबादादा, अहो मन्याबादादा.

मन्या०—कारे कोन है ?

सि०—तित एक रामोशी है रामोशी. आन् तोच् रडतो या बगा.

मन्या०—कां बरे ?

सि०—लय बगा इचारलं पन आक्शी बोलतच नाहीं बगा. ( भाळचंद्र व प्रेमसागर गलबा काय ह्मणून जागे होऊन येतात. )

भा०—अरे, सिपाई, दोघें चवघें जाऊन धरून आणा इकडे, ह्मणजे सर्व शोध लागेल.

सि०—व्हय माहराज. ( म्हणून आणिक दोघें चवघें जाऊन रामोश्यास धरून आणतात. )

मन्या०—कार आणलास कां धरून ?

सि०—जी व्हय. हा बगा दादा. काळाढूस आन दांड्गा है बगा.

भा०—कारे रामोशी, कां रडत होतास, आणि तुझे नांव काय?

रामो०—जी माहराज. (हात जोडून.) माझं नांव एसबा बगा.

भा०—अरे, रडत कां होतास ?

एस०—तें नकां माहराज इचारूं. ते जें दुःख झालंया तें एक माझं मलाच माहीत. आन एक भगवान नारायन जानत असल बगा.

प्रेम०—अरे पण सांग, तुला काय आहे दुःख ? आमच्या हातून निवारण होण्या सारखे असल्यास करूं. [ इतक्यांत फारच गलबा झाला पाहून सौंदर्यसागर उठून बाहेर येतो.]

सौं०—अरे एसबा, इतक्यां रात्री तूं येकटाच कां रडत हो-

तास ? तुझें काय दुःख असेल तें मी दूर करतों, पण सांगशील तर खरें.

एस०–(हात जोडून) सरकार, दुःख काय सांगू.. भगवानानं मला मरन दिलं असतं तर बरं झालं असतं. पण तें होनार कुटून ? ज्याच अन्न खाल्लं त्याचा उपकार बी फिटला नाहीं बगा. आन आखर बिचारा व्यरथ हकनाक मारला गेला. अरे राम ! राम ! असा परानी आतां नाहीं द्रिष्ठी पडनार. (डोळ्यांत पाणी येऊन मोठ्यानें रडतो.) ल्य मोठया मनाचा. बिचाऱ्याला अभिमान तर नाहींच. आन मी राजा व हा रामोशी असा परकां पनाच त्यान नवतां धरला बगा. हाय हाय. आवशी माझा मायबाप. तीबी माउली तशीच. तिन ह्मनाव "एसब्या, अरे तूं रामोशी हैस तरी हरकत नाहीं. मी तुला पोरा वानीच समजते." ह्मराज, फार काय सांगू परत्यक्ष आई मेली, तवा बी असं अनखर वाटलं नाहीं बगा. पन आज दाही दिसा उदास झाल्या. संमद्या परीस त्या पोरीचा ल्य आवशी जीव परान माझ्यावर असं बगा. तिन ह्मनाव "एसबा, अरे तूं माझा भाऊच आहेस. तुझ्या बळावर तर आम्ही आरन्यांत दिवस कादतो या. अरे, भगवान आपल्याला या दुःखांतून सोडवील." असं म्हनाव बगा. काय सांगू म्हाराज. एक एक तीच गुन लिवीन म्हटलं तर धरतरी पन पुरनार नाहीं. (पुन्हा मोठ्यानें रडतो.) म्हाराज, तुम्ही तिला बगितली नाहीं. आवशी असमानातलं नक्षीतर बगा. आन तोंड तर जनू चंद्रमा. ल्य बेस.

सौं०–तें सर्व आम्हीं समजलों एसबा. पण त्यांचें झालें तरी काय ? आणि तूं कां रडतोस.

एस०—माहराज, तुमासनी संमदी हकीकत सांगतो. [अ-सें म्हणून झालेला सर्व वृत्तांत सांगतो.]

प्रेम०—असें काय, एसबा, हे आम्ही निघालों पहा. काळूबाईचें देऊळ कोठें आहे, तेवढें मात्र दाखीव. अरे, दोन प्रहररात्रीं बळी देणारना? मग काय चिंता आहे. आतांशी तर एक प्रहरच रात्र झाली आहे. भुवनपाल, व भुवनसुंदरी खचीत जिवंत असतील. चला लवकर.

सौं०—ठिक आहे. परमेश्वर कृपेनें ते जिवंत मात्र असलें पाहिजेत. त्यांचा सर्वांचा समाचार मी एकाटा घेतों.

भा०—माहराज, अगोदर भुवनपालास वाचवावें आणि नंतर त्याचे कन्येचा शोध करूं. कारण एसबाच्या सांगण्या वरून तिच्या जिवास कांहिंच धोका नाहीं.

प्रेम०—खरी गोष्ट. अगोदर त्या काळूबाईच्या देवळांत जाऊन भुवनपालास व त्याचे स्त्रीस सोडवायचें, नंतर दुसरा विचार. चला व्हांतयार, निघा लवकर.

सौं०—स्वारानां आणि गारदी लोकांनां तयार हत्यारानिशी निघण्याचा जलदी हुकम करा. आणि मी तर हा तयारच आहे. (असें म्हणून सर्व तयार होऊन काळूबाईच्या देवळा कडेस जातात.]

पडदा पडतो.

(पडद्या बाहेर.)

वि०—कां सुत्रधार, मोठी अजब कर्णी आहेबा ईश्वराची. मारस्यापेक्षां तारता विशेष खरा. माझा तर बा आतां जीव खालीं पडला. ते जेव्हां सौंदर्यसागर आणि प्रेमसागर तिकडे भुवनपालास वाचविण्यास गेले, तेव्हां मला डोळा

लागला. नाहींतर मी विचार केलाच होता, कीं आपण जाऊन सर्व रामोश्यास बळी द्यावे, आणि भुवनपाळास राणी सह्वर्तमान सोडवावे.

सु०—व: आपण काय शूर सिपाईच. आपण इतकें केलें असतें खरें. आणि कदाचित नसतें झालें तर तुम्ही आपला स्वत:चा बळी दिला असता.

वि०—आहो, वाहवा हो ऐटबाज. एकुण तुम्हाला आमचें बोलणें सर्व मिथ्याच वाटतें काय? ठिक. तुह्मीच असें बोलू लागल्यावर, मग आमची बायको काय? ती बोलेलच बोलेल. काय हा संशय!! बरें असोद्या तें आतां. पण पुढें काय झालें?

सु०—अरे, आतां दाखवितो पुढला चमत्कार. लक्ष माल दे.

वि०हो लक्ष आहेच. तुमचें चालूद्या. (असें म्हणून सर्व निघून जातात.)

## प्रवेश ७

स्थळ.

विश्रांत वनाचे आसपास.

पात्रें.

हंसपालिका ............... भुवनपालाची कन्या.
क्षेमावती.................... कृपासागर रिषीची कन्या;
सावित्री .................... क्षेमावतीची सखी;

(दुसऱ्या कित्येक रिषी कन्या वगैरे.)

हंस०–अहाहा. परमेश्वरा, तूं आनंत आहिस, तुझी लिला आनंत. तुझीकृपा आनंत. पहा, यापूर्वी दोन घटकेचें अगोदर मजवर कोण संकट होतें? परंतु या घटकेस त्या सर्व संकटातून पार पडले. देवा! तुझी करणी आगाध आहे!!! (डोळ्यावाटे आश्रुपात येऊन.) नारायणा! जयसुमंगले, तुला सर्वांची अंतःकर्णे समजतात. सत्या चें सत्य आणि असत्याचें असत्यच तूं ठरविशिल, यांत संशय नाहीं. आतां माझी खातरी झाली. कसे झाले तरी शेवटी तुझ्या घरीं न्याय खोटा होणार नाहीं. प्राणी मात्र चराचर जें जें कांहीं करतें. त्या सर्वांवर तुझी सत्ता असते. आम्हा मानवांचा अभिमान व्यर्थ आहे. आसो, जगदंबे, असें तुझें कृपाळू अंतःकर्ण असतां बिच्याऱ्या भुवनपालावरच कां तुझी वक्रदिष्टी? त्या बिचाऱ्यानें काय तुझा अखंड आपराध केला आहे; त्या विषयींच मन कठोर कसें झाले! अगे, आज पर्यंत आनंत भक्ताचें

संकटीं रक्षण केलेस, आणि तेव्हढा भुवनपाल आणि [माझी आई] भुवन सुंदरीच तुला जड झाली काय ? अगे फारकशास मागच्या भक्तांचीच तुला उपमा कशास देऊं, आतांच पहानां एक घटकेचें अगोदर मीच किती संकटांत होते ? तें मेलें दोघे [दुल्या व सट्ट्या] मजवर पाप द्रिष्टी ठेऊन बलात्कार करणार होते. "अरेरे, स्मरण झाले की, अंगावर शहेरा येतो". मेल्यानी अगदीं मला भ्रष्ट कर्ण्याची वेळ जवळ आणली होती. काय दुष्ट मेले. आनंदात तरी काय आले होते? काय त्यांची स्वरूपं तरी ! ! एक म्हणे तुला चांदींच गोठ करीन, दुसरा म्हणे पुतळ्याचं गाठल करीन. मुर्ख बेटे. कांहींच ज्ञान नाहीं. त्याना असें समजेना कीं, ही कशी झाली तरी राज कन्या आणि आपण रामोशि. तेव्हां ही आपली गोष्ट मान्य करील काय ? पण हे विचार त्यांच्या कशाचे मनांत. मुर्खच ते. एक ह्मणें माझे जवळ बैस, एक ह्मणें माझ्याशी पाट लाव. काय दुष्ट ते. मेल्यांची कर्मे तरी किती आघोर ! ! स्मरण झाले कीं अंगावर कांटा येतो. असो. जगदंबे, अशा वाघांच्या सपाट्यांत सापडलें असतां, त्यांच्या बुध्धीस तुच प्रेरणा केलीस. तेव्हांते गुलाम आपापसांतच ह्मणू लागले कीं. "मी बायको करीन, दुसरा ह्मणें ही बायको मी करीन." असें ह्मणून एकमेक परस्परांच्या हातानेच ठार मेले. जगदंबे, ही लिला कोणाची ? तुझीच. झालें, ते मेले ह्मणून त्यांच्या हातातून सुटलें, आणि पुढें कोठें कोणत्या प्रधानाकडे घेऊन जाणार होते, त्या काळजीं तून ही सुटले. आदीमाये खरेच सांग—ह्या गोष्टी तुझ्या कृपेवाचून झा-

ल्यो काय ? नाहीं. मग तेव्हढ्या माझ्या बाबा वरच (भुवनपाळ) व आई वरच कां तुझी वक्रद्रिष्टी ? तर जगज्जननी असे करूं नको. ते कोठें धरून नेले आसतील, तेथें त्याना खुशाल ठेव. आणि आह्मा दोन मायलेकरांची जलद भेट कर. पहा, मज वाचून त्यांचें कंठीं प्राण आले असतील. अरेरे. (दुःख स्मरण होऊन) आतां मी आई ह्मणून कोणास हांक मारूं ? आई, तुला तरी मज वाचून क्षण जाईल काय ? आई, मी इतकी मोठी व पराक्रमी झालें तरी तुझे स्तन पान नित्य केल्या वाचून माझे पोट भरत नसे [डोळ्यांवाटें प्रेम धारा चालतात.) आतां प्रेम पान्हा मला कोण पाजील ? बाबा, तुला तरी मला एकटीला त्या दोघां मांगा जवळ टाकून पुढें कसे जाववले ? अरेरे. मी चुकले. तूं तरी काय करशील, मला टाकून तूं सुखानें कां गेलास ? नाहीं. आपण सर्वत्र निद्रिस्त असतां दुष्टानी कावा साधिला. त्यास तूं काय करशील बाबा, तुला त्या दुष्टानी आतां कोठें नेले असेल, आणि काय दुःख दिले असेल ? हायहाय. तुमचें वृत्त मला कसे समजेल. आतां मी लेकरानें काय करावे ? बरें, त्यांतून मी कोणत्या देशांत व अरण्यांत आले आहे, हें कांहींच समजत नाहीं. तुह्मी कोठें असाल ? परमेश्वरा, ह्या वेळेस जर मार्ग दाखविशील तर तुझें मोठें उपकार होतील. देवा ! येकदा माता पितर आहेत तित पर्यंत मला नेऊन पोहचीव. मग बगते त्या दुष्टांचा चमत्कार ! ! अरेरे. आतां कशाची ही गोष्ट घडते आतां माझे आईस मी पुनः भेटेन काय ! येथें ही दुष्ट लोकांची वस्ती आसली तर पुनः काय प्रसंग गुदरेल

कोण जाणें ! देवा ! असें दुःख सागरांत ढकलणें हो ते, तर मग असें स्वरूप तरी द्यायचें नव्हतेस. आतां एकटी राहीन तर निर्भय मला कोण राहूं देते ? सु-मंगले, माझ्या मनांतील विचार तर तूं जाणतच आहेस का, भाळचंद्रभट ह्मणून कोणी विद्वान ब्राह्मण काशियात्रेहून परत आपलें गांवीं जात होता, आणि एक दिवस आमच्या पर्णकुटींत वस्तीस राहिला होता. त्यानें, ज्या मनमोहनाचें स्वरूप वर्णन केलें, ती मुर्ती माझ्या ध्यनीं भरली आहे. आणि त्याच वेळीं मी शपत नाहीं कां वाहून घेतली ! कीं लग्न करीन तर त्याच राज बिंड्या बरोबर करीन, नाहींतर इतर पुरुष मला बावा (भुवनपाल) समान आहेत." सुमंगले, हा सर्व भाव तुला-ठाऊक आहेच. मग एकटी येथें राहीन तर मनांतील हेतूं साधेल काय ? कोणी ही येउन मजवर अनर्थ करील. असो. सर्व लाज तुला आहे. [असें मनाशीच-बोलत इकडे तिकडे फिरत आहे. इतक्यांत.

(क्षेमावती व सावित्री प्रवेश करतात :)

क्षे०—सावित्री, आहाहा. कायगबाई वंसतरुतुची मौज ? जिकडे तिकडे आंब्रमोहराचा सुगंध भरून राहिला आहे. मोगऱ्यापेक्षां मोतियांची काय बहार ! मन कसें वेडेंच होतें बाई. शेजारीच जाईजुई पहा, त्यांचा अभिमान हरण झाल्या मुळें अगदीं नंम्र होऊन भुइवर पसरल्या-आहेत. मला वाटतें मोतियास शरणागत होतुच्छाता नमस्कार करीत आहेत. सावित्री, तुला कसें वाटतें ?

सा०—खरच बाई साहेब. त्यांत नवल तें कोणतें ? मोतियां तरूण दशेस येऊन आनंदानें प्रफुल्लित झाल्यावर

जाईजुई कां बरें नम्र होणार नाहींत ! कोणाला ही तारु०यसुख नकोसे आहे काय ?

क्षेमा०—अगे, संपुर्ण वृक्षास नुतन पल्लव अल्यानें काय शोभा दिसती आहे. अहाहा. खरोखरीच विश्रांतवन असे यथा योग्य नांव या वनास साजतें. गुलाब मदनबाण, केतकी, चंपक, गुलेनार, गुलछबू, मर्वा, पांच बकोली, कितीग हे पुष्पवृक्ष ! चहु कडे दर्वळ सुटला आहे. आहाहा. कोण्या प्राण्यास सुख होणार नाहीं. अहाहा. सावित्रे, ये आपण पलिकडेस गर्द छायेंत जाऊं. तिथें जागा तरी किती निर्मळ आहे पाहिलीसना ? भोंवताली ताडमाड अशोकादिवृक्ष असून छाया किती घनदाट आहे. तसेच न्याहाळून पहा, एके अंगांस पवनगंगा काय स्वच्छोदकानें वाहती आहे. आहाहा. मन काय अनंदीत होते आहे. पण सावित्रे अंगाची अगदीं दुप्पट आग होऊं लागली. कायग हा चमत्कार ! ! अगे, असेंहें सितळस्थळ असतां मलाच कां उबारा होता ?

सा०—बाई साहेब, अशा नुसत्या मनोरम स्थळानें मनमोहना खेरीज मनोरमा स्त्रीचें शांतत्व कसें होईल? उलटा दाहा मात्र होणार. कारण यावेळेस या मनोल्हादक स्थळीं, काम बळीस जिंकणारा प्रिय उत्तम पुरुष सन्निध असतां तरच तुह्मी सुखी झाला असतां.

क्षे०—अगबाई ! तू तर ताळच सोडलास. आपल्या बोलण्या मधीं पुरुषांचेंग नांव कशास ?

सा०—बाईसाहेब, मी कांहीं तुह्माला लावून नाहीं बोलले. जें खरें आहे, तें बोलण्यास ब्रह्मदेवाची तरी भीड कशास व्हावी. अहो, तरुणीस तरुणाचें संगती खेरीज वर्के

सर्व विलास मिळाले, उपयोग काय ? उलटें विरहदुःख विशेष मात्र होतें. मंदीरांत तांबुलाची तयारी, फराळाची तयारी, पुष्पशयेचा थाट, जोडीनें पाट, ताटा शेजरी उभयतांचें ताट, इतकें करून ह्मणाले पाहती आहे नेत्र लावून वाट, जसें दुःखास्पद; तसेंच सर्व प्रकार.

क्षे०—अहाहा. एकूण तूं चतुर मैत्रिण खरी. शाबास. सारख्यास सारखें समवयस्क मिळल्या खेरीज ऱ्हिदूगत मोकळें होत नसतें. अतांच पहा, माझ्या मनांतील पेटलेल्या कामाग्नीस तुझें भाषण सितोदकानें अम्मळ शांत केलें. नाहींतर कामाग्नीची आणि विरहाग्नीची गांठ पडून यकदंम तुंबळ युध्द्य झालें असतें. मग त्या विरश्रीच्या युध्द्या पुढें म्या अबलेनें काय वाट केली असती ? असो. सावित्री, तपोधन माहराजांचा जो पुत्र माधव नामा, त्यानेच माझ्या मनास वेडे केले आहे. सावित्रे, अतां कसे करूं ? बाबांचें आणि तपोधनांचें उभे वांकडे. तेव्हां माधवाचें नांव काढिलें, कीं मग माझे काय होईल आणि काय नाहीं. बाबांचा राग तुला माहित आहेच.

सा०—खरें बाईसाहेब. इतक्या जरी आडचणी आहेत तरी परमेश्वर कृपेनें आपला सर्व हेतु पुर्ण होईल. चला आपण त्या रम्य स्थळीं बसूं.

क्षे०—चल जाऊं. पण अगे सावित्रे, ती पाहिलीस कां तिथें कोण बसली आहे ती ? अहाहा. कितीग सुंदरपणा. व: ही कोण असावी ? सावित्रे, तेज पाहिलेंस कां ? अहाहा. शुध्द्य लक्ष्मीच. चल आपण जवळ जाऊन विचारूं चल. ( क्षेमावती आणि सावित्रा हंसपालिके जवळ जातात. )

क्षे०—हे सुकुमारि, तुझें सुंदरत्व पाहून मी स्त्री असतां ही मोहयुक्त झाले, मग पुरुषतर होतीलच. सखे, ह्या बोलण्याचा राग न आणतां तू आपलें नांव व ज्या शुभ्र उदराचे ठायीं जन्मधारण केलास त्यांचीं नांवें आणि देथें किमर्थ प्राप्त झालीस, हे सर्व कृपाकरून सांग. माझे मनांतून तुशी सख्यत्व करावे असे आहे, पण बाई तूं मनावर धरशील तेव्हां. कांग सावित्रि ?

सा०—सत्य आहे. त्यानी तरी (हंसपालिकेकडे पाहून) अतां निपुटपणें सांगावें हेंच योग्य.

क्षे०—सावित्रे, मुख पहा, पौर्णिमेच्या चंद्रतुल्य असतां मला वाटतें कांहीं तरी चिंता व शोक प्राप्त झाल्यामुळेंच असें फिक्कट झाले असावे. केश पहा, आज किती एक दिवस ज्यानां स्नेह स्पर्श मुळींच झाला नसावा असें वाटतें. ही जर आपलें सर्व वृत्त कळवील, तर बाई मला मोठा अप्रतीम आनंद होईल.

हं०—आहो प्रियकर्णी, मी तर आपलें सर्व वृत्त सांगतेच, पण त्या पूर्वीं आपलें कळावें अशी माझी इच्छा आहे.

क्षे०—ठिक आहे. कसग सावित्री ! आपलेंच वृत्त अगोदर सांगावें.

सा०—ठिक आहे. आपलें अगोदर सांगितले ह्मणून काय हरकत आहे.

क्षे०—अगे सुंदरी, श्रवणकर. या अरण्यास विश्रांतवन असे म्हणतात. कारण हें तसेच शोभायमान आहे. कसाही प्राणी संतप्त येथें आला तरी तो शांत होतो, पण बाई कामानें संतप्त झालेला मात्र शांत होत नाहीं हो. तो विशेष संतप्त होतो. असो. या वनास पवनगंगेनें आपला आश्रय दिला आहे, यामुळें बहुत साधु वृंदें

येथें आनंदानें पर्णकुटींतून नांदतात. पण बाई चोरे-ल्यांचा अड्डा मोठा या ठिकाणीं. पर्वाच येथें एक येथून तीन चार कोसावर कोणी प्रवासी राजाराणी पर्ण कुटींत राहत होते, त्यांना चोरल्यानी मारलें म्हणून ऐकिलें. असो. सांगण्याचें कारण इतकेंच कीं, आम्ही ही येथून नजीकच पर्णकुटींत राहतो. माझ्या पित्याचें नांव कृपासागर. मी त्याची कन्या. आणि ही माझेंच शेजारी राहते. ही तपस्व्याचीच कन्या आहे. हीचें नांव सावित्री आणि माझें नांव क्षेमावती. झालें सर्व, आतां तुझें वृत्त सांग ! तुला मैत्रिण करण्यास आम्ही फार उतावळ्या झालोंत.

हंस०—ठिक आहे. आतां माझें वृत्त ऐका. [असें म्हणून झालेलें सर्व वृत्त सांगतें.] ऐकिलेन बाई, जग दंवेची मर्जी.

क्षे०—अरेरे. एकूण तुम्हावर हा प्रसंगना ? असो परमेश्वर सर्व पार करील. तूं आतां आम्हाबरोबर आमचे घरी चल. म्हणजे मजवर जो माझ्या बाबांचा लोभ आहे, तोच तुजवर होईल. आणि त्याचें कृपेनें तूं सर्व आनंद पावशील. काळजी करूं नकोस. तुझ्या चिन्हावरून तुझे दुःखी दिवस सर्व सरलें आहेत असें वाटतें.

क्षे०—आतां या पुढें उत्तरोत्तर तुझें कल्याणच होईल. शाबास. हंसपालिके, चल आतां आम्हाबरोबर.

हंस०—ठिक आहे. तुमची आमृत वाणी श्रवण करून मला अतीशय संतोष झाला. परमेश्वर तुमचें कल्याण करो. चला आतां कृपासागर माहराजांचे पायावर मला घाला चला.

सा०—चला, बाईसाब, चला. हंसपालिके, चल बाई.

प्रेमा.—ही मी निघाले. [सर्व जणी निघून जातात.]

(पडदा पडतो.)

[पडद्या बाहेर.]

विदू.—का सुत्रधार, खुप मजल पोंचविली बुवा. ज्याला आश्रय नसेल त्याला आश्रय. बिऱ्हाड नसेल त्याला बिऱ्हाड. हा धंदा केव्हां पासून पत्करला ? बरें, तें असो. पण कांहो ? तें सौंदर्यसागर आणि प्रेमसागर वगैरे काळुबाईच्या देवळाकडे गेले. आणि मग पुढें ? तो सगळा फराळ केला वाटते ? व : भारी बुवा चुकता. चुका तरी किती काढाव्यात ? जेवायला बसला तरी तुम्ही हातानें घास घेऊन तोंडांतच घालतां, केव्हढी बरे चुकही ? व : हें काय ?

सू.—शाबास. मुलगा काय, मुलगा पर मुलगा शुध्ध बृहस्पती. अरे, सौंदर्यसागर तिकडे गेल्यावर पुढें काय झाले तें दाखवितो. लक्ष दे.

वि.—ठिक आहे. दाखवा लवकर. [निघून जातात.]

---

## प्रवेश ८

स्थळ-

कालुबाईचें देऊळ.

### पात्रें.

भुवनपाल ........................ राजा.
भुवनसुंदरी ........................ राणी.
खंडबानाईक ........................ मुख्यरामोशी.
सौंदर्यसागर ........................ चंद्रकांतराजाचा पुत्र.
(इतर सर्व रामोशी व सौंदर्यसागराचे सर्व लोक वगैरे.)

भु० पा०—हे जगत्जननी, हे त्रिपुरसुंदरी, हे हंसवाहिनें, हे आदिमाये, हे कुलस्वामिनी, हे ब्रह्मांड रक्षके, हे वागेश्वरी, हे तुळजापुर वासीने, जयसुमंगले मातोश्री, पहा आपलें स्तोत्र सहस्र मुखी जो शेष तोही वर्णन करतां श्रमला, तर या अल्पमती पामरानें एक मुखें करून काय वर्णन करावें. अहाहा. मातोश्री, इच्छामात्रें करून निमिषार्धांत सकल ब्रंह्माड उत्पन्न करून पुन: लयास नेतीस ही तुझी शक्ती. ब्रह्मा, शंकर, विष्णु, इत्यादि बाले इच्छा पालख्यांत निजऊन त्यानां हीं झोंके देतीस-तेथें आह्मा दिन दुर्बल मानवांची कथा काय ? तुझी कृपाद्रिष्टी जिकडे फिरेल तिकडे खडे ही पद्म राग होतील. मुके ब्रहस्पतीवत् भाषणें करतील, पंगु पर्वत शिखरें चढतील. अहाहा. काय तुझा महिमा ! क्षणांत रंक क्षणांत राव, हा सर्व तुझ्या इच्छेचा प्रकार. मातो, श्री, मनुष्य देहांत कोण्याही प्रयत्नानें आपल्या असलेल्या

ऐश्वर्याचा अभिमान करूनयें. कारण सुखामागें दुःख, दुःखामागें सुख, मनुष्यास समान लागलेंच आहे. तुझ्या इच्छेरूपें करून कोण दिवस कसा प्राप्त होईल, याचा कांहींच नेम नाहीं. मीच पहा, काय माझे ऐश्वर्य होते ? किती सत्ता, किती मिजास, किती सुख ( डोळ्या वाटें ढळढळा पाणी वाहतें ) मातोश्री, तो मी आज या दुष्ट रामोश्यांचें हातीं लागून तुज समोर बळी यावा काय ? मी राज्यांवर असतां कोणासी द्वेष बुद्धीनें वागलो नाहीं. या हतानें कोणाचें वाईट केलें नाहीं. प्रजेस तर पुत्रवत पाळण केलें. असलेल्या संपत्तीचा कधी गर्व केला नाहीं. गोब्राह्मणांचें ठायीं निरंतर लीन होतो. परस्त्रीसपापद्रिष्ठी कधी डोळा उचलून पाहिलें नाहीं. मातोश्री, हें सर्व तूं जाणतच आहेस. सर्वांची अंतरसाक्ष तूं आहेस. मी स्वमुखें करून काय सांगूं. असे असतां या अनाथावर इतकी क्रोध द्रिष्टी कां केली ? जगदंबे, ह्या अनाथ लेकराकडून काय अपराध घडला ? बरे, जरी झाला असेल, तरी क्षमेचा पूर्ण सिंधू तुज जवळ भरला आहेना ? त्यांतून एखादी कृपालाट मज पाप्यावर सोडून मला पावन कां नाहीं केले ? हा दीन कृपाकटाक्षास पात्र नाहीं काय ? आजपर्यंत सहस्त्रावधीं भक्तास संकटीं धाऊन कृतकृत्य केलेस, आणि हा भुवनपालच तुला जड झाला काय ? मातोश्री, आजून ही तुझें अंतःकर्ण दयेनें द्रवेल तर तूं काय एक करणार नाहींस ? पुराणें तुझी ब्रिदावली गातातना ? पूर्वीं, हरिणी पाडसा सहवर्तमान अरण्यांत विहार करीत असतां, पारध्यानी एका आंगास जाळें लाविलें, दुसरे अंगीं पारधी धनुष्य घेऊन उभा, तिसरें क-

हे आग्नी पेटविला, आणि चवथे बाजूस शिकारी कुत्रें उभें. असीं एकदम चहुकडून संकटें उभी राहिल्यावर जगदंबे, त्या वेळेस किती रूपे धारण केलीस. अशा संकाटांतून विचारें पाडसासह हरणीस मुक्त केलेसना ? त्या वेळीं, सस्याचें रूप घेऊन कुत्र्यास कोणी पळविलें, कृपा मेघ होऊन अग्नी कोणीं विझविला, सर्प होऊन पार ध्याच्या अंगठयास कोणी चांवा घेतला ? अग्नी रूपानें जाळें कोणीं जाळिलें ? जगदंबे, हरिणी सारखा कृपादानास हा दीन पात्र नाहीं काय ? [असें म्हणून करुणा स्वरानें रडूं लागतो.]

खं०—अरे बिऱ्या ! तूं तर लयच हात पाय पसरलेस. हं, पगतां कायरे ? हाना फटका. बिऱ्याला एक घटकेची फुरसत दिली, ह्मन लयच डवल लावलाया. अरे बारे मवश्या. चला याची मान वाकवा देवीच्या पायापं आन् हाना फटका.

सर्व०रामो०—जी व्हय खंडबा. [ह्मणून सर्व रामोशी. हत्यारें वगैरे सावरून अंगावर धावतात.]

भु०रा०—अरे, खंडबा. [धावत, वरडत करुणास्वरानें] अरे नको रे मारूं. तुझ्या पाया पडते. खंडबा नको रे नको. [मोठ्यानें रडते.] अरे तुला सर्व अंगावरील डागिणें देते. तुझें जन्मवर दास्यत्व करीन. अरे देरेदे एव्हढें चुडेदान दे. अरे तुझ्या पायापडते.] खंडबा. तुझ्या इतक्यां विनंत्या केल्या दया येत नाहीं कां ? अरे तुझा काय अपराध केला आह्मी ? जन्मवर आमचें अन्न खाऊन आह्मा वर हात्यार धरतोस हे झाडे कोठे फेडशील ? तूं मागशील तें तुला देईन माझ्या प्राणनाथास सोडून दे.

सौं०—प्रेमसागर, आतां कां अंत पाहतां ? उठा आणि घ्या सर्वांचा समाचार. भाळचंद्रा, त्यांचें दुःख आतां पाहवत नाहीं. ती बिचारी साधवी पहा त्या खंडबाचें किती अर्जव करती आहे, परंतु दुष्टास दया येती कां ? अरे लुच्च्या ! [खंडबाकडे पाहून.] हा आलो पहा आतां. गुलामा त्यांचे बदला आतां तुलाच देवी ज-वळ बळी देतो.

प्रे०—चला सर्व चला. आतां छपून बसणे उपयोगीं नाहीं. या सर्व चोरास यथास्तित बक्षीसे दिली पाहिजेत.

भा०—हो. हामी निघालो पहा. पण अगोदर तरवार क-शी धरावी, शेंड्यांकडून कीं बुडख्याकडून ?

प्रे०—शाबेवा ! खूप तरवार बाहदर अहिस. आतां प्रसंग जवळ आला, आणि तूं तरवार धरण्यास शिकणार ? शाबास.

सौं०—त्याला काय भिक्षुकाला माहीत; मोठे शूर सुध्धा प्रसंगीं घाबरतात मग !!!

मन्या०—कां राव उगीच गडबड. चलाव्हा होर. (सौं-दर्य सागराकडे पाहून.) तुह्मी सरकार अंदुगर खंडबा-ला उडवा, आन परमसागर जी आनमी संमद्यांचा समा-चार घेतोन काय ! व्हा होर. बाहेरल्या अंग संमद सिपाई आन सवार उभ केलेत, काय बिसादहै कोनी पळून जाईल.

सौं०—ठिक केले, मन्याबा, चांगला आहे बंदोबस्त हें आह्मी उठतो. (असे ह्मणून सर्व देवळांत प्रवेश करतात.)

अु०रा०—अहो दादानो तुमच्या पाया पडते. अरे खंडबा, येऊ देरें माझी गरिबाची दया; अरे तुला मारणेच अहि तर प्राणनाथांचे अगोदर मला माररे ! ह्मणजे मी

सौभाग्यांत मरेन. एक घटके कर्ता वैधव्यकां ?देत आहो तुह्मा सर्वांनां सांष्टांग नमस्कार करते. (असे ह्मणून खंडबाची दाढी धरते.)

खं०—चल सोड. मोठी आलिया गिन्यान सांगाया, तुला अंदुगर मारून मंग माझी बाईल कोन व्हईल ?

भु० रा०—अरे मेल्या! प्राणनाथास अगोदर मारून मग मला छळणार काय ? तुझ्या तोंडाला आग कां लागेना. दुष्टा, काय करूरे. (मोठयानें अक्रोश करते.) हर हर हे परमेश्वरा, हे दीनदयाला, हे कृपा सिंधो, हे भक्त वर दायका, हे दुष्टमर्दना, अरे धावरे धाव; (भुवनपालाकडे पाहून.) प्राणनाथ; आपण मला सोडून जातां, मागें माझी वाट काय! हे मेले भ्रष्ट करण्यास इच्छितात. प्राणप्रिय, हीं अक्षरें तुमच्या कर्णास कशी रूचतात ! आहो, या वेळेस तुमची मातोश्री सुमंगला कशी हो झोंपीं गेली ? आतां काय करूं (असे ह्मणून भुवनपालाचें कंठास मिठी घालते.)

भु० पा०—(भुवन सुंदरीच्या कंठास मिठी घालून व तिला पोटाशीं धरून.) सखे भुवनसुंदरी, काय करूं माझा कांहींच उपाय नाहीं. तुला सोडून मी कां सुखानें जातो ! आतां रडून काय होणार. आई सुमंगलेची मर्जी. उगी ! हें काय ? शेवटची अक्षरे ध्यानांत ठेव. मी गेल्यावर तुला लागलीच या दुष्टांनीं मारलें तर उत्तमच झालें. नाहीं पेक्षां तुला रक्षण करणारीन व पातिव्रत संभाळणारीन, एक मातोश्री सुमंगलाच समर्थ आहे. तिच्यावर भरवसा ठेव, तिच तुझें रक्षण करील. आतां रडूं नकोस. सोड मला. आणिक एक वाईट वाटतें. या वेळेस शेवटीं हंसपालिकेची मात्र भेट झा-


काळूबाई देऊळ
क.
अ. सं.

ली नाहीं. [असें ह्मणून भुवन पाल मोठयानें रडतो. व भुवन सुंदरी ही आक्रोश करते.]

खं०—अरे बगता काय ? हं. असें ह्मणताच एकच आकांत होतो.] इतक्यांत सौंदर्य सागराची मंडळी आंत शिरून जिकडे तिकडे कचाकची होते.]

(पडदा पडतो.)

( पडद्या बाहेर.)

वि०—कां सुत्रधार, मोडळी कां नाहीं इतक्या रामोश्यांची खोड ? मारी कधी देखली होती की नाहीं अशी करून टाकली.

सू०—शाबास. आपण तसेच पराक्रमी.

वि०—पराक्रमी ह्मणजे कांहीं असे तसें एका किंवा दोन हात्यारांचें शिपाई अहोत कीं काय ? हा जवान पंच हत्यारी आहे उगीच नाहीं.

सू०—अरे ती कोणतीरे पंच हत्यारें ! आम्हाला उगीच नांवें तर ऐकून माहित असु दे !

वि०—हा हो. नांवें सांगतो. तुम्ही मोजा. म्हणजे पहा, शत्रू अगदीं तोंडा समोर जवळ आला तर, "मोठयानें रडावें." हें हत्यार. दुसरे मारूं लागलातर, "पाया पडावें." तिसरें कोणी प्रथमत: लढाईला चला म्हटलें, कीं "लुगडें नेसून बांगड्या भरून बसावें." चवथें.—

सू०—अरे बाबा पुरें. समजलें पंच हत्यारें. शाबास, एकूण शूर सिपाई खरा. [पाट थापटून.] शाबास.

वि०—[फुगून वढवलानें]. काहो सुत्रधार, झालें आटपलें

कां तुमचें आख्यान. जाऊं आम्ही घरी ? [हात पुढें करून.] आणा तर आणा खिरापत.

सू०—अरेवा. अरे मौज काय ती आतां पुढें आहे आणि चाललास कोठें ? आतां पुढच्या भागांत तर हंसपालिकेची आणि सौंदर्य सागराची भेट होऊन काय बाहार होणार आहे. अरे इतकें झालें तसें शेंवट भुवनपालास गादीवर बसवून आनंदाचें लाडू खाऊन जाऊं.

वि०—बः मग तर गंमतच झाली. आमचें काय ? इतकें जागलोंत तसें आणिक उजाडे पर्यंत.

सू०—ठिक आहे तर, पहा आतां चमत्कार.

(असें ह्मणून निघून जातात.)

# भाग ४.

## प्रवेश १:

### स्थळ

**विश्रांत वनांतलि एक रमणियजागा.**

### पात्रें.

**हंसपालिका** ................. भुवनपालाची कन्या.
**क्षेमावती**.................... कृपासागराची कन्या.
**सावित्रा** ...................... ऋषी कन्यका.
**सौंदर्यसागर** ................ चंद्रकांताचा पुत्र.
**भाळचंद्र** .................... त्याचा स्नेही.

**सौं.**—कारे भाळचंद्रा, कालचा प्रकार ठिक झालाकीं नाहीं? अरे, जरा आपणास धाऊन येण्यास विलंब लागला असतां, तर भुवनपाल आणि भुवनसुंदरी जिवंत दृष्टी पडली नसती. बरें झालें, त्यांच्या बदला त्यां दुष्टांचेच बली दिले. भाळचंद्रा, यांत माझे बाबास काय मिळालें बरें! विनाकारण बिचाऱ्या भुवनपालाचे पाठीस लागला आहे. मी खचीत सांगतों परमेश्वराचें घरीं असली कुलें रुजू नसतात. आपण करावे काय ? बाबांचा स्वभाव मला बिलकूल आवडत नाहीं. बिचारा गादीवर बसल्या पासून एक दिवसही प्रजेस सुख नाहीं. ज्याच्या त्याच्या तोंडी निंदाच ऐकू येते. अतां काय करावें. मला पुष्कळ भल्या मंडळींनीं येकांती नेऊन चंद्रकांतां विषयीं फारच निंदाकर्मे सांगितली; पण काय करूं;

जीवाची आग होऊन जाते. प्रत्यक्ष बाप आहे. ह्मणून अन्य विचार करता येत नाहीं. नाहीं तर ठार मारून टाकिले असते. कारण असा राजा काय उपयोगी ?

भा०—खरें माहराज. धर्म शास्त्रही असेच आहे. कीं राजा जर अनितीनें वागेल, तर प्रजेनीं त्यास दंड करावा. माहराज, मी सुध्धा दर रोज बोभाटे ऐकतों, कीं आज-काय आज सुभेदाराची बायको आणली होती, उद्या-काय उद्या तो गावांतील संभावीत त्रिचारा त्रिविक्रम शास्त्री त्याची बायको आणा. अशा एक कीं दोन, नित्यशः पांच पन्नास बायकांची विटंबना होत असेल. पर्वांचा फार्स तुह्मास माहीत असेलच. ह्मणजे शृगांरपुरीहून रामसिंग आपला स्वार आला तो ! त्यानें नाहींकां तो फार्स सांगितला ?

सौं०—कोणतारे तो ? माझें नसेल लक्ष तिकडे.

भा०—अहो, धनपाल ह्मणून सावकार नाहींकां भुवनपालचे वेळचा ? त्याची बायको फार खपसुरत आहे. तिलाच रात्रीं धरणें पाठविले. परंतु तो धनपाल जेव्हां हिर-कणी खाऊन प्राण देऊं लागला तेव्हां मग गप्प झालें !! काय महाराज, प्रजेवर कर तर बसविले, घरपट्टीतर आहेच शिवाय तांबडे पागोटें घालील त्याला तीन रूपये कर. काय हा अनर्थ. जमीनीचे सारे वाढविले. या शि-वाय हजारो प्रकारच्या दुष्ट चाली जबरदस्तीनें पाडून गोर गुरिबांचें नुकसान होत आहे. माहरज, त्या दुष्ट सिंव्हनल प्रधानाचा इतका खेळ. हल्लीं भुवनपालास मारण्याचा तरी त्याचाच उपदेश. कारण असे केलें ह्मणजे हंसपालिका हस्तगत होईल, एव्हढया साठीं. पण सरकार, त्या मेल्या ह्मसोबास कां हंसपालिका राजी

होईल. त्या विषयीं तिची खात्री मागेच झाली आहे. मी जेव्हां काशी यात्रेहून परत येत होतो, तेव्हांच त्यांचे पर्णकुटींत राहिलो होतो. हंसपालिकेचें माझें दोन घटका पर्यंत येकांतीं बोलणें झालें, त्यांत मना सरखा नवरा मिळेल तरच लग्न करीन, नाहीं पेक्षां प्राण गेला तरी ब्रह्मचर्य वृत सोडणार नाहीं. असा तिचा कटाक्ष होता. पण माहाराज, त्याच वेळीं मी आपल्या स्वरूपाची तिला तारीफ सांगून आपणा विषयीं मन वळऊन ठेविलें; असो आतां काय उपयोग ? जिवंत असेल, तर साऱ्या गोष्टी.

सा.—अरे भाळचंद्रा, काय सांगूं मी अजून तिला समक्ष अवलोकन केली नाहीं, तरी तिज विषयीं मनाचा गृह पक्का झाला. आतां तीच मिळेल, तर लग्न करीन, नाहीं पेक्षां प्राण गेला तरी ब्रह्मचर्य सोडणार नाहीं. भाळचंद्रा, फार काय सांगूं तिचा शोध लागेपर्यंत या अरण्यांत राहीन. कार्य सफळ झाले तर बरें. नाहींतर पुनःश्च त्या दुष्ट बांबाच्या राज्यांत पाऊल नठेवितां तिर्थ यात्रेस निघून जाईन. पण भाळचंद्रा, आतां ती भेटेल का ? कोणी दुष्टांनीं काय तिचें हल केले असतील कोण जाणे !

भा.—माहाराज, आपण ध्यास धरून वेडे होऊ नका. आपल्यापेक्षां भुवनपाल आणि भुवनसुंदरी किती शोक करती आहे बरें ? त्याची समजूत कोणी करावी. त्यांची भाषणे मज जवळ काय आहेत ती सांगूंका तुह्माला ?

सौं.—भाळचंद्रा, सांगरे सांग बिचारा भुवनपाल तुजजवळ काय बोलत होता ?

भा.—माहाराज, भुवनपालास सोडऊन आणल्यावर त्यानें इ-

श्वराचे फार आभार मानले, आणि तुमचा फार आभार दर्शऊन ईश्वराजवळ तुमच्या कल्याणा विषयीं प्रार्थना केली. नंतर मी जवळ उभा पाहून मज जवळ उस-मरले, कीं, आज जर मी राज्यावर असतो, व कन्या जिवंत असती, तर या सौंदर्यसागरास जावाई करून लग्न किती समारंभाने केलें असतें ? असो. ईश्वरा, तुझी मर्जी." सरकार, असें भुवनपालाचें करुणा शद्ब ऐकून माझे मनास फार वाईट वाटले.

सौं०—एकून भुवनपालाचें मनांत मला जावाई करणें आहे काय ? तर मग आतां हंसपालिकेचा शोध थोडासा आणिक कोस दोन कोस करून माघारी जाऊं. आणि भुवनपालास राज्य देण्याची तजवीज करूं. कारण अन्यायानें अचरण करणारा पिता जरी आहे. तरी त्याला दंड करावा असे शास्त्र सांगतें. आणि असें झाले तर सर्व दुनिया माझे आभार मानील यांत संवशय नाहीं. आज आठदाहा वर्षांत प्रजा अगदीं जर्जर होऊन गेली आहे. भाळचंद्रा, भुवनपालाचे वेळीं, प्रजा किती सुखानें नांदत होती ? असो. आतां सर्व विचार झाला हा प्रेमसागरास सांगून फत्ते करून टाकूं. बहुधा सेनापतीसह सर्व मंडळी आपल्याला सामील होतील. फक्त रणछोड रायास मात्र यांत घेणें नाहीं. कारण त्याचा आणि बाबांचा फार स्नेह आहे. झाले, प्रथम अगोदर सिंव्हबलास कैद केले पाहिजे. असो. आतां प्रेमसागराचें विचारानें सर्व बेत ठरऊं. चला, एखादें सावज तरी धरूं. ह्मणजें शिकारीमुळें फार वेळ लागला असे शोभेल, आपला बहुतेक वेळ यांतच गेला हें कसें सांगावें ? चला आतां एखादे सावज धरूं आणि चालते

होऊं. तिकडे प्रेमसागरासह सर्व मंडळी वाट पाहत असतील.

भा०—चला. (असें ह्मणून दोघें ही पुढें चालूं लागतात.)

भा०—आहो, आहो माहराज, तें पहा हरीण.

सौं०—अरे हो. बरेंच झालें. हा पाहा सोडतो तीर. पण! अरे, अरे त्याच्या मागे पाहा केव्हढा वाघ लागला आहे तो?

भा०—हो खरेंच माहराज. आतां? मी तर पळतो बुवा. कां झावडार चढूं? आतां? आतां कसेंरे? (थरथर कांपु लागतो.)

सौं०—हवेड्या. इतका कां भितोस. मी आहे तो पर्यंत तुझ्या केशास धका लागू देणार नाहीं. चल फेक माझ्या मागे घोडा. हा पाहा सोडला तीर.

भा०—पण माहराज, चुकलातो तीर. आतां?

सौं०—चुकला तर चुकला. त्यांला मारल्या खेरीज मागे परतणे नाहीं. चल घोड्यास टाच मार. बिशाद काय त्यांची. हा पाहा दुसरा तीर. (असें म्हणत सौंदर्यसागर व भाळचंद्र, घोडे उडवीत वाघा मागे लागलेत.) इतक्यांत—

सा०—बाई क्षेमावती, चलाग चलालवकर पळा. तो पहा एक हरीण पळत येतो आहे, आणि त्याच्या मागे वाघ पहा केव्हढा. ! !

क्षे०—खरेंच. आणि मागे पहा, दोघें जण घोडें उडवीत पाठीं लागलें आहेत. आतांग बाई?

सा०—अग पळा लवकर: ते पहा आले जवळ. (दोघीहीं वेड्या सारख्या होऊन थरथरकापतात. व कोठें पळावे अशा गडबडून जातात.) इतक्यांत.—

हं०—क्षेमावतीबाई, आपण घाबरू बका. वाघाची बिशाद काय? हा पहा सोडते तीर. [असें म्हणून हंसपालिका, तीर सोडून हरिणास व वाघास दोघांस ही खालीं पाडते.]

क्षे०—शाबास, बाई शाबास. काय तुझा पराक्रम वर्णन करावा. ते दोघें पहा किती एक कोश मागे लागून आले: परंतु तूं सहज एका तिरानें दोघास ही चीत केलेस. शाबास. स्त्री जात होऊन कायग हा पराक्रम!!

सा०—खरंच बाई, सर्व गुणानें संपन्न आहात. [इतक्यांत सौंदर्यसागर व भाळचंद्र जवळ येऊन.]

सौं०—अहाहा. भाळचंद्रा, हीच कारे चारुगात्री? अरे काय हा पराक्रम. (तोंडांत बोट घालून.) काय सुंदर स्वरूप. अरे ऐकदम माझे सर्व पुण्याईचें फळ आज प्राप्त झालें काय? अहाहा, भाळचंद्रा, हरणा मागें फार कोशपर्यंत पळत आल्याचा श्रम सर्व परिहार होऊन हा मुखचंद्र पाहतांच शांत झालो, भाळचंद्रा हीच कारे हंसपालिका? ही जर नसेल, तर माझी प्रतिज्ञा आतां भंग होणार. मघां तुला शपतेनें बोललो, कीं हंसपालिके वांचून लग्न करणार नाहीं. पण ही चारुगात्री पूर्वींच पाहिली असती, तर अशी घातक प्रतिज्ञा कधीच केली नसती. भाळचंद्रा, हीच कारे हंसपालिका? अरे, मी नुक्तीच केलीली प्रतिज्ञा भंग कर्ण्यां कर्तां भिल्लणीच्या रूपानें मातोश्री पार्वतीच खालीं आली काय? अहाहा. अरे, सकाळ पासून दोन प्रहरपर्यंत पळत या वाघा मागे लागलो, पण सहस्त्रावधी तीर फुकट गेले. आणि या मृगनयनेनें क्षणांत एकां तिरानें सहज दोन्ही स्वापदें मारलीं. व: काय पराक्रम!! सांगरे सांग हीच कां ती सुंदरी? भाळचंद्रा, नीट न्याहाळून पहा. बांधा सडपातळ


सा.
प्रेमा.
हंसा.
सो.
गा.

असून सुकुमार पणा किती आहे ? कांती सुवर्णचाप्यास नाहींकां लाजविणार ? अहाहा. एव्हढा मोठा वाघ मारला, भाळचंद्रा हातास फोड आले असतील. आतां कसे करूं ? अरे माझ्या मनास भंग करण्यासच जर हा उपाय योजिला असेल. तर मग इतके श्रम कशाला व्हावे होते ? नुसत्या नेत्राच्याच शरानेंच मी स्वाधीन झालों असतो. हा शस्त्रशर कशाला तिने सोडला ? विखारी स्वापदें मेली आणि मी घायाळ झालों. काय तिव्रशर !!! अरे, त्या शस्त्रशरानें स्वापदांचे प्राणच हरण केले असे नाहीं. माझे मन ही तो घेऊन गेला. आतां काय करूं ? ही एक शब्द तरी या हतभाग्या बरोबर बोलेल काय ? भाळचंद्रा, हीच कां ती मृगलोचना ? अरे काजळी शालू ऐटदार नेसून मागच्या चुन्याचा कसा कसोटा घातला आहे ? कंबर अगोदरच सिंव्हाकृती, आणि त्यांत भरजरी लफ्याचा पदर कसा खुबिनें आडवा बांधला आहे ? अहाहा. केश भाग पाहून विषय समुद्रास भरतें येतें. अरे भाळचंद्रा, केश किती कुटील ? पश्चात् भागीं किती लांब पडलेत ? मला वाटते ही आजच न्हाली असावी. अहाहा. हा आतां सुगंधीक वायु आला, हा तिचाच देहा वरील. व: अष्ट दिशेस जिचा देहाचा सुगंध भरून गेला आहे. वा अरे, अरे भाळचंद्रा, अरे, आतां पहा नीट. इतका वेळ ती पाठमोरी उभी होती. अहाहा. हा खरोखरीच चंद्रोदय झाला कां रे ? ब्रह्मदेवा ! शर्थ झाली तुझ्या कसबाची. अरे, हीला घडविताना तूं फार आनंदांत होतास वाटते ?. अहाहा. चंद्राची तरी

उपमा कशी द्यावी. क्षयरोगी बेटा! अं: भाळचंद्रा, हिच्या सौंदर्यास उपमा तरी कशाची द्यावी? वरून काजळी शालुचा पदर घेतला आहे, तरी तो फारच पातळ असल्यामुळें आंतील काचोळी समग्र दिसती आहे. अहाहा. कोण भाग्यवंत तेथें हस्तस्पर्श करण्यास अवतरला असेल? भाळचंद्रा, कंचुकींत काय लपविलें आहे, ते मी जाऊन विचारूं कां? अरे हातांत तिरकामटा, कास मारलेली, मस्तकावर सुवासीक पुष्पें, इत्यादि थाटानें पुराणांतील भिल्लीणीचें मला वारंवार स्मरण होतें. भाळचंद्रा, हीच कां ती सुहस्यवदना?

भा०—(मनाशीच.) मघांपासून हीच कां हंसपालिका हीच कां हंसपालिका. मला विचारतो आहे, पण आतां शीच सांगूं नये. कारण एकदा हीच हंसपालिका असें सांगितलें तर हा कामव्याप्त झालेला गृहस्थ एकदम् काय प्रकार करील कोण जाणे. ह्मणून जरा धीरसो गंभीरवाकी मला तीनें वोळखिलें असेल यांत संशय नाहीं.

सौं०—भाळचंद्रा, एकदा सांग हीच कां हंसपालिका? जर हीच ती असेल, तर तिला सांग. कीं, मी सांगितलेला सौंदर्यसागर तो हाच. पूर्वींच्या वरून तिची तुझी पक्की वोळख असेलच. तर मग बोल लवकर. हीच कां ती?

भा०—माहराज, हीच असें सांगितलें, आणि तुम्हा विषयीं तिज जवळ शिफारस केली, तर मला गरिबास काय प्रसन्न व्हाल?

सौं०—अरे वेड्या. तुला काय पाहिजे आहे? अरे, हीच जर हंसपालिका असेल, तर मग मला दुसरें कांहीं नको. बाबास राज्यावरून काढिलें कीं, भुवनपाळ राजा आणि

तूं दिवाण. वाटेल तसें राज्य चालवा. शिवाय शेवटपर्यंत तूं सांगशील, तसा मी वागेन. आणि मला तूं सुंदर बायको दिल्याच्या उपकाराबद्दल तुला एक सुंदर स्त्री मी करून देईन. झालें? आणिक काय मागतोस? अरे, मला ह्या प्राणप्रियेपेक्षां दुसरी कोणतीच प्रिय वस्तु नाहीं. राज्य नको, घर नको, फारतर काय एक वेळ हिच्या भेटी करतां हा माझा देह गेला तरी देईन. भाळचंद्रा, सांगरे, सांग. अरे, आतां माझ्यानें दम धरवत नाहीं. प्रियसखीस केव्हां अलिंगन देईन? अहाहा. त्या लाल व नाजुक ओष्टाचें मला चुंबन मिळेल काय? उगीच थट्टेनें, व कामसंचार युक्त या हातानें तें रसरसीत सुंदर गाल धरण्यास सापडतील काय? विषय भरानें भरलेले जे तिचें चंचल नेत्र त्यांच्या संवनेस हा देह पात्र होईल काय? सुवर्ण कांतीतुल्य जें वक्षस्थळ तेथें ह्या क्षुधातूर हस्तांचा प्रवेश होईल काय? सुवासीक केशांचा जो समुदाय तो माझ्या पुष्पयुक्त पलंगावर मनेच्छा विहार करील काय? कोकिले तुल्य स्वरानें "प्राणनाथ" अशी आक्षरें माझे कर्णीं पडतील काय? भाळचंद्रा, इतकी पुण्याई या हतभाग्याची आहे काय? हिच्या सौख्य समुद्रांत सौंदर्यसागर हाच कोणी एक मच्छरूपी होऊन क्रिडा करण्यास इच्छितो, पण तें सर्व तुझ्या हातीं आहे. म्हणून बा भाळचंद्रा, आतां नकोरे अंत पाहूं. अरे, मच्छ निवनावांचून तळमळतो आहे. एकदा दे सौख्य समुद्रांत ढकलून.

(असें म्हणून मुर्च्छीत होतो.)

भा०—हं हं. माहराज? हें काय? आपण असे घाबरे कां होता? अहो हंसपालिका ती हीच. सावध व्हां

ब्रह्मदेवानें ती आपलीच राणी नेमिली आहे. असे असतां अधीर कां होता? (असे ह्मणून नेत्रास पाणी लाऊन व पदरानें वारा घालून सावध करूंलागते.)

हं०—(मनाशीच.) अहाहा. कायगबाई राजबिंडा पुरुष! भाळचंद्रभट बरोबर आहेत, तेव्हां त्यानें सांगितलेला मनमोहन हाच असावा. अरेरे. एकून मन करतां ह्या प्राण्यास येथपर्यंत यावे लागले. वाटेनें ऊन लागल्या मुळें मुख कसें लाल होऊन उतरून गेले आहे. अहाहा. काय बाई रूपाची ठेवण आहे. (मनाशीच.) अगे हंसपालिके, भरजरी मंदील काय ऐटदार बांधला आहे पाहिलासना? कपाळ किती मोठे, भुवया कश्या धनुषाकृती, सरळ नासीक. आहाहा. केशरी गंध घामानें कपाळभर झाले आहे. कानांत पाचेची बिगबाळी असल्यानें उजवा गाल हिरवागार दिसतो आहे पाहिलासना! अहाहा. ओंठ सकुमार असून तांबुलानें कसें लालबुंद दिसतात बरें. नको नको. (अलाबला देऊन.) माझी दृष्ट होईल एखादी. किती खालवर पाहूं. देवा! भाळचंद्रानें सांगितलेला हाच राजपुत्र असला तर बरें. नाहींतर केलीली प्रतिज्ञा व्यर्थ जाईल असे वाटते. जयसुमंगले, प्रतिज्ञा भंग करण्यास हा साक्षांत मदनच पाठविलास काय? अरेरे. मंदनाची कां उपमा मी यास देतें? छिः मदन कांहीं यांचा पेक्षां सुंदर नसेल. मदनाचें संनिधान झाले असतां आंगाचा दाह होतो. आणि प्रियकराचें संनिधान झाले तर दाहशांत होईल. मग मी मुर्खपणानें मदनाची उपमा कशी देते? बरें, हंसपालिके, या सुंदरास आतां विष्णुची उपमा द्यावी.

(पुन: मनाशीच.) च्छि: विष्णुची उपमा तर अगदींच उपयोगीं नाहीं. कारण विष्णु सारखा जारकर्मी पुरुष दुसरा कोणीच नाहीं. पर्वाच्यांच अध्यांयात नाहीं का कृपासागरांनीं कथा सांगितली ? कीं गोकुळांत कृष्णानें किती भंडवाडा केला, आणि शेवटीं कुब्जे बरोबर रत झाला. आणि आजच नाहीं का कथा झाली ? कोण तो दैत्य, काय मेल नांव त्याचं (घोटाळून.) तो जेव्हां मरेना तेव्हां विष्णुनें जाऊन त्याच्या बायकोचें पातिव्रत्य भंग केलें. असा तो विष्णु. आणि त्याची का बरोबरी माझ्या प्राणप्रियास देऊ ? च्छि: मघा पहानां, मला पाहून प्रियकराची कशी अवस्था झाली. बरें झालें, भाळचंद्रानें सावध केले, नाहींतर माझा बाई जीव घाबरून मी जवळ जाणार होतें. अहाहा. सुमंगले, हें रत्न मला लाधेल काय ? हा जर प्रियकर मला देशील, तर तुझे प्रित्यर्थ लक्ष ब्राह्मणास इच्छा भोजन घालीन. सहस्र सुवासिणीस इच्छा वायनें देईन. दहासहस्र दंपत्ये सुवर्णालंकारानी पुजीन. आई जगदंबे, ह्या पुरषाचें दास्यत्व मला देशील काय ? या सुंदराचें अर्धांगीं बसण्यास मी पात्र आहे काय ? [पुन:मनाशीच] अगे हंसपालिके, तूं आपले मनांत मांडे पुष्कळ खातीस, पर ही गोष्ट त्यांनीं पत्करली पाहिजेना ? अरेरे. एव्हढे मात्र कठीण दिसते; कारण त्यांचे स्वरूपास मी शोभणार नाहीं, तेव्हां अंगिकार कसा करतील. अरेरे. आतां काय करूं ? एकूण या राजिवाक्षाचें सुकुमार ओष्टाचें चुंबन मिळणें माझे प्राक्तनीं नाहीं असे वाटतें. आहाहा. या माझ्या कठोर हस्तानें तें आपल्या सुंदर कठांस आलिंगन करूं देतील कां ! मला वाटतें असे व्हावे " प्राण प्रिय-

कराची मी जसी आवडती व्हावें. आणि मग असें कांहीं कारणानें मी त्यांच्यावर रुसावें, आणि मग त्यांनीं मला जवळ घेऊन समजवावे." जगदंबे, हे माझे लाडके हेतु पुरविशील काय? अहाहा. असा सोन्याचा दिवस पाहण्याची या हतभाग्य देहाची पुण्याई आहे कोठें. मग असें होत नाहीं, तर हा देह जगून तरी आतां काय उपयोग आहे?" चला त्या विहिरीवर जाऊ आणि एकदाचें पातून सुटूं. कारण आतां मला दमधरवत नाहीं. पोटांत विशय समुद्रास भरती आली. हा मेला मदन तरी काय? मेल्या मदना, अरे, आह्मी खरोखरी अबला. आह्मा पुढें तूं आपला पराक्रम कां दाखवितोस? सामर्थ्य असेल तर माझे प्रियकरा कडे जा. ह्मणजे माझे ही काम होईल, आणि तुझा ही पुरशार्थ कळेल. अहारे द्वाडा. चल निघ येथून. पुरुशां पेक्षां आह्मालाच अष्टगुणीत कां छळतोस? उभयतास छळशील तर सर्वांचेच काम होईल.

(असे म्हणून मुर्च्छीत होते.)

क्ष०—हं हं. हंसपालिके, हें काय, अशी बेसावध कां झालीस? आणि वेड्या सारखी कां करतेस?

सा०—अहो, पाणी आणा लवकर. वारा घाला वारा घाला. मला वाटते कांहीं तरी झडप झाली असावी. [हंसपालिकेस सावध करतात.]

क्ष०—कायगबाई! एकाएकी अशी कां झालीस?

हं०—कांहीं नाहीं बाई. उगीच झोपेची डुकली बिकली असेल. आणिक कांहीं नाहींग बाई.

क्ष०—आग, तूं जरी चोरलेस तरी मी वोळखले हो. कारण,

आपल्या वरून दुसऱ्याचं ताडावं. खरं कां नाहीं गडे सावित्रे ?

सा०हो. तें खरं बाई. तुमच्यानू माधवाचा जसा पर्वा थाट उडाला, तश्या पैकींच कांहीं हें असेल.

श्रे०—छेग आमचा कशाचा थाट. पण बाई हंसपालिकेचे, आताचे वोळखले कां ? ते समोर बाघाचे मागे दोघे पळत आलेत ते, त्यांत जो शामसुंदर मनमोहन राजबिंडा दिसतो तो ? ह्या करतांच बाई ही आवस्था झाली खरे.

सा०—खरंच गडे आतां वोळखले. अहाहा. ती मुर्तीच तशी आहे. मला वाटते मघाशी तो ही घावरा झाला तो इच्याच करतां.

श्रे०—अग, खऱ्याच रितीनें जर पाहिले. तर या दोघांचें परस्पर प्रेम पाहून मला संतोष झाला. संसारांत दुसरे सुख तें कोणतें ? स्त्री पुरषांची खरी प्रिती असणे हेंच सुख. एकून जोडा अमोल बाई. उभयतांचे हेतु पूर्ण झाले तर केवळ मदन आणि ही रतीच.

सा०—अहाहा. मला तर अगदीं आनंद झाला. ईश्वर करो, आाणि ह्या दोघांचें प्रेम जमो.

श्रे०—हंसपालिके, झाल्या गोष्टी आतां येत नाहींत. परंतु खरेंच सांग ? तुझें मनानें तिकडेच धाव घेतलीना ? एरवी तुमचें प्रेम पाहून आह्माला संतोष झाला. पण एकदा तूं आपलें तोंडानें सांगेनास ?

हं०—तर मग खरेंच सांगूं बाई. मी कांहीं या वेळेस शुध्दीवर नाहीं. माझा देह तुह्माशीं बोलतो आहे, आणि प्राण व मन सर्व ह्या रूपीं गुंतलें आहे कृपा करा आणि आम्हा उभयतांचा गंधर्व विवाह करण्यास तुमची व [कृपासागराची.] वडीलांची पर्वानगी द्या ह्मणजे झालें.

क्षे०—अगे, आह्मीतर आनंदानें रजा देतो, पण तिकडचा पूर्ण विचार समजला कां ? कां तूंच आपले मनांत मांडे खातीस ?

सा०—हो.ते व्हंढा खास विचार काढशील तेव्हांना ?

हं०—खरंच बाई. इतका वेळ मुर्खा प्रमाणेंच तुह्माशीं सारे बोलले. तो कोण ? जात कोण, माझ्या मनांत आहे, तसे त्यांचे मनांत आहे कीं नाहीं. वगैरें कांहींच खुलासा काढला नाहीं. आणि मनांतच गंधर्व विवाह करीत होते. पण बाई आतां कसें करूं ?

क्षे०—अगे हंसपालिके, आह्मी दोघीजणी आतां घरीं जातो, आणि तूं येथेंच क्षणभर एकटी रहा. ह्मणजे तो उत्कंठित झालेला राजपुत्र खचित तुशीं संभाषण करील. खरेंकीं नाहीं बरं सावित्रे ? अग, दोघांच्या प्रेम संकेतांत आतां आपण कशास बसावे ?

सा०—क्षेमावतीबाई, आपण सत्य बोलला. कारण जाय्या अनुभव आहेच.

क्षे०—आहाहा· (मनांत थोडा आनंद व थोडा विरह वाटून ) मलाग बाई कशाचा अनुभव ? कदाचित तुझ्या ध्यानीं मनीं असेल.

सा०—(आपण भाळचंद्रास मोहित झाले, हे क्षेमावतीनें ताडले असें समजून.) क्षेमावतीबाई, सर्वांची एकच वाढ आहे. एक मेकास कांहीं नांव ठेविण्यास नको.

क्षे०—असं. असं वाटेवर ये. चल तर आतां जाऊ. कारण आतां जितकें क्षण आपणास येथून जाण्यास जास्त होतील, तितकी वर्षे हंसपालिकेस होणार आहेत. ह्मणून बाई चलकशी.

सा०—ही पहा मी चालू लागलें. [दोन तीन पावले पुढें

जाऊन पुनः माघारी फिरते.] पण हंसपालिके, [हळूच] अग आपल्याच पोटा वर मात्र नजर देऊं नकोस बरकां?

हं०—(हसून;) नाहींग बाई. मी समजलें. जमले तर लागलीच तुला ही सुखाची अधीकारी करीन. [लाजून.] स्वारी बरोबर जे दुसरें ग्रहस्थ आहेत, ते माझ्या वोळखिचे आहेत. आणि पर्वां मला भेटले होते, तोंपावेतों त्यांचे लग्न ही झाले नव्हते, आणि आतां तरी त्यांचें लक्ष पहा तुजकडेच रोखलें आहे. तेव्हां या सर्व चिन्हावरून परमेश्वर तुझी हीं इच्छा पुरवील. यांत संशय नाहीं.

क्षे०—[तोंड गोरेमोरें करून.] मग काय मीच तेव्हढी राहिलेना? बरं ईश्वर इच्छा.

हं०—अहो क्षेमावती, आपले वडील जें कृपासागर यांचा लोभ मजवर फारच आहे. नेहमी आलिकडे मजवरच फार प्रिती करतात. आणि मी कांहीं एखादे आचाट काम केलें, किंवा चमत्कारिक शिकार वगैरे केली, किंवा मनास आनंद होण्यासारखें शब्द बोलले, तर लागलीच स्वारी प्रसन्न होती आणि कांहीं माग ह्मणून मला नेहमी म्हणती, हें तुम्ही सुद्धा पुष्कळ वेळ पाहिले असेल. तेव्हां बाई अशी आतां कधीं वेळ आली, कीं लागलीच तुम्हाला माधवास देण्याविषयीं वचन घेऊन ठेवतें. म्हणजे झालेना काम?

क्षे०—[लाजून.] तूं बाई मोठी चतूर आहेस. तुझ्या इच्छे प्रमाणें कर. आम्हाला मात्र विसरूं नकोस. कारण बाबा नेहमी म्हणत असतात, हंसपालिका पृथ्वीची स्वामिणी होईल. तर ईश्वर इच्छेनें ऐश्वर्य येवो हीच

आमची इच्छा आहे. पण बाई आम्हाला मात्र विसरूं नको. कां सावित्रे, खरं की खोटं !

मा०—सत्य आहे बाई. चला आतां ईश्वर कृपेनें आपल्या तिघींची ही कल्याणें होतील.

क्षे०—चल बाई. हंसपालिके, आम्ही पुढें जातो घरीं, तूं मागून जलद येहो. [असें म्हणून क्षेमावती व सावित्री निघून जातात.] इतक्यांत.—

भा०—[सौंदर्यसागर स्त्रैण झाला पाहून मनांत.] आतां आपण सौंदर्यसागरा जवळ राहूनये. त्या हंसपालिकेच्या मैत्रिणी कशा सुज्ञ ? त्या लागलीच घरीं चालल्या झाल्या. खरेंच आहे. दोघांत तिसरें असणें निंद्य. व्यर्थ यांच्या प्रिती भाषणास अडथळा कां ? आपण आपलें दूर जावें हें योग्य. [उघड पणें.] सौंदर्यसागरा, मला त्रिषनें फार व्याकुळ केलें आहे. तूं क्षणभर जर येथें बसशील, तर मी आतां पाणी पिऊन येतों.

सौं०—[भाळचंद्राचें जाणे आपल्या पथ्यावर आहे जाणून.] ठिक आहे. भाळचंद्रा, सत्वर प्राशन करूं नये. मी येथेंच बसतों.

भा०—[मनांत] वः काय चमत्कार आहे. माझ्या मुखांतून शब्द निघण्याचा आवकाश. तो लागलेच यानें रजा दिली. एकून स्त्रैण झालेल्या पुरुषास दुसरी कोणतीच वस्तु प्रिय नाहीं. स्त्रिच्या नादी गुंतला, म्हणजे मग त्याला इष्ट नको, पुत्र नको, मित्र नको, धन नको, देह नको, फार तर काय प्राणही नको असे वाटतें. अहाहा. ईश्वरा ! काय व्यर्थ मोहांत हे जग गुंविगलें आहेस. शाबास. अचिंत्य, अविनाश, अक्षयीक, निर्मळ निजशांत, असे जे तुझें ब्रह्मसुख, त्यांहीं पेक्षां हें रतीभर

विषय सुख जास्त केलें आहेस. अरे, बाळपणापासून आमचें अकृत्रीम मित्रत्व आजपर्यंत चालत आलें असतां, आज सौंदर्यसागरास विषय सुखाचा भास झाल्या बरोबर त्यानें माझी आशा सोडून दिली. अरेरे. आजपर्यंत चाललेल्या मित्रत्वाचा आज आभास झाला काय ? या पेक्षां पूर्वींच मी दूर वास केला असता तर हा त्रास आ_ तां झाला नसतां. असो. आपण हें विचार मनांत आ_ णून उपयोग नाहीं. आपल्याकडून मित्रत्वांत अंतर आणूं नये. कारण आपणच त्याला येथपर्यंत आणलें, आणि हंसपालिकेची गाठ घालून दिली, तेव्हां हें विचार व्यर्थ मनांत आणणें उपयोग नाहीं. अरे, विश्वामित्रा सारखें तपोनिष्ट ऋषी आपल्या अमोल तपभांडारांस ला- त मारून, उर्वशीस पाहतांच पूर्ण क्षीण झाले. मग या सौंदर्यसागराची कथा काय ? आणि मित्रत्वाची यो- ग्यता विसरला ह्मणून आश्चर्य काय ? असो. त्याच्या- कडे तरी दोष लाववत नाहीं. कारण खरें जेथें रूप, गुण, यौवन आणि प्रेमदृष्टी परस्पर झाली, तेथें दुसरें कोणतेच भान रहात नाहीं. फार कशाला, हंस- पालिकेला पाहून पुरुष मनमोहीत होईलच, पण ती दुसरी एक कोणी हंसपालिके बरोबर होती, आणि तिनें साधारण दृष्टया, मजकडे नेत्र काटाक्षानें पाहिलें, तेव्हां माझीच काय अवस्था झाली बरें ? साधारण तरुण स्त्रिस पाहून जर मनमोहीत होतें. तर उत्तमोत्तम स्त्रीयेस पाहून कोणता पुरुष मोह पावणार नाहीं बरें ? तस्मांत स्त्री पुरुषांच्या प्रितीपेक्षां जगतांत दुसरी कोणतीच मोल- वान वस्तु नाहीं. यांत संशय नको. पहा, ज्या प्रा- णाचें मोल होत नाहीं. तो प्राण खऱ्या स्त्रिच्या प्रिती

करतां सहस्त्रावधी मनुष्यांनीं दिलें आहेत, आणि देह ही आहेत. तस्मांत स्त्री ही सकल मोहक वस्तूंत श्रेष्ट खरीं. असो आतां आपण चालते व्हावे. (उघडपणें) सौंदर्यसागरा, जातो मी. सोय झाल्यास तुला ही सुंदर पाणी आणीन.

सौं०—अरे, आजून आहेसच कां ? मी समजलो गेलास. अरे, जाणे असेल तर जालवकर.

भा०—(मनांत.) काय पहा. मी केव्हां जाईन, असें यास झाले. असो. (असें ह्मणून भाळचंद्र निघून जातो.) नंतर—

सौं०—अहाहा. ठिक झालें, काय ईश्वरी चमत्कार ! कोणती ही गोष्ट घडून येणें असली ह्मणजे अशी जमून येते. पहा, हंसपालिके जवळ येकांत असावा असे मला वाटल्या बरोबर ईश्वर कृपेनें लागलीच त्या दोघीं तिच्या सोबातिणी निघून गेल्या. बरें, भाळचंद्र जवळ होता, त्याला कां त्रिषा लागूनये ? तस्मात ईश्वरीलिला आगाध आहे. असो. आतां कसें करावें. आपण बिन निमित्यानें तिच्या जवळ तरी कसें जावें ? (विचार करून.) अं: त्यांत काय आहे. (मनाशीच.) अरे सौंदर्यसागरा, असें कर. आंगावरील भरजरी शेला आहे कीं नाहीं ? तो जरा अगदीं हाताच्या पुढें घोळ करून आण. आणि त्या घाईंतच शेला उडून जाईल असा सपाऱ्याने तीर सोड. ह्मणजे झालें काम. मग शेला आणावयाच्या निमित्यानें तिज जवळ जाण्यास काय हरकत आहे. शेला मात्र नेमका तिच्या जवळ पडला पाहिजे. (टाळी वाजऊन.) वः झालें काम. खाशी युक्ती सुचली. हा पहा आणला शेला हतावर. (असे ह्मणून शेल्यास-

हीत तीर हंसपालिके जवळ सोडतो.) (उघडपणे.) अरे शेला उडाला ! ! (इकडे तिकडे दाटूनच पाहतो.) वः इतका लांब गेला कां? (आणावयास हंसपालिके जवळ जातो.) नंतर—

हं०—वः काय परमेश्वर सातीदार आहे. [मनांत] प्रियकराशीं प्रथमता आपण होऊन कसे बोलावें या विचारांत होतें. तो आपोआप शेला जवळ आला. आतां ठीक झालें. शेला उचलून आपल्या जवळ घ्यावा. ह्मणजे मग तर तिकडूनच बोलणे होईल कीं नाहीं? [शेला उचलूं लागते.] पुनः मनाशीच. नकोग बाई ! शेला उचलून घेतला, आणि तिकडून कां उचलीला असें बोलणें आलें तर? मग काय उत्तर द्यावें. [पुनः मनाशीच.] अगे, उत्तर कशास व्हावें. तसाच प्रसंग आला तर घट्ट पाय धरूं ह्मणजे झालें. मग तर तिकडचा राग जाईलना? [असें म्हणून शेला उचलून घेते].

सौं०—[शेला उचलून घेतला पाहून.] अहाहा. शेल्या, धन्य भाग्य तुझें. अरे, आतां तुला जगतांत भितीच राहिली नाहीं. कारण समर्थानें हतीं धरलें.

हं०—[हें बोलणें आपल्यासच लावून आलें असें जाणून.] शेल्या तूं समजत असशील कीं, मी आतां निर्भय झालों पण नाहींरे नाहीं. अरे, सबलाची वास्तु अबला जर हतीं धरील, तर ती प्रबला होईल काय? नाहीं. तर शेल्या तुला जो निर्भय पणा झाला असेल तो व्यर्थ आहे.

सौं०—(मनांतच.) अहाहा. काय भाषण चातुर्य आहे. उत्तर कसें मिळालें. या पुढें आतां मी काय बोलावें

असो, मुकाट्यानें राहून उपयोग नाहीं. लागलीच आपल्या चातुर्याची परिक्षा होईल. तर ही कुंटीत होई-पर्यंत आतां बोललेच पाहिजे. [उघडपणे] शेल्या तूं भिऊ नकोस. कारण ज्यांनीं तुला हतीं धरले आहे, त्याचें योग्यतेचा विचार कर. म्हणजे तूं निर्भय होशील. तूं समजत असशील, कीं ज्यानें मला हतीं धरलें तो अ-बल आहे. आणि पूर्वी आपण ज्या जवळ होतो तो चक्रवर्ती सबल आहे. पण तसें नव्हें हो. पूर्वींचा तुझा आश्रय जरी चक्रवर्ती सबल आहे, तरी उपयोग काय ? कारण चक्रवर्ती ह्मणजे सार्वभौम राजा. त्याला जरी अन्यत्र पृथ्वी वरील सर्व मांडलीक राजे करभार देतात, तरी त्याला ही त्याच्या वर्चश्व गृहस्थास कर-भार द्यावा लागतो. ह्मणजे स्त्रीयेस. तेव्हां अर्थात चक्रवर्ती सार्वभौम राजा पेक्षां ही स्त्रीयांची योग्यता जास्त होते. ह्मणून शेल्या, प्रस्तुत जो तुला आश्रय मिळाला आहे. तो स्त्री जातीचा आहे. आणि पूर्वीं-चा जरी चक्रवर्ती होता, तरी तो गौणच होता. या करतां स्वस्थ मनानें रहा.

६०.–[मनांत] अहाहा. काय स्त्री जातीला शिखरीं नेऊन बसविले. आणि त्या बोलण्यांत आपण चक्रवर्ती राज पुत्र आहोत असें सुचविलें. शाबास. या पुढें आतां काय बोलूं ? पण मला वाटतें अशा चतुर पुरुषांबरोबर पुष्कळ बोलून घ्यावे. आणि कदाचित् तिकडें कुंटीत झालें तर बरेंच झाले. [उघड पणानें.] शेल्या, तु-झा विचार तूंच कर. मी सांगावें असें नाहीं. अरे, पूर्वींच्या तुझ्या मालकानें मनावर धरलें तर तुला परत आ-पल्या जवळ घेईल. मग तुझ्या हल्लीच्या आश्रया क-

डून तुझें साध्य होणार नाहीं. कारण तिकडे पराक्रमच तसा आहे.

सौं०—शेल्या, या बोलण्याला तूं भिऊं नकोस. कारण भुंग्याचें सामर्थ्य कसें असतें तुला माहित असेलच. कीं मोठमोठीं हत्तिच्या शरिरा एव्हढालीं खंबीर लांकडाचीं खोडें क्षणांत क्षीण करून टाकितो. पण कमलांत जर अडकून राहिला, तर तेथें मात्र त्याच्या पराक्रमाचें पाणी होऊन जातें. कारण तेथें मोहांत घोटाळून प्रितीपाशांत गर्क होऊन जातो. तसें, जरी तुझ्या पूर्वींच्या मालकांत मोठा पराक्रम आहे, तरी तो कोठें ? इतर ठिकाणीं. तुझ्या प्रस्तुतच्या आश्रया जवळ पाणीच. कारण प्रितीपाशांमुळें.

हं०—(मनांत.) वः ह्या बोलण्यांत तर खूपच ठेऊन दिली. ह्मणजे माझ्या ठिकाणीं प्रीति जडली आहे. हें तिकडून सुचविलें. आतां ? आतां काय बोलावें ? (पुनः) हो. मी हटतें कीं काय ? [उघडपणें.] शेल्या, फसशीलरे फसशील. अरे, भुंग्याजवळ एकच शस्त्र असल्या कारणानें त्याचें कमलनी जवळ कांहीं बळ चालत नाहीं. परंतु पूर्वींच्या तुझ्या मालका जवळ किती शस्त्रें आहेत, विचार केलास कां ? अरे, एक सौंदर्यशस्त्र, दुसरें सहस्त्रावधी सद्गुण भरलेत, तें एक प्रबल शस्त्र. तिसरें प्रियभाषण—किती तिक्ष्ण शस्त्र बरें. आणि याहीं पेक्षां प्रबळ आहे एक, त्याचें नांव सांगूं कां शेल्या तुला ? अरे, चवथें काम शस्त्र. इतकीं शस्त्रें तिकडे आहेत. त्या योगानें, तूं प्रस्तुत ज्याचा आश्रय केला आहेस. तो क्षणांत बलहीन होऊन कामशस्त्राच्या स्वाधीन होईल. आणि तुझ्या पूर्वींच्याच आश्रया-

चा जय होईल. तेव्हां मग निमुटपणें त्यांच्याकडे जाण्यापेक्षां आतांच हा निर्बल आश्रय सोडून तिकडेस जा.

सौं०—शेल्या, तूं असा वरकांती दुसऱ्याचें बोलण्यावर विश्वा ठेऊं नकोस. पूर्ण विचारकर. अरे, शस्त्रें कोणाकडे जास्त आहेत सांगूं कां ? पहा तूं आहेस तिकडे सौंदर्य शस्त्र तर आहेच. सदगुण शस्त्र आहेच. तसीच प्रिय भाषणादि शस्त्रें आहेतच. झालें, इकडे आधीक काय काम शस्त्र ? त्याचें शांती शस्त्र तिकडे आहेच. ह्मणजे काम शांती शस्त्र तिकडें आहे. तें आह्माकडें नाहीं.

हं०—(मनाशीच.) आग वाई ! आतां वरीक शर्थ झाली. आतां पुढें काय बोलावे. हो पण मी ऐकतें कीं काय ? [उघडपणें.] शेल्या, शस्त्रें जवळ पुष्कळ आहेत आणि शस्त्रें बाळगणाराला जर त्याचा अभीमान नाहीं, तर मग शस्त्रें असून उपयोग काय ? प्रस्तुत तूं आहेस इकडे कांहीं शस्त्राचा अभीमान नाहीं हो. तर जिकडे आभीमान असेल तिकडे तूं जा.

सौं०—शेल्या, तुझ्या पहिल्या आश्रयास जर आभीमान असतां तर अगांतुक पणानें तुला दुसऱ्याच्या कडेस कां पाठविला असतां ? अरे, तुला पुढें पाठविण्याचें कारण इतकेंच कीं, तुझी सोय पूर्वीं झाली, कीं मागून तुझ्या धन्याची.

हं०—[मनांत.] मजकडे लक्षपूर्ण असल्यामुळेंच निमित्याला शेला मजकडे उडाविला. आतां उगीच आडून आडून गोळ्यां कां माराव्यांत. एकदा मनाचा हिय्या करून समक्षच बोलणें बोलावे. (उघडपणें.) शेल्या, असा अगांतुकीच करण्यास आलास मग लाजतोस कां ? आ-

णि बोलण्यांत मध्यस्ती कां ? अभीमानच सोडला मग आतां हरकत कोणती ?

सौं०—शेल्या, तुझी माझी कथा काय ? अरे, देवा दिकांनी सुध्दां स्त्रिया पुढें हात टेंकिले. ह्मणजे पार्वतीनें भिल्लिणीचें रूप घेतलें तेव्हां माहदेव हीं तिज करतां भ्रमिष्ट झाले. हें तुला माहित असेलच. तसेच भस्मासुरा सारखें पृथ्वी जिंक ही मोहनीला वश होऊन अभिमान विसरले. मग तुझी माझी कथा काय ? (मनांत.) थोडी गम्मत करावी. [उघडपणे.] असो. शेल्या, इतकें अमर्याद बोलणें हवे कशास आपल्याला. चल आपण जाऊं. हा पहा मी चाललो. चल तुला येणे असेल तर. [असे ह्मणून सौंदर्यसागर जाऊं लागला.]

हं०—आगबाई ! कायगबाई बोलले. आग लागो माझ्या बोलण्याला. [तोंडांत मारून घेते.] मेले टवळें जिभे, सटव्ये कायग आक्षरं बोललीस. अरेरे. प्राणनाथास राग येऊन जाऊं लागलेना ? आतां काय करूं ! [रडूं लागते.] हाका मारते,——आहो चक्रवर्ती, आहो, पृथ्वापिती, आहो, आहो, आहो प्राणनाथ. आहो. या अनाथ दुबळीला किंचीत भाषणांमृत पाजून अर्धमृत नका हो टाकून जाऊं. आहो मी बोललेकीं प्राणनाथ हीं अक्षरें श्रवण करून पाय कसा पुढें पडतो हो. मजकडून चुकी झाली प्राणनाथ. नका हो नका जाऊं. तुह्मास माझ्या सुमंगलेची शपत आहे. या उपरांत पाय पुढें टाकालतर हे प्राण राहत नाहींत. माहराज [हात जोडून.] मुर्ख दुर्बळ मी स्त्री जात, आणि थट्टेनें भाषण केलेले आपण मनावर घेता काय ? नाहीं हो नाहीं. मी आपणास अपमानानें नाहीं भाषण केलें;

या गरिब दुर्बळ स्त्रिस पेटलेल्या कामाग्नींत नका हो टाकून जाऊ. आहो कृपा मेघाची वृष्टी करा. मीनास जर जल सोडूं लागलें, तर त्यांनीं कोणास शरण जावें. सरितेस सागर उपेक्षूं लागला तर तिची वाट काय? माहराज सुकुमार केळीवर वज्रपात झाला तर तिची कशी दशा होईल. आहो, भाळचंद्रभटानें आपली मुर्ती ध्यानीं भरविल्या पासून ह्या मनास आपला ध्यास लागला. आणि आतां किंचीत सुखाचा भास दाखऊन सर्व आभास करतां काय? आपल्या पाया खेरीज म्यां आस कोणाची करावी? प्राणनाथ नकाहो नका जाऊ. आपण ऐकत नाहींना? मी जाऊं देणार नाहीं. [असें ह्मणून सौंदर्य सागराचे मागें पळते. इतक्यांत ठेंच लागून खालीं पडते.]

सौं०–[पुढें पळतांपळतां मागें काय पडलें ह्मणून पाहतो.] हायहाय. प्राणप्रिया पडली काय? अरेरे. मी दुष्ट!! देवा? मज सारखा पाषाण ह्दिई कोणी असेल कां? शिव! शिव. चांडाळा पेक्षां ही माझें मन कसें कठोर झालें? ही कोणी बुध्धी सांगितली. (तोंडांत मारून घेतो.) अरे राम! राम! राम! मी अभागी खरा. किती सायासे करून ह्या रत्नाची भेट झाली? मी कृतघ्न खरा. माझ्या प्राणप्रियेस दु:खाब्धींत मी टाकिलें. हर! हर! आतां माझी वाट काय? या दुष्टाला पुन: प्रेमदृष्टीं पाहील काय? अरेरे. आतां पुन: प्रीतिचें नांव कशास!! आतां कसें करूं? [असें ह्मणून तिला उठऊं लागतो व सावध करूं लागतो.] प्राणप्रिये, एक वार दृष्टी उघडून या चांडाळा कडे अवलोकन तरी कर. आतां पुन: असा निर्दयपणा कधीं

करणार नाहीं. आणि मी तरी खरोखरीच रोषानें तुला सोडून जात नव्हतो. सखे, विनोद तुला समजेना कां? हा वेडे. ऊठ. हें काय असें. एकदा बोल बरें. मी विचारतों तेव्हढें सांग.

हं०—[हळुच व किंचीत नेत्र उघडून.] आतां कशाला पणयणंझालं? नाहिं तर नाहीं. मनांत मसले तर दुस ऱ्याच्या आग्रहानें कां कोणती गोष्ट होते?

सौं०—प्राणप्रियें, तुजकडे प्रीति लक्ष नसतें तर श्रृंगारपुरी सोडुन इकडे पांचशे कोश कां आलो असतो? दुसरें कांहींच कारण नाहीं. उठ. आणि तुझ्या मनांतील हेतु उघडपणें सांग. परमेश्वर मनोरथ पूर्ण करील.

हं०—अहाहा. प्राणप्रिया. सर्वत्रास प्रकाश देणारा जो दीप तो स्नेहा वाचून क्षीण होतो, तव्दत मला झालें होतें. आतां तुमच्या स्नेह रूप भावणानें माझा दीपरूप प्राण क्षीण झालेला पुन: टवटवीत झाला. माहराज तोच प्राण मी आपणास आपर्ण करते. त्याचें संरक्षण करा.

सौं०—प्राणसखे, तुझ्या दीपरूप प्राणां भोंवतीं शेकडो पतंग रूपीं प्राण घिरट्या घालीत होते, परंतु सुदैवानें आज ह्या प्राणाची आणि तुझ्या प्राणाची मैत्रिकी झाली. आतां पुढें विचार काय करणें हें मात्र कळलें पाहिजे. हे माझे बाहू तुझ्या मनवेधक देहास आलिंगन देण्यास घाबरे झालेत, परंतु अनितीनें अलिंगन काय उपयोगी! जेणें करून अक्षय सुख मिळेल तो रस्ता धरावा.

हं०—माहराज, काया वाचा मनानें हें शरीर व प्राण आपणास आपर्ण केलें आहे. आतां विषीत झालेल्या चातकांस अंत नपाहतां एकदा कृपामेघ व्हा. माहराज, नकाहो नका. आतां मजविषयीं दुजाभाव धरूं नका. सर्व

साक्षी सुर्यनारायण व मातोश्री धरत्री हें माझे साक्षीदार. या देखत मी आपली सत्य सत्य राणी झाली आहे. आ. तां अंतर नका देऊं. प्राणप्रिया, या वेळेस जर माझी आई आणि बाबा जिवंत असते; तर प्रियकरा, आपणास पाहून त्यांनां किती सुख झालं असतें. माझे मनांतून विवाह सुख त्यांनीं पहावें असें फार होतें. परंतु उपाय काय? मज आभाग्याचें नसिबीं ते सुख कोठें आहे. [मोठ्यानें हुंदका येउन.] असो आतां जिवलगा, ही दीन झालेली निराश्रीत दासी इचा आंगीकार करा. आणि निरंतर पायाजवळ रक्षण करा.

सों०—[आलिंगन देऊन]—प्रिये, नको रडूं.—परमेश्वर तुझे सर्व हेतु पूर्ण करील. तुझ्या मनांतून आईबापांसमक्ष सोहळा व्हावा असे आहे, तर ऊदईक ईश्वर तसाच दिवस दृष्टी पाडील. सखे तूं शोक करूं नको. भुवनपाल व भुवनसुंदरी खुशाल आहेत.

हं०—(आनंदानें) प्राणनाथ, सत्य काहो? (कंठास मिठी घालून) असे होईल तर माझा आनंद पृथ्वींत माणार नाहीं. तुमची त्यांची भेट झाली काय?

सों०—सखे, शृगांरपुरींत सिंव्हबल प्रधानानें, व चंद्रकांता [माझा बाप] नें दुल्यारामोड्याशी संकेत करून त्यास इकडे पाठविला. सिंव्हबलानें तुज विषयीं फारफार युक्त्या दुल्यास सांगितल्या होत्या; असो. दुल्या इकडे येण्यास निघाला तेव्हां मला चैन पडेना. आणि त्या पूर्वी भाळचंद्र—काशीहून आला तेव्हां ह्या [हनवटीला धरून] जीवाची तारीफ त्यानें सांगितलीच होती. दुल्या इकडे येऊन भुवनपालाचा वगैरे दोघांचा घात करून तुला सिंव्हबलाचे स्वाधीन करणार. हें मला सहन नहोऊन मी

लागलेच भाळचंद्रासहीत प्रेमसागर बरोबर घेऊन व आणिक कांहीं लोकांसहीत या वनाचे उत्तरेस येऊन पोहचलों. पवनगंगेचे काठीं सुंदर रम्य स्थळीं उतरल्या वर, रात्रौ एसवा ह्मणून रामोश्याचा रडण्याचा स्वर ऐकूं येऊलागला. मी आपल्या माणसा कडून तपास करून त्यास धरून आणविले. त्यानें आजरात्रीं माझा धनी भुवनपाळ काळूबाईस बळी देणार व हंसपालिका दुस्यानें व सहव्यांनीं धरून नेली. वगैरे सर्व मजकूर सांगितला. आह्मी लागलीच तयार हत्यारानिशीं काळूबाईच्या देवळाशीं जाऊन छपून बसलों. ज्यावेळीं त्या दुष्ट खंडवानें भुवनपालास व तुझ्या आईस देवी जवळ वाकविले, त्यावेळीं काय तो प्रसंग सांगावा ! ! असो, लागलींच सर्वांचा घात करून भुवनपालास व तुझ्या आईस त्या दुष्टरामोश्या कडून सोडविलें. सखे, त्यांच्या बदला त्या दुष्ट रामोश्यासच बळी दिलें. ही गोष्ट कालच झाली. भुवनपाल व तुझी आई हल्लीं माझे छावणींतच आहेत. आज सकाळीं भाळचंद्र व मी तुझ्या शोधास शिकारीच्या निमित्यानें आलों. तो हीच तुझी भेट झाली.

हं०—आहाहा! प्राणनाथ, किती मला आनंद झाला. आतां मी आपली हकीकत सांगतें. आह्मी सर्वजण येथून पश्चमेस एक दाट झाडी आहे तेथें पर्णकुटींत बरेंच दिवस राहत होतों. तेथें मला सोबत कायती रामोश्यांची मुलीची व भिल्लांच्या पोरीची. त्यांच्या बरोबर तीर मारणें वगैरें शूरांच्या कामांत मी बरीच प्रवीण झाले. वाघ, आस्वले वगैरें हिंसक पशुंच्या झुंडी रोज मारून रास पाडीत असे. मला बरेंच समजूं लागलें तेव्हां माझ्या आईनें मला लिहीण्यास व वाचण्यास शिकविलें. या शिवाय

शिवणकाम व कशिदा काढणें, रांगोळ्या घालणें; चित्रें काढणें वगैरे बऱ्याच विद्या मला शिकविल्या. आमच्या आसपास रामोश्यांची पुष्कळ वस्ती; ह्मणजे पर्णकुटी पासून चार पांच कोसांच्या अंतरानें सर्व रामोश्यांची व भिल्लांचींच खेडी. त्यामुळें बहुतेक भिल्लांचा व रामोश्यांचा माझ्या बाबाशीं स्नेह झाला. त्या नंतर पुढें कांहीं विचार करणे होता. तो दुल्यानें श्रृंगारपुरीस जाऊन चाहडी केली. सर्व रामोश्या पेक्षां एसबाचा आमचा फार लोभ जमला होता. असो, ईश्वर कृपेनें त्यास सुबुद्धी होऊन त्यानें तुह्मास वर्तमान कळविलें. नाहीं तर बाबा व आई आज जिवंत राहिली असती काय ? (डोळ्यांत पाणी आणून.) पण माहराज, तो एसबा जिवत आहेना? की त्यालांही बळी दिलात.

सौ०—हे वेडे. ज्यानें इतका उपकार केला त्याला कां शिक्षा करीन. त्याला माझे खाजगी तैनातीस पंचवीस रुपये पगार करून ठेविला. शीवाय त्याचे विश्वासू पणा बद्दल त्यास दोन हजाराचें कडे दिले. सखे, मग पुढें काय झालें, ती हकिकत एकदा सांग.

हं०—मग पुढें काय ? त्या दुल्यानें वाटते चाहडी करून हा गोंधळ केला. आह्मी सर्व निजलों असतां येकदंम हल्ला करून बाबास व आईस बळी द्यायचे ह्मणून नेले. आणि मला दुल्या व सटव्यानी बांधून प्रधाना कडे न्यायचें ह्मणून एका झाडींत. नेले. दुसरे दिवशीं उजडल्यावर, त्या दोघाच्याही मज विषयीं पाप बुध्या होऊन आपआपसांत गुलाम. ठार मेले गेले. पुढें मी मोकळी होऊन या अरण्यांत दीन वदनानें हिंडत

होते, इतक्यांत कृपासागर ऋषीची कन्या क्षेमावती व सावित्री सहज वनांत आल्या होत्या त्यांची माझी भेट होऊन त्यांनीं मला कृपासागर माहराजांचें पायावर नेऊन घातले. त्यांनीं " तूं माझी दुसरी कन्याच आहेस." असे ह्मणून आज पर्यंत पाळण केलें. आज सहज आह्मी येथें आलो तो आपले दर्शन झाले. माहराज, बाबास व आईस दुष्टानी बांधून बळी देण्यास नेले, त्यास बरेंच दिवस झालें. आणि आपण काल बळी देत होते सांगतां हे कसें ?

मों०—सर्व, एसवाच्या सांगण्या वरून समजलें कीं, त्यानीं बरेंच दिवस पुढें काळु वाईच्या जत्रेचा दिवस येण्याची वाट पाहिली. काल त्यांचा जत्रेचा दिवस होतां. परंतु काळुबाईनें त्यांचीच उलटी जत्रा केली.

हं०—एकुण ईश्वर तारि त्याला माणुस काय मारी ? आहाह. परमेश्वराची लिला आगाध आहे. असो आतां महाराज, आपण आपले छावणींत जाऊन सर्वत्र मंडळी सुध्धा उदईक कृपासागरांचें आश्रमांत यावें. मी जाऊन झालेला सर्व प्रकार त्यांना कळविते: ह्मणजे आनंदानें आपल्या उभयतांचा लग्न सोहळा होईल. शिवाय सर्वत्रांच्या परस्पर भेटीही होतील. याप्रमाणें सर्व आनंदी आनंद होईल. खेरीज तुमचा स्नेही भाळचंद्र यानी मला हें पाय दाखविले व आपणास येथपर्यंत आणून माझे आई बापास वांचविलें. तेव्हां त्याच्याकरतांही एक सुंदर नवरी पाहून ठेविली आहे. व कृपासागर माहराजांची कन्या क्षेमावती तिचे ही लग्न होणे आहे. तेव्हां ही तिन्ही लग्नें एका मांडवांत होण्याची तयारी मी करते. आतां जाऊन कृपासागरांचें बळक-

ट पाय धरते. ह्मणजे सर्व आनंद होईल. आपण सर्व खटल्यासुद्धा तेथें यावे. मी जाते. (असे ह्मणून जाऊ लागते.)

सौं०—ठीक आहे. प्रियसखे, फार आनंद झाला. मी जाऊन भुवनपाल व तुझ्या आईसहवर्तमान उद्या हजर होतो. पण आतां ऊद्यां पर्यंत तुझा विरह मला कसा सहन होईल ?

हं०—प्राणनाथ, मलाही तेंच दुःख आहे. परंतु उद्या हो-णाऱ्या अक्षय सुखाकडे लक्ष देऊन व त्या आनंदात हें विरह दुःख कसें तरीं विसरेन असें समजून मी ही मनांचा धडाकेला आहे. महाराज, आपण ही कसा तरी धडा करा.

सौं०—ठीक आहे. सुंदरी हा मी चालला पहा. पण हो, आजून भाळचंद्र पाणी पिऊन नाहीं आला. अरे हो. बरेच झाले. तो पहा आला. (इतक्यांत भाळचंद्र पाणी घेऊन येतो.)

सौं०—(पाणी पिऊन) आलास बाबा. चल आतां किती वेळ तुझी वाट पाहत आहे.

भा०—ते ठिकच आहे. मनांतून तर असे ह्मणत असाल कीं, हा इतक्यांत कोणी कडून आला, पण हें बोलणें उ-गीच वरकांती.

सौं०—नाहींरे नाहीं. तसें कांहीं नाहीं. काय गम्मत झा-ली ती चल सांगतो वाटेने. असें ह्मणून सौंदर्यसागर व भाळचंद्र निघून जातात. व हंसपालिका ही आश्र-मांत जाते.)

(पडदा पडतो.)

[ पडद्या बाहेर. ]

वि०—सुत्रधार, वः येकूण खुप आप्पल पोटे दिसतां तुह्मी एव्हढ्या करतां कां रात्रभर जागविलें आह्माला? असा विश्वास घात करणे हे बरोबर नाहीं. एखाद्याला प्रथम आशा कशाला लावावी? मी रूसलों आतां. हा पहा आतां जातों. [ह्मणून जाऊं लागतो].

सू०—[त्याला धरून]. कां चाललास कां? आह्मी काय आप्पल पोटेपणा केला, आणि विश्वासघात कोणता केला.

वि०—आहो, हंसपालिका शेवट दवडलीत कीं नाहीं आमच्या हातची? असाहा विदुषकपंत फाकडा (मिशावरून हात फिरऊन.) असून त्या चिटक्यानें कां हंसपालिका आपलिशीं करावी? बरें, ती नाहीं तर ती दुसरी तरी? ती नाहीं तर तीसरी तरी? सर्वच नवऱ्या ठरल्या गेल्या, आतां आह्मी काय करावें. रात्र भर जागून तुह्माला मदत केली. पण एखादीं नवरी तर जुळऊन द्यायची होती? जो तो आपलें हित पाहतो, माझें कोण पाहील. मी आतां रुसून बसतों. नाहीं तर तुह्मी व्हा आमची नवरी.

सौ०—वः येकूण मजवर आहेस कां राजी? अरे, हें नाटक होईपर्यंत तुझें माझें येथें लग्नच लागलें आहे. मग त्यांत आधीक तें कोणतें? असो. पण आतां एकदा शृंगारपुरीतील हलहावाल पाहण्यास येतोस कां?

वि०—हो. तुमचें आमचें लग्नच लागलें आहे. मग विरह दुःख कसें सहन होईल. जिकडे तुह्मी तिकडे मी पण काहो? आतां विश्रांत वनांतून थेट शृंगारपुरी जायचेना? मग आमचे पाय कसे चालतील.

सू०—अरे, नसले चालत तुझे पाय, तर मी सर्व प्रकार येथेंच करून दाखवितों.

वि०—ठीक, मग तर उत्तमच झालें. चला आटपा लवकर.

सू०—ठीक आहे. आतां कंटाळूं नकोस. आगदीं थोडे राहिले आहे. (असे ह्मणून निघून जातात.)

---

## प्रवेश २

### स्थळ

चंद्रकांताचें मंदीर.

### पात्रें.

चंद्रकांत ........................ शृंगारपुरीचा राजा.
गगबा ........ ............... विश्वासू हुजऱ्या.

चं०—अरे गण्या इकडे येरे लवकर. चलचल धाव जल्द.

ग०—जी सरकार. ह्योच आलो बगा. आलो, आलो. [जवळ येऊन] आज्ञा सरकार.

चं०—अरे, आज मोठा कठीण प्रसंग दिसतो आहे. आतां कसें करूं? गगबा, एकून कोणी नव्हे कुणाचे, सर्व व्यर्थ आहे. "घर फिरलें, ह्मणजे घराचें वासे फिरतात." ही म्हण खोटी नव्हे. गगबा, आतां जिवा भावास विश्वासू काय तो तूं आहेस.

ग०—(हात जोडून.) माहराज, परसंग परसंग काय म्हंताया. आन् वखतबी लय कठीन आला म्हंताया. मी कांहीं उमगलों नाहीं म्हाराज.

चं०—अरे प्रसंग काय विचारतोस, या तोंडानें आतां काय सांगूं शीव! शीव! शीव! [उसासा टाकून] गगबा, या राज्याचा आणि सुखाचा काय तो एक घटकाभर मी आतां धनी आहें. एक घटकेनें सर्व अस्त होऊन मी जमीन दोस्त होणार आहें. अरेरे. दुष्टानें सर्वच फस्त केलें काय? अरे. याचा विचार मीं पूर्वीं केला नाहीं.

दुष्ट लोकांच्या सांगण्यावरून व त्यांच्या नादीं लागून मी हवी तसी वाईट कामें केलीं. आणि आतां शेवट प्रसंगीं मी !! अरेरे. [डोळ्यांत पाणी येऊन]. गण-वा, आतां मी काय करूं ? अरे, या वेळेस मला प्रसंगीं कोण उपयोगीं पडेल ? आणि ईश्वर तरी कशी कोणास बुध्दी देईल. आज पर्यंत कधी ईश्वराचें भय स्वप्नीं सुध्दा वाळगिलें नाहीं. आतां ईश्वर पावेल काय ! मी किती पापी ! मज सारखा दुष्ट, चांडाळ, आधम, विश्वा-सघातकी, कृतघ्न या जगतांत कोणी नसेल. देवा ! सर्व पाप्यांचा राजा मी. माझें कोण रक्षण करील ? प्रभो ! चुकलो मी. आपराधी आहे, सहस्त्र आपराधी आहे. आता या दिनावर करुणा मेघ सोड. हे दि-नदयाळ, काय तुझा माया जाल ! अरे, हाच पश्चताप पूर्वीं दिला असतास तर ? अरे राम ! राम ! राम ! आतां माझी वाट काय ? मी जन्मास येऊन काय केलें ? राज्यावर असतां एखाद्या गरिबांचे जन्माचें कल्याण केले नाहीं. व ब्राम्हणास कधी दान ! किंवा वावभर जमीन ? माझे हातून झाले नाहीं. प्रजा जनाचें संरक्ष-ण केलें नाहीं. बहुत करून यथा न्याय कोणास मि-ळाला नाहींच. नेहमी खऱ्याचें खोटें आणि खोटयाचें खरें लाच घेऊन करीत गेलो. गोर गुरिबावर जुलूम केले. सर्व आश्रितांच्या, व शहरांतील संभावितांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या. हर ! हर ! सर्व लोकांचें दात मजवर. आतां काय करूं ? (तोंडांत मारून घेतो.) असो, या सिंव्हवळाचें नादीं लागून इतका घात झाला. नाहींतर पूर्वीं मी आपलें थोडक्याशा राज्यांत चांगला सुखी होतो ` प्रजेशी वर अतून नितीनें वागत हो·

तों. परंतु या सिव्हबलाचें भरीं पडून बिच्याऱ्या भुवन पालावर हल्ला केला. बरें असो. पुढें कसा तरी ई-श्वर कृपेनें जय झाला. मग तरी बेतानें वागलों कां? अरेरे. मग बुध्धीच भ्रष्ट झाली. सिव्हबल सांगेल त-से. आज काय? आज याची बायको चांगली आहे, आणा धरून. उद्या काय? उद्या आमच्या गरिब ब्रा-ह्मणाचें घरांत त्यानें भिक्षूक वृत्तीनें संपादन केलेलें बरेंच द्रव्य आहे आणा लुटून. आज काय आमचा बरा आ-ज्ञुदार आहे घ्या इजत. वाढवा सारे. बसवा कर. या प्रमाणें कहर कहर करून सोडला. ते प्रजाजन आतां दया कशी करतील? हाय हाय. आतां काय करूं? नारायणा! बा तुज वांचून निधानीं आतां कोणी नाहीं. धावरे धाव. चुकलों चुकलों चुकलों. कृ-पाघना, आतां तूंच समर्थ आहेस. नकोरे उपेक्षूं. तूं ह्मणसील कीं, "तुज सारख्या पाप्यावर दया कशी क-रावी?" परंतु हे मात्र तुझें निमित्य साजणार नाहीं. प्र-भो! अरे माझी कथा काय? मजहून शतगुणीत पापी तुला शरण आले आहेत. आणि त्यांचे तूं रक्षण केले-स. ते पवाडे मी ऐकले आहेत. कदाचित तुला स्म-रण नसेल तर स्मरण देऊं कां? अरे, आजामेळ, आ-घासूर, पिंगला, गजेंद्र इत्यादि थोडे कां प्राणी? अरे, आजामेळ तर मांगिणीशीं भ्रष्ट असतां तूं श्रेष्ट केलास. मग माझी कथा काय? तुझ्या कृपासिंधू पुढें माझे पाप तें किती? तस्मात शरणांगतास उपेक्षू नकोस. मी पुनः असा वागणार नाहीं. झाला, मला पश्चात्ताप झाला.

गण०—माहराज, मंगा धरून तुमी दुःख करताया मी कां-

हीं उमगॅलो नाहीं बगा. एकदा या दासाप सांगा तर खरं.

चं०—अरे गणबा, आतां सांगूं काय ? सर्व ग्रंथच आटपला. ज्या जोरावर किंवा ज्याचें आनुमतानें मी आज पर्यंत गैरकायदा वागलो, व ज्यावर पूर्ण विश्वास. तोच आज सिंव्हबल प्रजाजनास सामील होऊन बारावाजतां वाड्यावर हल्ला करणार आहे. अरे, आज पर्यंत प्रजेचा रोष याचांडाळा करतांच मला मिळाला. नाहीं तर मी कधीं प्रजेशीं गैर तजविजीनें वागलों नसतों. परंतु सारे सिंव्हबला करतां. आणि तोच सिंव्हबल आज सर्व फौजें सुध्धा व सेनापती सुध्धा लहान मोठें कामगार मडंळीसह प्रजाजनास जाऊन मिळाला. आणि आज मजवर हल्ला करणार.

गण०—महाराज, पन हल्लाकरन्याचें कारन ?

चं०—अरे आतां सांगूं काय ? गांवांतील धनपाळ ह्मणून जो सावकर आहे कीं नाहीं, त्यानें बंड केलें आहे. आणि शहरांतील सर्व प्रजा त्याला साह्य झाली आहे.. गणबा इतकें झालें तरी त्याचें मला नवल वाटत नाहीं. परंतु आपला सिंव्हबळ ही त्यांनां अनुकूळ झाला हें आश्चर्य वाटतें. अरे, सिंव्हबळ—सर्व प्रधांना सुध्धा व माझ्या सर्व फौजे सुध्धा धनपाळास मिळाला आहे. आणि आतां बारा वाजतां वाड्यावर हल्ला करणार. ह्मणून बा गणबा मी कसें करूं ? एक सुध्धा मनुष्य मज कडील राहिले नाहीं.

गण०—सरकार, लय आवघड सांगितलत बगा. पन काहो ? सिंव्हबल ह्मंज लय तुमचा आवशी पिरतीतला. आन आसं कसं झालं ? आहो, परसंगी तुमच्या करतां मानबी देणार मंग झाल कसं ?

चं०—अरे, ती सर्व हकिकत मला समजली आहे. गावांतील सर्व मंडळींनीं व धनपाळांनीं सिंव्हबलास लाखों रुपये देऊं केले. तरी तो त्यांचा सल्ला पत्करिना. शेवट धनपाळांनीं सांगीतलें कीं, "तुह्मी इतकी जरी खटपट केली, तरी भुवनपाल व भुवनसुंदरी आणि हंसपालिका सर्व जिवंत आहेत. आणि ते कोठें आहेत हे ही मला माहीत आहे. भुवनपालाचा आणि माझा फार स्नेह आहे सबब त्यास सांगून हंसपालिका तुला राणी करीन." गणाबा, या आशेनें सिंव्हबल कबूल होऊन त्यांना वचन भाक दिली. आणि आतां मजवर हल्ला करणार. गणबा स्त्रियांच्या नादानें पुरुष कोणती साहस कर्मे करतील याचा नेम नाहीं. जन्मवर माझें अन्न खाऊन सिंव्हबल स्त्री करतां आतां मजवर उलटला काय ? अरे सिंव्हबलाचेच आश्चर्य काय मानूं ? परमेश्वर फिरला ह्मणजे सर्व स्वकिय गणगोत सुध्धा आपल्याशीं फिरते. माझा कार्टा सौंदर्यसागर तो सुध्धा भुवनपालास जाऊन मिळाला आहे, व त्यानेंच त्याला आश्रय दिला आहे ह्मणून ऐकिलें. गणबा, आतां काय उपयोग ? जसा वागलों तसें मला फळ मिळण्याची वेळ जवळ आली. असो. आतां हिरकणी खाऊन प्राण द्यावा. (ह्मणून हातांतील आंगठी काढूं लागतो.)

गण०—हं, हं. माहराज, हें काय ? माहो मला एक युक्ती या वेळेस सुचली आहे. ती सांगूं कां ?

चं०—अरे, सांग पाहू. जलद सांगपर. गांवांत कायशीं कडेकोट तयारी होऊन आतां "दनि" करण्याचा बेतात आहेत.

गण०—माहराज, तुमचा रणछोडराय है कीं नाहीं ? त्या

जवळ तुमची पन्नास हजार फौन है. आन त्यो येथून तीन कोसावर सरकारी बागेंत है, त्यासनीं बगा कळवाव. आन जलद वाड्याप आनाव. संमद जरी फितुर झाले, तरी रणछोडराय आक्शी तुह्माकडे हैत बगा. पन्नास हजार फौज आक्शी निवडक एक जात त्याप है बगा. त्यो जर वाड्याप राखन बसला तर मंग कांहीं तुमच्या जिवाला धोका नाहीं.

चं०—अरेहो. चांगली युक्ती काढली हें घे पत्र आणि जलद घोड्याबर बसून जा. रणछोडराय पत्रा बरोबर आले कीं कामच झालें.

गण०—ठीक है महाराज. पन पत्रांत काय लिवलया मला संमजुद्या.

चं०—अरे हें पहा तुला वाचून दाखवितों. (असें ह्मणून पत्र वाचूलागतों.)

"तरवार बाहदर रा० रणछोडराय यास—आज्ञापत्र लिहिण्यांत येतें कीं, या घटेकेस प्रसंग फार कठीण आला आहे. सबब पत्र देखत सर्व फौजे सुध्धा वाड्याजवळ हजर व्हांवे. या वेळेस भरंसा काय तो तुमचा आहे. कळावें-माघशुध्ध १०, सोमवर दोनप्रहर."

चंद्रकांत.

चं०—गणबा, ऐकलेस पत्र ? चल तर हें घें, आणि कसा मागल्या पायींपळत येतोस. पहा, विलंब लागल्यास माझी पुन: भेट होणार नाहीं.

गण०—हा पहा निघालो. आपण स्वस्थ असावे.

(असें म्हणून निघून जातात.)

(पडदा पडतो)

(पडद्या बाहेर.)

वि०—कां सुत्रधार, तुम्ही आगदीं मनचेच मुक्त्यार झालांत-ना ? कांहीं कुणाचा धाक ?

सू०—अरे, पण कां ? धाक कशाला. आम्ही गैर वागतो कीं काय ?

वि०—आहा, पाहिजे तेव्हां विश्रांतवनांत जातां, वाटेल तेव्हां शृंगारपुरींत येतां हें काय ? सर्व आपली मनचीच मुक्त्यारी. असें कराल तर लागलीच चार्ज वसऊन आर्ज करीन. आणि सपिंड करून दसापिंड पाडीन. मग माझा राग तर माहीतच आहे तुम्हाला.

सू०—हावेड्या. जिभ संभाळ. असे अमंगल शब्द मुखा वाटें कधी काढूं नयेत. काळ आहे, वेळ आहे. कांहीं बोलणें झालें तर विचार करून शुभ शब्द असतील ते-व्हढेच बोलावे; आशुभ मुखा वाटें कधीं बोलूनये.

वि०—तें असुद्यां हो. पण मग पुढें काय झालें तें एकदा दाखवा.

सू०—अरे पहा आतां चमत्कार.

(सर्व निघून जातांत.)

## प्रवेश ३

**स्थळ**

**कृपासागराचा आश्रम.**

**पात्रें**

| | |
|---|---|
| कृपासागर | ऋषी. |
| भुवनपाल | राजा. |
| सौंदर्यसागर | त्याचा जामात. |
| प्रेमसागर | स्नेही. |
| भालचंद्र | उपाध्ये. |
| भुवनसुंदरी | राणी. |
| हंसपालिका | तिची कन्या. |
| क्षेमावती | कृ. ची. कन्या. |
| सावित्री | तिची सखी. |

(दुसरी पुष्कळ मंडळी, व शृंगारपुरीचे प्रजाजन.)

सा०—कायग बाई क्षेमावती, परमेश्वर कृपेनें आपल्या तिघींचे ही हेतु पूर्ण झालेना ?

क्षे०—खरेंच बाई. इतका हा हंसपालिकेचा उपकार.

हं०—माझागबाई कशाचा उपकार. हा सर्व तुमचा उपकार बरीक खरा. तुह्मीं जेव्हां कृपासागरास वळविलेत तेव्हांना हा प्रकार झाला.

सा०—आगबाई तें असुंद्या आतां. कोणाचा कां उपकार असेना. उपकार ईश्वराचा खरा. पण बाई आतां नांवें घ्या सगळें जणं एकदा. कसं बाई क्षेमावती ?

क्षे०—आह्मी नाहीं बाई घेणार. तुलाच फार नांव घेण्याची हौस आहे. तूंच घे एकदा. कसं हंसपालिके ?

हं०—हो. ज्यानं प्रथमता नांव काढलें, त्यानंच अगोदर घ्यावं.

क्षे०—(टाळी वाजऊन.) हं. हं. ठीक झालं. घे आतां पहिल्यानं तूंच.

सा०—हें हो काय बाई. "पाटीलबोवा लग्न करा तर ह्मणाले तुह्मीच करून द्या." हें काय असं.

क्षे०—आग तूंच प्रथमतां नांवाचं लंचाड काढलं. आह्मी कां उकरून काढलं ?

सा०—बरं हो बाई. आतां नाहीं असं काढणार.

हं०—सावित्राबाई, देवघराच्या दारांत काल आडविलं होतं त्या पेक्षां नांव घेण्याचं कां आवघड झालं ?

सा०—[यांनीं काल आपल्यास त्यांचा बरोबर बोलतां पाहिलें असें जाणून.] आहाहा, काय तरी थट्टा ! क्षणोक्षणीं. डोळ्याला डोळा उचलून पाहणें आणि गालांतलें गालांत परस्परांनीं चोरून हसणें त्या पेक्षां आमचें हें बरें.

हं०—[आपलें आणि त्यांचें हसणें इनें पाहिलें असें जाणून.] आग बाई सावित्रे, फुलाचें गजरें कोणी नसले म्हणजे एकमेकास मारावें त्या पेक्षां नुस्ते हसणें बरें नव्हे कां ?

क्षे०—(आमचा खेळ हंसपालिकेनें कधीं पाहिला कोण जाणे.) बाई पुरे आतां. ऊखाळ्या पाखाळ्या कां उगीच काढतां ? नांव घेणें असेल तर जलद घ्या करो [illegible]तां सर्व घरीं येतील.

हं०—हो [illegible] आत्तां आई गंगेवरून येईल.

क्षे०—आग आई आली तरी चिंता नाहीं. पण पुरुष सर्व आले म्हणजे आपलें व्यर्थच जाईल.

सा०—येकूण आतां मजवरच आलेना ?

क्षे०—हो, तूं प्रथमता काढलें तें आतां निस्तार.

सा०—ऐका आतां——"नवलाखाचा शालू त्याला हजाराची दशी आणि"——[लाजते.]

क्षे०—हेंग काय बाई ! वा ! काय तरी पण. अस करशील तर आह्मी आपले जातों. चलग हंसपालिके.

सा०—घेतेहो पण. इतकं जायला नको लागलिच.
"नवलाखाचा शालू त्याला हजाराची दशी"——
"भाळचंद्रजीला उदंड असल्या दासी तरी त्यांत सावित्रीच खाशी."

क्षे०—आग बाई ! केव्हढा तरी डौल.

सा०—चल बाई आतां तूं घें कशी.

क्षे०—मी होय. मग हंसपालिका कां घेईना अगोदर.

हं०—मी बाई मग घेईन. तुह्मीच घ्या अगोदर.

क्षे०—हजाराचा शालू त्याला मोती घोंस पदर——(लाजते.)

सा०—काग आतां ? "लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे पाषाण."

क्षे०—हो पण इतकं बोलायला नको कांहीं.
"हजाराचा शालू त्याला मोतींघोंस पदर माधवरावांची उदंड असली कदर तरी क्षेमावतीवर प्रेमाचीच नदर."

सा०—वाहवाग बाई ! खूपच ठेऊन दिली. आतां हंसपालिके तूं घे बाई. ह्मणजे आपले झाले काम.

हं०—बरं बाई घेतें हो.——"रत्नखचीत चोपाळा त्याला कांचनाच्या कड्या आणि—(लाजते.)

क्षे०——तें नाहीं चालणार. घेतलेंच पाहिजे.

हं०—बरं बाई तुह्मी कां सोडतां.

"रत्नखचीत चौपाळा त्याला कांचनाच्या कड्या—सौंदर्यसागरांनीं हंसपालिका नायको मिळावी म्हणून उदंड आणल्या साड्या तरी ह्यात जरतारीच्याच घड्या."

सा०—आहाहा. याचें नांव नांव. नाहींतर मेले उष्टे उखाणें आणि उष्टी नांवें.

(इतक्यांत स्नानास गेलेली पुरुष मंडळी येतात.)

भु०—[हात जोडून.] माहराज कृपासागरजी, आपल्या कृपेनें आज धन्य धन्य झालों. कन्या भेटली. विवाह सुख डोळ्यानें पाहिलें. सर्व आनंदी आनंद सोहळा झाला. आतां आम्हा उभयतास काशी यात्रेस जाण्याची पर्वानगी द्या. आणि थोडेसें मला विचारणें आहे, तेव्हडी शंका दूर करा.

कृ०—अरे भुवनपाला. उत्तम झालें. तीन लग्नें एका मांडवांत झालीं. माझ्या क्षेमावतिचा ही सोहळा थाटानें झाला. तसेंच सावित्रीस ही स्थळ उत्तम मिळालें. आणि तुझ्या हंसपालिकेचें तर अक्षय कल्याणच झालें. ती पृथ्विचें स्वामित्व करील हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. आतां तुला काय शंका विचारूनघेणें असेल ती घे.

भु०—माहराज, शंका इतकीच कीं हंसपालिका मला कन्या प्राप्त झाली, ती मोहनबागेत सुमारें साहामहिन्याची हंसपक्षांत सापडली. ती कोणाची होती आणि तेथें पडली कशी. वगैरे कांहींच खुलासा आज पर्यंत समजला नाहीं. तर एव्हढी शंका दूर करावी.

कृ०—अरे भुवनपाला, सांगतों हें श्रवणकर. " पूर्वी इंद्रशापानें विर्यसेन गंधर्व मृत्यु लोकीं स्त्री रूपानें विहार करीत हो-

ता. तुझ्या मोहनबागेच्याच आसपास ती शापग्रस्त स्त्री हिंडत असतां, माधुर्यनामा ऋषी तिला पाहून कामातूर झाला. नंतर उभयतांचें प्रेम जमून ती स्त्री गरोदर राहिली. पुढें दिवस पूर्ण होतांच, मोहनबागेच्याच झाडींत ती प्रसूत झाली. मग कन्या साहामहिन्याची झाली नाहीं, तोंच शापाचें पुर्ण दिवस भरल्यामुळें वियसेन पुनः स्त्रीचा पुरुष झाला. परंतु तो मोठा विचारांत पडलाकीं, कन्या साहामहिन्याची, आणि इंद्र शेवेस तर गेले पाहीजे. आतां काय करावें. विर्यसेन असा संकटांत अहि, असें पाहून इंद्रानें स्वतः त्यास दर्शन देऊन सांगितलें. बा विर्यसेना, काळजी करूं नकोस, जगदंबेनें येथील भुवनपाल राजास कन्या प्राप्त होईल ह्मणून आशीर्वाद दिला आहे. तेव्हां तो आतां स्त्रीसह वर्तमान या ठिकाणीं येईल. तूं कन्येस येथेंच ठेऊन मज बरोबर चल. आपण गेल्यावर भुवनपाल येथें येई पर्यंत ह्या कन्येचें हंस पक्षी संवरक्षण करतील. आणि माझ्या आशीर्वादानें पुढें ही पृथ्विची स्वामिणी होईल; असें ह्मणून इंद्र व विर्यसेन कन्येस मोहनबागेंत टाकून गेले. व पश्चात तुला मिळाली." भुवनपाला, जगदंबेच्या आशीर्वादाची ही कन्या आहे. तेव्हां उभय कुळाचा उध्धार करील. आतां तुला काशी यात्रेस जाणे आहे, तर तुझ्या जामातास गादींवर बसऊन मग खुशाल जा.

भु०—महाराज. गादींवर तर माझा व्याही, सौंदर्यसागराचा बाप चंद्रकांत आहे.

कृपा०—अरे, ईश्वर कृपेनें भूत भविष्य वर्तमान तिन्ही काळाचें ज्ञान मला आहे. चमत्कार पहा आतां काय होतो

तो. [इतक्यांत शृंगारपुरिचें प्रजाजन पर्ण कुटी जवळ हजर होतात.]

भु०—बाहेर काय गलबा आहे! [इतक्यांत प्रेमसागर आंत येऊन.]

प्रे०—कृपासागर माहराज, आहो भुवनपाल महाराज, शृंगारपुरिंतील धनपाळासह हजारो प्रजाजन शरण, शरण ह्मणून प्राप्त झाले आहेत. त्याना दर्शन व्हावें. महाराज; मुख्य धनपाळ जो सावकार तो पादचारी असून रुमालनें हात बांधले आहेत. सिवाय सहस्रावधी संभावीत, दाती तृण धरून शरण ह्मणून प्राप्त झाले आहेत. कैक हतीवर बसून व गाड्यांतून, आणि घोड्यावरून प्राप्त झाले आहेत या करतां दर्शन द्यावें ही विनंती आहे.

कृपा०—भुवनपाला, चल आपण त्या प्रजाजनांस सामोरें जाऊन दर्शन देऊं.

भु०—आज्ञा महाराज. [असें ह्मणून कृपासागर व भुवनपाल, सौंदर्यसागर, भाळचंद्र, प्रेमसागर सर्व मंडळी पर्ण कुटी बाहेर सामोरें जातात. आणि तिकडून धनपाळासह प्रजाजन येऊन परस्परांच्या मध्यंतरीं भेटी होतात.]

धन०—मी सांष्टग नमस्कार करून विनंती करतोंकीं, आह्मी सर्व प्रजाजन यां पायास शरण आलो आहोत. या करतां शृंगारपुरीस चलून आह्मां दीनप्रजेचें पुत्रवत् पाळण करावें. आपण आह्मांस टाकून आल्यापासून मागें जी आमची चंद्रकातानें दुदर्शा केली, ती सांगतां एक ग्रंथच होणार आहे. असो. आह्मी अती त्रस्त झाल्यावर सर्वजण एक ठिकाणीं मिळून सिंव्हबलास अनकूळ करून घेतलें. आणि चंद्रकांतावर हल्ला केला. चंद्रकांत कोठें गेला याचा पत्ता नाहीं. याप्रमाणें आह्मी त्रस्त झालेलो प्र

जाजन शरण आलों आहोत. तर आमचा अनादर नहोतां पूर्वीं प्रमाणें गादींवर बसून रक्षण करावें. (असें ह्मणून धनपाळासह सर्व हात जोडून नमस्कार घालतात.)

कृ०—भुवनपाला, समस्त प्रजाजन शरण आलें आहेत. या करतां शृंगारपुरीस सौंदर्यसागरास व हंसपालिकेस राज्याभिषेक करून नंतर तुह्मी वाराणशींत उभयतांनीं वास करवा. असा माझा हेतु आहे.

भु०—(हात जोडून.) ठीक आहे माहराज. मी आपले आज्ञे बाहेर नाहीं. (असें ह्मणून सर्व कृपासागरास नमस्कार करून शृंगारपुरीस जाण्यास निघालें.)

(पडदा पडतो.)

[ पडद्या बाहेर. ]

विदु०—कां सूत्रधार, तुह्मी आमची बायको ना? माझे मनांतून एकदा नांव घ्यावें असें आलें आहे.

सू०—अरेतर मग घे. इतका लाजतोस कां?

वि०—घेऊच तर? हें पहा—पण कांहो? इंग्रेजी घेऊं कीं गुजराथी घेऊं?

सू०—अरे हें काम तुझ्या आवडीचें आहे, तेव्हां तूं आपले इच्छे प्रमाणें घें.

वि०—बरतर. हें पहा—समोर होता कोनाडा त्यांत होत वासकुट आणि—सूत्रधार, लाज वाटती बुवा.

सू०—अरे घेणें असेल तर घे लवकर. आतां मी नाटक आटपणार.

वि०—हें पहा. समोर होता कोनाडा त्यांत होत वासकुट आणि सूत्रधारी माझ्या बायकोनें खाल्लें बिस्कुट."

सू०वा खूप मजा केलीस बाबा. अरे पण गुजराथी नांव कसें घेतोस पाहूं बरें.


कृपा.
सों.
भ.
भा.
जुंगारयुरीतीलभजाखन

वि०—वा हें पहा—सामे हतो गोखलो तेमा हतो कांवळो, अने सूत्रधार बायडी मेरी वात सांवळो."

सू०—(मोठयानें हसून) खूप मजा केलीस बावा. शाबास. अरे, आतां एकदा शृंगारपुरींत जाऊं आणि नाटक आटपूं.

वि०वा. मघाशीं तें पत्र पाठविलें चंद्रकांतानें रणछोडरायाला, त्यांचें पुढें काय झालें तें सांगितलें नाहीं. आणि नाटक आटपूं ह्मणतां काय ?

सू०—अरे, मघांचा झाला उलगडा. ह्मणजे तुला सांगूं? अशिक्षीत मनुष्य मोठ्या हुद्यावर ठेविला ह्मणजे असा परिणाम होतो. बरें झालें चंद्रकांत पळाला; नाहीं तर त्या दंग्यांत ठार झाला असतां. चंद्रकांताचें पत्र रणछोड रायास पोंहचलें. पण काय? दुसऱ्याकडून वाचवावें तर आब जाती, आणि स्वतः वाचण्यास गंघाळभर पाणी पाहिजे. याच कारणानें त्या घाइच्या वेळीं, पत्रांतला भाव रणछोडास न समजून चंद्रकांतास सर्व सुखाचा आभाव झाला. परंतु प्रजा जनांचा स्वभाव चांगला असल्यामुळें भाव धरून त्यांनीं भुवनपालाकडे धांव घेतली. आणि सर्व आनंद केला. या प्रमाणें झालें. आतां थोडा वेळ आपण सुधारलेल्या व आनंदानें भरलेल्या शृंगारपुरींत जाऊं येतोस काय ?

वि०—हो. हा पहा निघालों. सर्व निघून जातात.

(पडदा पडतो.)

## प्रवेश ४.

स्थळ—शृंगारपुरींतील धनपाळाचा वाडा.

### पात्रें.

धनपाळ - - - - .... सावकार.
विनायकपंत - - - - .... त्याचाकारभारी.

(इतर गांवांतलें सर्व प्रजाजन.)

वि०—[हातजोडून] प्रजाजनहो, धनपाळशेटजींनीं आज सर्वांस एव्हढ्या करतां पाचारण केले आहे कीं. आपल्या शहरची व आपली पूर्वींची स्थिती कशी होती, वे हल्लीं कशी आहे याचा विचार करण्यास. पहा, लोकांचें करसुटले. देवस्थानें सुरू झाली, न्याय बरोबर मिळूं लागला. पर्जन्य यंदा हवा तसा पडला. चहुकडेस स्वस्तता झाली. गोर गुरीबास धर्मार्थ अन्न मिळूं लागलें. तसेच ठिकठिकाणीं गरिबा करतां दवाखानें स्थापन झालें. कैक देवळांचा जिर्णोध्धार झाला. कित्येक नवीं देवळें झालीं. शेहरांत पाण्याची कमताई होती, ती ठिकठिकाणीं नवें हौद झाल्यामुळें मोडली. चोरी, दरवडे वगैरे घालणाऱ्या लोकांस योग्य शासनें झालीं. प्रजेच्या सुखा करतां व शहराच्या सुधारणुकी करतां पंच स्थापन झालें. दिवाणी फौजदारी कामें नियमानें व्हावीत म्हणून नियम ठरऊन टाकीलें. व कांहीं नवीन ठरण्याची गरज लागली, तर त्या कामावर चतुर निस्पृही मंडळी स्थापन केली. मोठ मोठीं हुद्याची कामें चांगल्या चांगल्या विद्वान लोकांस दिली. हुद्याच्या कामावर आशी-

क्षीत मनुष्य नसल्यामुळें आनर्थ होणें बंद झाला. फितुरी मनुष्यें हद्दीपार केली. ठिक ठिकाणीं विद्याभ्यासा करतां शाळा स्थापन झाल्या. हजी हजी करणारे राज्यांतले लोक काढून लाविले. मद्य वगैरे आमली पदार्थांची दुकानें बंद करून टाकिलीं. या प्रमाणें, नवीन आपले प्रभू जे सौंदर्यसागर व मातोश्री हंसपालिका राणीसाहेब यानीं सुधारणा करून सर्व प्रजेस सुखोत्पत्ती केली. अशा आपल्या प्रभुचें कल्याण व्हावें. एत्तदर्थ सर्वांनीं आपल्या जाती धर्मा प्रमाणें आपापल्या देवाची प्रार्थना करावी. आणि आपण प्रजा, हा प्रभू झाल्यापासून आनंदींत झालो, वगैरे आनंद प्रकार उघडपणें स-सर्वांनीं दर्शवावा. ह्मणून शहरांत सर्वांनीं आपल्या धर्मा प्रमाणें ब्राह्मण भोजनें, हरिकिर्तनें, दिपोच्छाव वगैरे करावेत. आणि निरंतर प्रभुचें यशचिंतून राहावे. कळावें, सर्वांनीं आजरोजीं आपापल्या शक्ती प्रमाणें घरोघरीं आनंदोच्छाव करवा. ज्यानां अगदींच सामर्थ्य नसेल त्यांस आमचे धनपाळशेट मदत करतील.

धन०—आहो सभासद हो, या करतांच तुम्हां सर्वांस आज येथपर्यंत यावयाची तसदी दिली. (असें बोलणें झाल्यावर पानसुपारी घेऊन सर्व प्रजाजन आनंदानें आपले घरीं उच्छव करण्यास निघून जातात. व सौंदर्य सागर हंसपालिके सह आनंदानें राज्य करतो.)

(पडादा पडतो.)

(पडद्या बाहेर.)

सू०—विदुषका, पाहिलासना चरित्र भाग ! याप्रमाणें आनंद झाला. भुवनपाल व भुवनसुंदरी पुढें वाराणशींत जाऊन राहिली. त्यांस दरमाहा सवालक्ष रुपये सौंदर्यसागर

पाठऊं लागला. आणि सौंदर्यसागराचा बाप जो दुष्ट राजा चंद्रकांत त्याला ही साठहजार रुपये दरमाहाची नेमणूक भुवनपालानें सांगितली म्हणूनच सौंदर्यसागर देऊं लागला. तो चंद्रकांत ही शेवट पर्यंत वाराणशींतच राहिला. असो. या प्रमाणें चरित्र समाप्त झालें. आतां सभासदांनीं मेहर्बानी करावी. व तुला ही सांगतों कीं, कदाचित् सभासदांनीं पुनः आपला उदार आश्रय दिला तर या रंगमंडपीं दुसरें आद्भुत चरित्र करण्यास मला येणे आहे; तेव्हां तूं हीं कृपा करून येशील ना?

वि•—हें काय विचारावें माहाराज. तुम्ही आतां जातां व सर्व सभासद आनंदानें जातात. परंतु मला फार वाईट वाटतें. पण, पुनः तुम्ही त्वकरच चरित्र करून मला बोलविणार, हें ऐकून मात्र संतोष होतो. असो. ईश्वर कृपेनें तुमची आमची व सभासदांची पुनः त्वकरच भेट होवो ही आशा आहे. चला आतां सूत्रधार, बाहेर उजेडण्याचा सुमार आला आहे. तेव्हां कांहीं ईश्वर स्मरण करूं चला. (निघून जातात.)

समाप्त.

# शुद्धीपत्र.

| पृष्ट. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| *१ | ७ | विदुषक. | विदूषक. |
| १ | १९ | मगे. | मग. |
| *१ | ० | सुत्रधार. | सूत्रधार. |
| २ | १७ | तहानको. | ताहान. |
| २ | १७ | एकूण. | एकून. |
| ३ | १४ | शावासा. | शाबास. |
| ३ | १९ | मांझें. | माझें. |
| ३ | २० | तों. | तो. |
| ३ | २१ | श्रावाण. | श्रावण. |
| ४ | १५ | न्युन. | न्यून. |
| ५ | १८ | पामरान. | पामरानें. |
| ६ | १९ | विदुशक. | विदूषका. |
| ७ | १० | रूपानी. | रूपानीं. |
| ८ | ९ | करूं. | करूं. |
| ८ | १८ | तबियेत. | तब्येत. |
| *८ | २४ | काहीं. | कांहीं. |
| ९ | ६ | होंय. | होय. |
| ९ | ९ | आहें. | आहे. |
| *९ | २७ | अरें. | अरे. |
| १० | ५ | अता. | आतां. |
| ११ | ११ | तबित. | तब्येत. |
| *११ | १२ | बाई साहोंबाची. | बाइसाहेबांची |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १४ | १५ | ? | नको. |
| १५ | १३ | पंळुन. | पळून. |
| १५ | २४ | करुन. | करून. |
| १७ | २१ | बाहलं. | वाहिलें. |
| १७ | २३ | गांवांतल. | गांवांतलें. |
| १७ | २६ | जिन. | जीन, |
| *१८ | ७ | इश्वर. | ईश्वर. |
| १९ | ४ | दुर. | दूर. |
| २२ | १ | पडलें, आहे. | पडली आहे. |
| २२ | ७ | वेडे. | वेडें. |
| २५ | ४ | ह्मणजें. | ह्मणजे. |
| २५ | ६ | वर्षों. | वर्षां. |
| २५ | ११ | पुन्याईच. | पुण्याईच. |
| २७ | १७ | नवतो. | नव्हते. |
| २७ | २६ | एकेकांस. | एक कां. |
| ३१ | २६ | सरकाराचा. | सरकारांचा. |
| *३७ | ११ | जोसो. | जोशी. |
| *३८ | ४ | कर्ता, व करणें. | करतां, व करणें. |
| ४० | १ | ? | . |
| *४० | ६ | पांणी. | पाणी. |
| ४२ | ११ | हिसा. | हिस्सा. |
| ४२ | २४ | तांब्रे. | तांबे. |
| ४५ | २४ | सरकानी. | सरकारांनीं. |
| ४६ | २६ | कमापेक्ष. | कामापेक्षां. |
| *५० | १४ | ठिक. | ठीक. |